म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. १६४०

REFBK-0003037

म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. क्र. १६७०

सं.नि. ... १६७०
ता. ...

निबंध १६७०
३०/३६९

... ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ३०३७
१६७०

REFBK-0003037

निबंध
ग्रं.नं. ८८९

# गडकऱ्यांचा विनोद

चर्चात्मक निबंध

स. नि. नं. १९६५०
ता. १५/१२/३८
ठाणे

लेखक
शिवराम गोविंद भावे

सह्य प्रकाशक मंडळी
गिरगांव, मुंबई
१९२६

मुद्रक—अनंत आत्माराम मोरमकर, श्री लक्ष्मी-नारायण छापखाना,
२६४ ठाकुरद्वार मुंबई; प्रकाशक—सह्य प्रकाशक
मंडळीकरितां शिवराम गोविंद भावे
आंबेवाडी, गिरगांव, मुंबई.

प्रथमावृत्ति

सर्व हक्क स्वाधीन

# प्रास्ताविक

फर्ग्युसन कॉलेजांतील महाराष्ट्र वाङ्मय मंडळातर्फे १९२५ च्या जानेवारी महिन्यांत मीं एक व्याख्यान दिलें; त्या वेळीं या विषयाची प्रथम चर्चा केली. व्याख्यानाकरितां तयार केलेल्या टिपणांवरून १९२६ चे एप्रील महिन्यांत, प्रस्तुतचा निबंध मुंबईच्या साहित्यसंमेलनांत वाचण्याकरितां म्हणून लिहिला. कार्यबाहुल्यामुळें संमेलनांत कोणताच निबंध वाचण्यांत आला नाहीं; यामुळें माझा निबंधही जाणत्यांपुढें चर्चेला येऊं शकला नाहीं.

म्हणून मोकळी चर्चा व्हावी या उद्देशानें मीं तो प्रसिद्ध करीत आहें. निबंधांत अनेक ठिकाणीं सांगितलेली गोष्टच मला या ठिकाणीं पुन्हां एकवार सांगावयाची आहे. आणि ती ही कीं, माझ्या निबंधाची चर्चा निर्विकारपणानें, वैयक्तिक अभिमान किंवा दुरभिमान न बाळगतां व पूर्ण शास्त्रीय दृष्टीनें व्हावी. अशी जी टीका होईल तिलाच फक्त मी उत्तर देऊं शकेन. इतर दृष्टींच्या टीकांकडे पूर्ण दुर्लक्ष करणें हेंच मीं श्रेयस्कर ठरविलें आहे.

नोव्हेंबर १९२६ शिवराम गोविंद भावे

## सूचना

निबंध लिहितांना गडकऱ्यांच्या पुस्तकांच्या खालील आवृत्त्यांचा उपयोग केलेला आहे.

| | | |
|---|---|---|
| एकच प्याला | आवृत्ति तिसरी | १९२२ |
| पुण्यप्रभाव | आवृत्ति पहिली | १९१७ |
| प्रेमसंन्यास | आवृत्ति तिसरी | १९२५ |
| भावबंधन | आवृत्ति दुसरी | १९२४ |
| राजसंन्यास | आवृत्ति दुसरी | १९२२ |
| वाग्वैजयंती | आवृत्ति पहिली | १९२१ |
| वेडयांचा बाजार | आवृत्ति पहिली | १९२३ |
| संपूर्ण बाळकराम | आवृत्ति पहिली | १९२५ |

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं. ........
ता. ........
ठाणे.

# गडकऱ्यांचा विनोद

स्थळ प्रत
सं. मुंबै. १९८०/१५७
३०/३/८८
दा. क्र. १८
ग्रंथ शाखा
मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद क्र. ५४८०
१७११३
ठाणे
सं. क्र. २ ४४००
११८
ता. १५/१२/४३
ठाणे

# प्रकरण पहिलें

## विषयप्रवेश

'पुस्तकांतील विनोद तर इतक्या बहारीचा आहे कीं, वाचकांच्या हंसतां हंसतां मुरकुंडयाच वळतील :' विनोदी पुस्तकांची अशाच तऱ्हेची शिफारस महाराष्ट्र सारस्वतांत अलीकडे चोहोंकडून होते. पोट धरधरून हंसावयास लावून आंतडयांना व्यायाम देणें हेंच विनोदाचें प्रमुख चिन्ह असें सदभिरुचिसंपन्न म्हणून गाजलेल्या केसरीकडून सुद्धां वाचकांस अभिप्रायाच्या रूपानें शिकविलें जातें; तेथें इतरांचा काय पाड ! आणि मग विनोदासंबंधीं चांगल्या सुशिक्षितांच्या अंत:करणांतसुद्धां विकृत कल्पना बिंबून भलत्याच विनोदाची वाहवा चोहोंकडे झाल्यास काय नवल !

वास्तविक विनोद व तो ज्याचा कारक आहे तें हास्य या संबंधीं पाश्चात्त्य विद्वानांनीं इतका ऊहापोह केलेला आहे कीं,

इंग्रजी शिकलेल्या मंडळींत तत्संबंधीं निदान सर्वसामान्य अशी स्पष्टशी रूपरेखा तरी माहीत असावयास पाहिजे. निवळ मराठी वाचकांस या विषयासंबंधीं माहिती मिळण्याचें एक उत्कृष्ट साधन केळकर यांच्या ‘ सुभाषित आणि विनोद ’ या पुस्तकानें प्राप्त झालेलें आहे. तथापि सूक्ष्म विचार करून शोधक मत बनविण्याऐवजीं, नानार्थानें वापरलीं गेल्यामुळें ज्यांचेमध्यें वास्तविक आज कांहींच अर्थ उरला नाहीं अशीं पोकळ व सर्वसामान्य विशेषणें देऊनच टीकाकार आपलें काम भागवीत आल्यामुळें गडकऱ्यांसारख्या प्रतिभावान नाटककाराच्या व उपरोधिक लेखकाच्या विनोदाची चर्चा करण्यापूर्वीं या विनोद विषयासंबंधीं अगदीं सामान्यच कां होईना, पण थोडें विवेचन करणें आवश्यक आहे. नाहींतर गडकऱ्यांच्या विनोदाची चर्चा तितकी सुलभग्राह्य होणार नाहीं. अर्थात हें विवेचन शक्य तितक्या सूत्रबद्ध रूपानें करावें लागल्यामुळें कार्यकारणभावांची मीमांसा त्यांत करणें शक्य नाहीं; आणि यामुळेंच त्यांतील कांहीं विधानें सिद्धांतरूप व आग्रही स्वरूपाचीं वाटतील; परंतु असें होणें अपरिहार्य आहे; आणि हे सूत्रमय विचार आज साधारणतः सर्वत्र मान्य आहेत एवढेंच फार तर अशा आक्षेपकांच्या समाधानार्थ म्हणतां येईल.

हास्यप्रतिपत्ति हें सर्व प्रकारच्या विनोदाचें एक मुख्य लक्षण आहे. अर्थात मनाच्या संस्कारक्षमतेनुरूप, उपजत

संस्कृतिभेदाअन्वयें आणि मनोरचनेच्या फरकाप्रमाणें, अत्यंत नाजूक स्मितापासून तों अगदीं धडाक्याच्या हंशापर्यंत हास्याच्या अनेक पायऱ्या होतील, व साहजिकच मग विनोदाचे तितके भिन्न भिन्न प्रकार कल्पितां येतील. अशा तऱ्हेनें कांहीं प्रकार कल्पून त्यांत उच्चनीचपणा मानण्याचाही प्रघात चालत आलेला आहे.

हास्य कां उत्पन्न होतें हा एक गहन प्रश्न आहे. चमत्कृति, कार्यकारणभाव न कळल्यामुळें विचित्र वाटणारी गोष्ट, असंबद्धता व अपूर्वाई इत्यादि कारणांमुळें हास्योत्पत्ति होते; व याच साधनांनीं विनोद साधला जातो.

अशा विनोदांत कोटी हा अगदीं सामान्य असा प्रकार होय. शब्दाचा मूळ अभिप्रेत असलेला अर्थ एकदम बदलून त्याला निराळाच व चालू विषयाशीं असंबद्ध असा अर्थ प्राप्त करून देणें व ऐकणाराच्या मनांत आश्चर्य आणि कुतूहल उत्पन्न करणें; किंवा एकाच शब्दाचे अनेक अर्थ एकाच दमांत लागोपाठ व्यक्त करण्याची कसरत दाखवून ऐकणाराचें मन उल्हसित करणें; हें कोटीचें स्वरूप व कार्य आहे. अशा प्रकारच्या विनोदाला प्रतिभेपेक्षां सराव, बुद्धिचापल्य व शब्दार्थज्ञान यांचाच जास्त उपयोग होत असल्यानें कोटीबाजपणा हा पुष्कळ आढळतो. व त्याचा पुष्कळदां अतिरेकही होतो. कोटी एकदांच आल्हाद देणारी असल्यानें प्रतिक्षणीं नवीन कोटी करण्याची आवश्यकता

उत्पन्न होते. व मग कोटीबाज मनुष्याला तेवढाच एक उद्योग होऊन राहतो. कोटींतही भिन्नभिन्न प्रकार आहेत; व एखाद्या कोटीनें अत्यंत उच्च आनंद प्राप्त होतोही. पण असें सामर्थ्य असणारे **चार्लस लँब** सारखे ग्रंथकार अत्यंत विरळा.

यानंतर विनोदाचा दुसरा प्रकार म्हणजे ज्याला केळकर यांनीं विनोदवचन हें नांव दिलें आहे तो होय. कोटींत फक्त एका शब्दाच्या कसरतीचा प्रश्न असतो; विनोदवचनांत एका सबंध कल्पनेचा चमत्कृतिपूर्ण किंवा असंबद्धतापूर्ण असा उठाव करावयाचा असतो. एखादी कल्पना सजवावयाची या दृष्टीनें यांत प्रतिभेचा संबंध कोटीपेक्षां अर्थातच अधिक. मात्र बाकीचा प्रकार जवळ जवळ कोटीसारखाच.

ह्या दोन्हीं प्रकारांत शब्दार्थावर भर फार. म्हणून यांना आपण शब्दनिष्ठ विनोद – ज्याला इंग्रजींत 'Wit' म्हणतात– म्हणूं. शब्दनिष्ठ विनोद हा तात्कालिक, निवळ बुद्धिजन्य व बुद्धिगम्य आणि पुष्कळदां अस्वाभाविक कल्पनांवर आधारलेला असल्यामुळें त्याची प्रत तितकीशी वर लागत नाहीं. ज्यांना मनुष्यस्वभावाच्या व मनुष्यांमनुष्यांतील परस्परसंबंधांच्या बारकाया पाहून मनाला संतोषविण्याचें सामर्थ्य व कला, हीं साध्य झालीं आहेत त्यांना तर निवळ शब्दनिष्ठ विनोदापासून फारसा आल्हाद होत नाहीं. अर्थातच बाल्यावस्थेंतील किंवा अप्रगल्भावस्थेंतील मनुष्यास हाच विनोद उलट जास्त रम्य

वाटतो. व दुसरा जो प्रकार आतांच सांगावयाचा आहे त्या प्रकारचा विनोद त्यास बहुधा आकलनही करतां येत नाहीं.

हा दुसरा प्रकार म्हणजे भावनानिष्ठ विनोदाचा. यांत मनुष्याच्या विचारशक्तीपेक्षां भावना जागृत करण्याचाच जास्त प्रयत्न असतो. सर्व भावना एकदम उचंबळून येऊन मनाची वृत्ति उल्हसित होणें आणि हृदयांतील हास्याच्या लहरीबरोबरच स्वाभाविकपणें चेहऱ्यावर तात्काल स्मिताची लकेर उठणें हें कार्य अशा विनोदानें होतें. या विनोदाला शब्दनिष्ठ विनोदाचें साह्य कधीं असतें किंवा कधीं नसतें; पुष्कळदां नसतेंच. किंबहुना हा विनोद शब्दांशिवायही अनुभवितां येतो.

चमत्कृतिजनक, असंबद्धतापूर्ण किंवा अपूर्वतादर्शक देखावा उत्पन्न करणें; परिस्थितीच अशा प्रकारची दाखविणें कीं, निवळ अशा परिस्थितीपासूनच हास्योत्पत्ति व्हावी; किंवा मनुष्याच्या स्वभावाची अशी एखादी छटा दाखविणें कीं त्यामुळें एकीकडे त्या मनुष्याविषयीं जिव्हाळा वाटत असूनही मनांत हास्य यावें; अशा प्रकारांनीं हा विनोद सिद्ध होतो. एखादें नाटक रम्य सजावटीनें रंगभूमीवर चाललें असतां एकाएकीं कोणा नोकरानें या बाजूनें त्या बाजूस जावें हा प्रकार अशापैकींच होय. वास्तविक यांत कोणी कांहीं बोलत नाहीं. शब्दांनीं भाव व्यक्त करण्याचा प्रयत्न किंवा हेतु नाहीं. तथापि हा अनपेक्षित प्रकार पाहून रसभंगामुळें उद्वेग वाटण्याऐवजीं

सहृदय माणसाला कौतुकच वाटतें; व त्याच्या चेहऱ्यावर स्मित झळकल्यावांचून राहत नाहीं. दुसरें एक उदाहरण घ्यावयाचें तर अशी कल्पना करा कीं, एक लहान चार पांच वर्षांचा मुलगी हातांत खाऊ घेऊन दारांत उभी आहे आणि तिच्या वरचें तिच्याशीं नेहमीं खेळणारें बागडणारें लहानगें कुलुंगें कुत्रें स्वतःला त्या खाऊंतील थोडा तुकडा मिळावा या हेतूनें तिच्या पायांत घोटाळत आहे. अशा वेळीं ती मुलगी जर आपल्या बोबड्या शब्दांनीं त्याला म्हणेल कीं, 'गुलामा, तुला आई नेहमीं खाऊ देते त्या वेळीं तूं आम्हांला कांहीं देतोस कां ? मग आज आमच्या जवळ कां मागतोस ? आं ! सांग पाहूं ? लबाड कुठला !' तर हा प्रसंग पाहणाराची मनोवृत्ति उल्हसित होऊन त्याचें अंतःकरण मुदित झाल्यावांचून राहणार नाहीं. वास्तविक मुलीच्या शब्दांत हास्यपर असें कांहीं नाहीं. पण लहानपणच्या सरळ स्वभावानुरूप कुत्रा आणि मनुष्य यांतील भिन्न भाव न जाणतां मुलीनें त्याच्याशीं समान भावनेनें भांडावयास निघावें ही चमत्कृति इतकी हृद्य आहे कीं, शब्दाच्या साहाय्याशिवायच ती कोणाच्याही मनांत सात्त्विक हास्य उत्पन्न करण्यास समर्थ आहे. अशा प्रकारचा अत्यंत उच्च दर्जाचा विनोद मराठींत **दुटप्पी कीं दुहेरी** या कादंबरींत अत्यंत प्रकर्षानें सांपडतो.

या शब्दनिष्ठ व भावनानिष्ठ विनोदांमध्यें जाणते लोक

दुसऱ्या प्रकाराला जास्त किंमत देतात. विनोदाचा मुख्य उपयोग म्हणजे मनांतील इतर सुखदुःखमिश्रित विचारविकारांना हांकून लावून अंतःकरण उल्हसित व मुदित करणें हा जर घेतला तर जाणत्यांचें हें मतच योग्य म्हणावें लागेल. कारण शब्दनिष्ठ विनोद अंतःकरणापर्यंत पोंचतच नाहीं; निवळ बुद्धीला आपल्या चमत्कृतिकारकत्वानें तो हलवितो व तेंही अगदीं थोडा वेळ. हा विनोद थोडा तरी भावनासूचक असेल तर त्यापासून प्रगल्भ मनुष्याच्या अंतःकरणाला क्वचित आनंद होईल. परंतु असा प्रसंग विरळा हें वर लिहिलेंच. उलट भावनानिष्ठ विनोद हा एकदम अंतःकरणाशींच हात घालीत असल्यामुळें ज्या मानानें तो प्रतिभासंपन्न असेल, त्या मानानें तो अंतःकरणांतील इतर विचारविकारांची हकालपट्टी करतो. अशा उत्कृष्ट विनोदप्रतीतीनंतर अंतःकरणांत उल्हास व प्रमोद यांखेरीज इतर कशाला जागाच राहत नाहीं. शेक्सपिअरचें मिडसमर नाईटस ड्रीम, किंवा रोमिओ आणि ज्यूलिएट मधील नर्सचा प्रवेश, किंवा मच ॲडो अबाउट नथिंगमधील डॉगबेरीचा प्रवेश वगैरे ज्यांनीं वाचले असतील त्यांना या विधानाची सत्यता तेव्हांच पटेल.

या दोन्हीं प्रकारांत निरनिराळ्या आणखी पुष्कळ तऱ्हा निघतील. त्यांसंबंधीं विवेचन करीत बसण्याची ही जागा नव्हे. तथापि विनोदवचनांतील एका विशिष्ट प्रकाराचा मात्र उल्लेख

थोडक्यांत केला पाहिजे. असंबद्ध कल्पना हा विनोदवचनाचा प्राण होय. ही असंबद्धता प्रमुखतः दोन प्रकारांनीं व्यक्त करतां येते. एक अगदीं क्षुद्र गोष्टींना मोठमोठ्या गोष्टींच्या पदाला चढवून. किंवा उलट मोठ्या गोष्टींना क्षुद्र गोष्टींच्या पदवीला पोंचवून. यांचीं उदाहरणें गडकऱ्यांच्या विनोदाची चर्चा करतांना पुष्कळ मिळतील. तूर्त एवढेंच ध्यानांत ठेवणें जरूर आहे कीं, यांपैकीं दुसरा प्रकार पहिल्यापेक्षां अत्यंत नीच होय. एखाद्यानें तुलना करतांना प्रत्यक्ष गाढवाला अगदीं सर्वगुणसंपन्न मनुष्याच्या पदवीला चढवून चमत्कृति उत्पन्न केली व त्यांत उपहास करण्याचा हेतु नसला तर तो विनोद पुष्कळ बरा. परंतु उलट द्रौपदी, सीता यांच्यासारख्यांना बाजारबसव्यांच्या पदाला पोहोंचविणारानें विकृत रुचीच्या मंडळींत कितीही हंशा पिकविला तरी तो विनोद दुष्ट व अमानुषच समजला पाहिजे.

भावनानिष्ठ विनोदांतही श्रेष्ठ, कनिष्ठ अनेक पायऱ्या आहेत. पण तो या निबंधाचा विषय नव्हे. तथापि प्रत्यक्ष विषयाला सुरवात करण्यापूर्वीं या दोन्ही प्रकारच्या विनोदास हीनत्व कशानें येतें हें थोडक्यांत सांगणें जरूर आहे.

विनोद अगदीं स्वाभाविक पाहिजे. ओढून ताणून अथवा तीच तीच कल्पना लांबवून विनोद करण्याचा प्रयत्न केल्यास त्यामुळें विनोदाऐवजीं विरस मात्र होतो.

विनोद सहसा दुसऱ्या कोणत्याही भावनेशीं मिश्र असूं नये. नाहींतर पूर्ण आनंदमय हास्य प्रतीत होणार नाहीं. भावनानिष्ठ विनोद अनुभवीत असतांना किंवा शाब्दिक विनोद ऐकत असतांना विनोदविषयाशीं जिव्हाळा वाटला पाहिजे. त्याबद्दल तिरस्कार यत्किंचितही उत्पन्न होतां कामा नये. यामुळेंच उपहासपर व उपरोधिक विनोदाला साहित्यशास्त्रज्ञांनीं अत्यंत नीच कोटींत लोटलें आहे.

विनोद सात्त्विक व शुद्ध असावा. त्यांत अश्लीलतादोष सहसा नसावा. परंतु अश्लीलतेशिवाय विनोदवचन — अश्लीलप्रसंगदर्शन तर कधींच कोणाला मंजूर होणार नाहीं — सिद्धच होत नसेल तर अश्लीलता अत्यंत गूढ तरी ठेवावी.

अशा तऱ्हेनें स्वाभाविक, प्रतिभासंपन्न, हृद्य, शुद्ध व अन्यविकाररहित अशा विनोदालाच कोणीही खरा विनोद म्हणेल; त्यांतही निवळ शब्दनिष्ठ विनोदापेक्षां भावनानिष्ठ विनोदच रसिकरंजन अधिक करील; इतर प्रकारचा ओढून ताणून आणलेला, उपहास, हेटाळणी इत्यादि विसंगत भावनांनीं मिश्रित अथवा अपवित्र झालेला विनोद, मग तो शब्दांची कितीही गोड कसरत करून व्यक्त केलेला असला तरी हीनच म्हणावा लागेल. आणि अशा विनोदामुळें हंसून मुरकुंडया वळतात अशी कोणी त्याची जरी अज्ञानानें

वाखाणणी करीत असेल तरी जाणत्यांनीं त्यासंबंधीं सत्य कल्पना निर्विकारपणें प्रसृत केली पाहिजे.

× × × ×

अशी ही दृष्टि ठेवून गडकऱ्यांच्या विनोदाचें निर्विकार मनानें व समतोल बुद्धीनें विवेचन करावयाचें म्हणजे **आजच्या काळांत** अत्यंत धाडसाचें काम आहे. आज गडकरी कांहीं एका विशेष गोष्टींकरितां प्रसिद्ध असतील तर ते विनोदाकरितां प्रसिद्ध आहेत. गडकऱ्यांच्या विनोदपद्धतीचा एक सांप्रदाय बनत चालला असून सांप्रदायाच्या अभिमानानें त्यांच्या भक्तांनीं ठिकठिकाणीं जाऊन आपल्या सांप्रदायाचीं स्तुतिस्तोत्रें गाण्याचा प्रघात चालू केला आहे. अशा स्थितींत गडकऱ्यांच्या विनोदाविषयीं आजपर्यंत निघत असलेल्या सुराशीं विसंवादी असा सूर मीं काढल्यास सांप्रदायिकांकडून तर मजवर काहूर होईलच; परंतु इतरही कांहीं थोडीथोडकी मंडळी मजवर डोळे वटारणार नाहींत. आणि म्हणूनच मी माझ्या प्रयत्नाला धाडस म्हणतों. तथापि गडकरीवाङ्मयाचा मी आज सतत पांच वर्षें अत्यंत सूक्ष्मपणें अभ्यास करण्याचा प्रयत्न करीत आलों आहें; त्यांचीं नाटकें या अभ्यासाच्या दृष्टीनें रंगभूमीवर मीं अनेक वेळां पाहिलीं आहेत. आणि त्यानंतर त्यांच्या विनोदाविषयीं जें माझें मत झालें तें अनेक दृष्टीनीं

मराठी ग्रंथ संग्रह नं. ... ता. ...

पहातां जनतेस — निदान जाणत्या जनतेस — विदित करण्याची आतां वेळ आली आहे असें माझें प्रामाणिक मत झाल्यामुळें मी हें धाडस करण्यास प्रवृत्त झालों आहें.

\+ \+ \+ \+

सांप्रदायिकांच्या दृष्टीनें गडकऱ्यांचा विनोद कसा आहे हें प्रथम पाहूं. मग त्यांच्या या दृष्टींतील योग्यायोग्यता तपाशीत जातां जातां प्रस्तुत विषयाची सांगोपांग चर्चा सहजच होईल. सांप्रदायिकांचें मत एका भारदस्त गृहस्थानें अगदीं भारदस्तपणानें दोन ठिकाणीं व्यक्त केलें आहे. **प्रि. गोविंद चिमणाजी भाटे** हे प्रेमसंन्यासाच्या पहिल्या आवृत्तीच्या आपल्या प्रस्तावनेंत ( पृष्ठ ५ ) म्हणतात,

> या नाटकांतील विनोद तर इतका उत्तम साधला आहे कीं, त्याची स्तुति करावी तितकी थोडीच होईल. या विनोदाची खुबी ही आहे कीं, त्यांत **अश्लीलपणाचा, फाजीलपणाचा, बीभत्सपणाचा,** कुत्सितपणाचा **किंवा हिडिसपणाचा अंश सुद्धां नाहीं.** आजपर्यंतच्या बहुतेक नाटकांतील विनोदांत वरच्यापैकीं कोणता तरी दोष आहेच. परंतु असा **निर्दोष,** असा आनंद देणारा व असा उच्च दर्जाचा **विनोद** क्वचित दृष्टीस पडेल. या दृष्टीनें रा० गडकऱ्यांचें गोकुळ हें पात्र म्हणजे प्रतिभाशक्तीचा अद्वितीय **मासला** आहे असें म्हटल्यावांचून रहावत नाहीं.

नंतर दुसऱ्या आवृत्तीच्या प्रस्तावनेमध्यें ( पृष्ठ १० ) १९२२ सालीं प्रि. भाटे पुन्हां लिहितात,

> कै. गडकऱ्यांच्या नाटकपंचकांतला तिसरा विशेष म्हणजे त्यांचीं विनोदी पात्रें ----. इतर नाटककारांचीं पात्रें नुसता पाचकळपणा करून किंवा धांगडधिंगा घालून किंवा **शब्दांवर शुष्क कोट्या** करून किंवा शेवटीं बीभत्स व अश्लील गोष्टींचा आश्रय करून प्रेक्षकांना हंसवितात; म्हणजे इतर नाटककारांचा विनोद फार हलक्या दर्जाचा आहे तर गडकऱ्यांचा विनोद फार उच्च दर्जाचा आहे. गडकऱ्यांचा विनोद अर्थचमत्कृतीनें आनंद देतो; त्याला **अश्लीलपणाचा किंवा बीभत्सपणाचा वास सुद्धां येत नाहीं** ----. गडकऱ्यांचा विनोद खरोखर शुद्ध, सात्त्विक, आनंद देणारा आहे. या बाबतींत गडकऱ्यांनीं शेक्सपीयरच्या वर कडी केली आहे असें मोठ्या अभिमानानें म्हणतां येतें. शेक्सपीयरच्या नाटकांत विद्यार्थी विद्यार्थिनींनीं न वाचण्यासारखे पुष्कळ भाग आहेत व म्हणूनच शेक्सपीयरच्या शाळेंत वाचण्यालायक अशा निराळ्या आवृत्त्या काढाव्या लागल्या आहेत. गडकऱ्यांच्या बाबतींत एखाद दुसऱ्या ठिकाणाखेरीज अशा आवृत्ति काढण्याची आवश्यकता वाटणार नाहीं असें वाटतें. **शेक्सपीयरच्या काळीं लोकांची अभिरुचि अश्लीलप्रिय होती म्हणून शेक्सपीयरला अश्लील प्रकार आपल्या नाटकांत नाइलाजानें आणावे लागले असें**

शेक्सपीयरच्या तर्फेनें म्हणण्यांत येतें. पण तसें पाहिलें असतां महाराष्ट्रांतील लोकांची अभिरुचि शेक्सपीयरच्या काळच्या लोकांच्या अश्लीलप्रियतेपेक्षां कमी आहे अशांतील भाग नाहीं. पण शेक्सपीयर जसा त्या काळच्या अभिरुचीला खुशी राखण्याच्या मोहाला बळी पडला त्याप्रमाणें गडकरी मोहाला बळी पडले नाहींत म्हणून गडकऱ्यांनीं शेक्सपीयरवर कडी केली असें मला वाटतें.

शेक्सपिअरपेक्षांही गडकऱ्यांना वर नेऊन बसविल्यानंतर यापेक्षां जास्त असें त्यांच्या स्तुतिपर कोणी सांप्रदायिक लिहूं बोलूं शकेल असें वाटत नाहीं. तेव्हां आतां केवळ समतोल दृष्टीनें विचार करणाराला हाच विनोद कसा दिसतो हें पाहून मग या दोन दृष्टींतील योग्यायोग्यता पारखणें सुलभ जाईल.

मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद क्र.

## प्रकरण दुसरें

### वाग्वैजयंती व विनोदी लेख

गडकऱ्यांच्या नाटकांव्यतिरिक्त इतर वाङ्मयाचा विचार आधीं निराळा केल्यास नाटकांचा विचार साकल्यानें करणें सुलभ व सोयस्कर होईल. नाटकांव्यतिरिक्त गडकऱ्यांचें इतर वाङ्मय म्हणजे त्यांचे विनोदी लेख व वाग्वैजयंती.

वाग्वैजयंतीचा विचार प्रथम केला तर या ठिकाणीं कांहीं गडकरी विनोदी म्हणून चमकत नाहींत असें दिसून येईल. लहान मोठ्या सुमारें १५० कवितांचे चुटके वाग्वैजयंतींत प्रसिद्ध झालेले आहेत; पण त्यांमधून ५ किंवा ६ पेक्षां जास्त चुटके कांहीं विनोदी म्हणून दाखवितां येत नाहींत. यांत **काय करावें ?** ( पृष्ठ १० ) ही कविता क्रमाप्रमाणें प्रथम येते. सर्व संकटांना तोंड देतां येईल पण तोंडाळ बायको कडकडून आली असतां कांहीं उपाय कवीस सांपडत नाहीं; हा

या कवितेचा विषय. येथें विषयांत कवि-सहज असा द्रष्टेपणा कांहींच नसल्यानें काव्यांत मन रमत नाहीं; आणि कल्पना विसंगत, असंबद्ध किंवा अपूर्व नसल्यानें विशेष हर्षरोमांचही उपस्थित होत नाहींत. गडकऱ्यांच्या अतिशयोक्तीच्या संवयीचा हा एक नमुना आहे इतकेंच. गडकऱ्यांनीं यशवंतराव खऱ्यांचे गुरु श्रीधरपंत यांजकडे जरा नजर टाकली असती तर त्यांस इतकें निराश होण्याचेंही कारण नव्हतें.

नंतर सुप्रसिद्ध **गुलाबी कोडें** (पृष्ठ ५० ) पहा. यांतील कल्पना प्रो. सबनिसांसारख्यांस बाष्कळपणाची वाटली तरी रसिकांस तिजपासून आनंद होईल यांत संशय नाहीं. फक्त आहे यापेक्षां जास्त मुग्ध रीतीनें, आणि एवढी लांबलचक हकिकत देत बसण्याऐवजीं सूचक व ध्वनिपूर्ण अशा एक दोन श्लोकांतच ती व्यक्त झाली असती तर जास्त बहारीची वठली असती एवढेंच रसिक म्हणतील. या कवितेंत पुष्कळांना विनोद दिसतो; व पतीनें पत्नीचें तोंड बंद केल्याबद्दल पुष्कळजण हर्षित होतात. परंतु या ठिकाणीं विनोदापेक्षां शृंगारच कवीला जास्त अभिप्रेत आहे यांत शंका नाहीं; व मन हर्षित होत असलें तरी तें विनोदाकरितां नसून कवीच्या शृंगारदर्शनाच्या चातुर्यामुळें होतें हें ध्यानांत ठेवलें पाहिजे. पत्नीचें तोंड बंद करून कशी गंमत झाली हें

दाखविण्याचा कवीचा येथें खास उद्देश नाहीं; तर पतिपत्नीमधील नाजूक विप्रलंभाचें हें एक कवीच्या दृष्टीनें पाहिलेलें दृश्य आहे.

नंतर **विहिर्णींचा कलकलाट** ( पृष्ठ १५२ ) घ्या. या ठिकाणीं तर अतिशयोक्तीचा कळस आहे. जगांतील सर्व आवाज एकत्र केले असतांही त्यांच्याच्यानें विहिर्णींच्या कलकलाटाशीं बरोबरी होणार नाहीं असें म्हणणें म्हणजे निवळ थट्टा आहे; व थट्टा किंवा उपहासमिश्रित विनोद सहृदय वाचकांना कधीं आजपर्यंत पटला नाहीं व पुढेंही पटणार नाहीं.

या उपहासमिश्रित विनोदाचेंच आणखी एक उदाहरण म्हणजे **हुकमे हुकूम** (पृष्ठ १४९) ही कविता. प्रतिभास्फूर्ति झाली नसतांही आज्ञेबरहुकूम कविता करावयास बसणें ही यांतील विषयीभूत कल्पना खरोखरच काव्यमय व विनोदपूर्ण आहे. रहाळकरांनीं **बसे कविता खोलींत लिहायाला** या आपल्या चुटक्यांत ही कल्पना अत्यंत मनोहर तऱ्हेनें मांडली आहे. पण गडकऱ्यांच्या कवितेंतील रांठ व व रुक्ष रचनेमुळें काव्य तर प्रतीत होत नाहींच; उलट साकीच्या मुशींत ओतलेलें हें गद्य कानाला बोंचल्याशिवाय मात्र रहात नाहीं; आणि विनोदाविषयींच म्हटलें तर जातां जातां खास अंक काढणाऱ्या मासिकांवर तीक्ष्ण टीका केल्यामुळें अशा संपादकांची चेष्टा करण्याकरितां हें काव्य लिहिलें आहे कीं प्रतिभास्फूर्तीखेरीज काव्य रचण्याच्या नसत्या धडपडीविषयीं तें लिहिलें आहे

त्याबद्दल मन भिन्न विचारांनीं व्यग्र होऊन विनोदप्रतिपत्ति मुळींच होत नाहीं.

अशाच प्रकारची आणखी एक कविता म्हणजे **एक समस्या** ( पृष्ठ १५५ ) ही होय. गडकऱ्यांच्या सांप्रदायिकांना या कवितेंत अत्यंत बहारीचा विनोद दिसतो व तसें ते जाहीरपणें प्रतिपादनही करतात. गडकऱ्यांच्या कवितेंत विनोदस्थळ नाहीं असें कोणीं म्हटलें तर कोणती तरी एखादी कविता घेऊन हा पहा विनोद असें दाखविण्याची सांप्रदायिकांची ही धडपड पाहून खरोखर कौतुक वाटतें. गडकऱ्यांच्या ज्या कित्येक चांगल्या कविता आहेत त्यांपैकीं एक समस्या ही आहे. मानव प्राण्याची अत्यंत स्वार्थी वागणूक हा या कवितेचा गंभीर व खोल विषय. घरांतून बाहेर पडतांच वृद्ध विधवा दृष्टीला आली तर तिजविषयीं अनुकंपा वाटत नाहीं; उलट तिरस्कार येतो. गरीब कुणबी पत्र वांचून दाखविण्याची विनंति करीत असतां त्याच्याबद्दल जिव्हाळा वाटण्याऐवजीं त्याचें पत्र चिटोरें म्हणून ताठ्यानें फेकून देण्यांत येतें. असेच खरोखर करुणा उत्पन्न करणारे प्रसंग दिसले तरी मन विरघळत नाहीं; आणि एक सुंदर तरुण विधवा दत्ताच्या देवळांत दिसतांच हृदय अनुकंपेनें भरून येतें, आमच्या धर्माबद्दल तिटकारा येतो व एकदम सुधारणेचें भरतें येतें; हा या कवितेचा सारांश; व तिचा शेवटही गोविंदाग्रजांनीं आपल्या प्रतिभेनुरूप गंभीर अशा

अनुष्टुप छंदांत केला आहे. इतक्या या मर्मभेदी व गंभीर कवितेंत गडकऱ्यांच्या ज्या सांप्रदायिकांना विनोद दिसतो त्यांना गडकऱ्यांचें रहस्य कळलेंच नाहीं व नुसती गडकऱ्यांची स्तुति करून तें कवींच कळणार नाहीं असें म्हणणें भाग आहे.

शेवटीं आणखी एकच कविता राहिली. आणि तिजमध्यें विनोद पुष्कळच प्रकर्षानें आहे. ही कविता म्हणजे **चिंतातुर जंतु** ( पृष्ठ ३५ ). या कवितेंतही गडकऱ्यांच्या नैराश्यपूर्ण गांभीर्याची छटा नाहीं असें नाहीं. तथापि कवीनें पुष्कळच हलक्या अंत:करणानें लिहिण्याचा प्रयत्न केला आहे यांत संशय नाहीं. जगांत हें काय तें कसें अशी सर्वत्रांनाच शंका असते; परंतु कांहीं कांहींना या शंकांनीं इतकें कांहीं वेड लावलेलें असतें कीं, ते कर्तव्यशून्य होऊन बसतात. आणि जगांत आंबट तोंड करून राहाणाऱ्या या अशा मंडळींना हंसावें कीं रडावें हेंच कळत नाहीं. तेव्हां परमेश्वरा या बिचाऱ्यांना अशा संशयावर्तांत कां बाबा ठेवतोस ! एकदां यांना मुक्ति देऊन कायमचे मोकळें कर म्हणजे सुटतील बिचारे; अशी विनंति मोठ्या कुशलतेनें, त्यांच्याविषयीं तिरस्कार जागृत न करतां, किंबहुना जिव्हाळाच उत्पन्न करून कवीनें परमेश्वराला केली आहे; व एकंदरींत काय बोवा हे विक्षिप्त शंकेखोर लोक अशी भावना — परंतु शुद्ध भावना — मनाची

व्हावी अशी कुशल रचना केली आहे. यामुळेंच येथें सात्त्विक विनोदवचन साधलें आहे असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं.

अशा रीतीनें १५० कवितांमध्यें या अवघ्या ५।६ कविता विनोदपर म्हणून दिसतात वा दाखविल्या जातात. पैकीं एकींत विनोद मुळींच नाहीं; एकींत मुग्ध शृंगार आहे; दोन अतिशयोक्तीपूर्ण व काव्यप्रतिभाविहीन असून कंटाळवाण्या आणि उथळ आहेत; एकींत उपहासमिश्र गद्य आहे व एकच विनोदपर आहे; परंतु ती सुद्धां शब्दनिष्ठ विनोदाचें एक उत्तम उदाहरण आहे. भावनानिष्ठ विनोदाच्या कोटींत थोडी ओढाताण केल्याशिवाय कांहीं तिला ढकलतां येणार नाहीं. तसेंच या ५।६ कविता एकंदर २४० पानांच्या या पुस्तकांत अवघ्या ५।६ पानांपेक्षां जास्त पानें अडवीत नाहींत. अशा स्थितींत वाग्वैजयंतींत गडकरी विनोदी कवि म्हणून मुळींच चमकत नाहींत असें म्हटल्यास त्यांत अतिशयोक्ति नाहीं.

× × × ×

आतां विनोदी लेखांचा विचार करावयाचा. त्यांमध्यें **रिकामपणची कामगिरी** हें इतक्या विविध रंगानें नटलेलें पुस्तक आहे कीं, त्यासंबंधीं सांगोपांग चर्चा करण्यास एक स्वतंत्र निबंध पाहिजे. तेवढा अवकाश प्रस्तुत प्रसंगीं खास नाहीं. या ठिकाणीं फारतर त्यांतील सर्व लेखांविषयीं

सर्वसामान्य अशा एकाच मुद्याचें विवेचन करतां येईल; आणि तो हा कीं, त्यांमध्यें उपहासपर व उपरोधिक विनोदाचा प्रकर्ष पहावयास मिळतो. इंग्रजी वाङ्मयांत ॲडिसन, स्टील किंवा लॅंब आणि पीकॉक यांचा विनोद एकीकडे व स्विफ्टचा विनोद एकीकडे अशी तुलना करतात; व स्विफ्टपेक्षां इतरांचा विनोद जास्त चांगला ठरवितात. कारण स्विफ्टचा विनोद उपरोधिक व उपहासात्मक आहे. वस्तुतः हा भेद करणें अत्यंत दुर्घट काम आहे. एखाद्याच्या स्वभावाची लहरी तऱ्हा किंवा अशा माणसाचे इतरांशीं आलेले विक्षिप्त प्रसंग याविषयीं लिहीत असतां त्याची थोडी थट्टा किंवा थोडा उपहास केल्याशिवाय विनोदप्रतिपत्ति होणें खरोखरीच कठीण आहे. यामुळेंच एक विनोद सहृदय म्हणून उच्च, व दुसरा उपरोधिक आणि उपहासात्मक म्हणून त्याज्य, असा नाजूक भेद करणें पुष्कळदां अशक्य होऊन बसतें. स्विफ्टचा मनुष्यजातीविषयींचा तिरस्कार इतका उघडपणें दिसून येणारा आहे कीं, त्याचेविषयीं विचार करतांना हा भेद कोणीही सहज करील. परंतु ॲडिसन किंवा स्टील Sir Roger de Coverley विषयीं लिहीत असतांना उपहासच करतात कीं नाहीं ? Fans विषयीं लिहितांना ॲडिसननें पंखे वापरणारांचा काय कमी उपहास केला आहे ? किंबहुना या उपहासाच्या शस्त्राच्या जोरावरच स्टील व ॲडिसन यांनीं सामाजिक सुधारणा घडवून आणली कीं

नाहीं ? मग त्यांचा विनोद उपहासपर कां म्हणत नाहीं ! असें कोणी विचारलें म्हणजे उत्तर देणें अशक्य नसलें तरी कठिण खास आहे. पण यापेक्षांही जास्त नाजूक पायरीवर जाऊन एखादा विचारूं शकेल कीं, ॲडिसनचा Character of Ned Softley हा लेख घ्या, आणि जॉनसनचा Dick Minim हा लेख घ्या. दोन्ही लेखांची आपापल्या परीं बहारीच्या विनोदाबद्दल ख्याती आहे. मग यांत तुम्हीं सरस निरस कोणत्या दृष्टीनें, कोणत्या कसोटीनें ठरविणार ?

तर अशा प्रश्नांना उत्तर म्हणून साहित्यशास्त्रज्ञांनीं एक कसोटी काढली आहे. ती म्हणजे जिला इंग्रजींत सिंपथी म्हणून म्हणतात ती भावना. या सिंपथीचें भाषांतर मराठींत सरसहा सहानुभूति या शब्दानें केलें जातें. व मूळ शब्दाच्या धात्वर्थाच्या दृष्टीनें तें बरोबरही आहे. परंतु **जिव्हाळा** या मराठी शब्दानें तोच भाव जास्त चांगल्या तऱ्हेनें व्यक्त होईल. अशा रीतीनें वाचकांस ज्या विनोदपर लेखांत वर्ण्य विषयांशीं जिव्हाळा वाटेल, आपलेपणा वाटेल, तो लेख सहृदय विनोदात्मक असें बिनदिक्कत म्हणावें. वर्ण्य विषयाबद्दल उघड तिरस्कार किंवा हेटाळणी तर वाटतां उपयोगच नाहीं. ती तशी वाटेल तर त्या विनोदाला विनोद म्हणण्याऐवजीं निवळ टवाळी म्हणावी लागेल. उलट जिव्हाळा वाटणें हें उत्कृष्ट विनोदाचें मुख्य चिन्ह होय. बरचें सर रॉजर

डी कव्हरलीचेंच उदाहरण घ्या. त्याचा कितीही नाजूक उपहास निबंधकारानें केला असला तरी कव्हरलीविषयींचें आपलें प्रेम नष्ट होत नाहीं. किंबहुना थोडावेळ आपण स्वतःच त्याची भूमिका घ्यावयास नाराज नसतों. नेड सॉफ्टले आणि डिक मिनिम यांमध्येंही हाच फरक आहे. जानसनचे आंगीं टीकाकाराची वृत्ति पूर्ण बाणली असल्यामुळें डिक मिनिमविषयीं तो वाचकांचे मनांत जिव्हाळा उत्पन्न करूं शकत नाहीं; व एखाद्याविषयीं न्यायाधिशाचा निकाल आपण वांचतों कीं काय अशी वृत्ति जानसनच्या या उत्कृष्ट विनोदी लेखाच्या सुद्धां वाचनानंतर झाल्याशिवाय रहात नाहीं. तेंच ॲडिसननें आपल्या प्रतिभाशाली व रमणीय लेखनशैलीनें नेड सॉफ्टलेचें चित्र इतकें मधुर रेखाटलें आहे कीं, आपल्यास नेडचें कौतुक वाटतें व क्षणभर आपण स्वतःही त्याची भूमिका घेण्यास हौसेनें तयार होतों.

निबंधरूप विनोदांत जिव्हाळ्याची ही कसोटी अनेक वेळां लावावी लागते. व ती लावून पहातां रिकामपणच्या कामगिरींतील बाळकरामाचा विनोद खालच्या दर्जाचा ठरतो. महाराष्ट्रीय विवाहपद्धतीसंबंधीं त्यांनीं केलेलें उपरोधिक विवेचन खरोखरच विचारांना चालना देणारें व उद्बोधक आहे. किंबहुना आमच्या विवाहपद्धतींतील अथपासून इतिपर्यंत होणारे एकंदर विक्षिप्त कार्यक्रम

चांगले खऱ्या स्वरूपांत लोकांच्या नजरेंत यावे या हेतूनेंच गडकऱ्यानीं ते कदाचित उपहासानें, तिरस्कारबुद्धीनें व थोडयाशा भडक अतिशयोक्तीनें रेखाटले असावेत असें वाटल्यावांचून रहात नाहीं. परंतु यामुळेंच त्यांनीं उत्पन्न केलेल्या विक्षिप्त पात्रांविषयीं किंवा त्यांच्या परिस्थिति व प्रसगांविषयीं जिव्हाळा वाटण्यापेक्षां मनांत अवहेलनेचीच भावना उत्पन्न होतें. क्वचित त्यांच्या पोशाखांच्या वगैरे वर्णनाचे भाग जेथें आहेत तेथें विनोदप्रसंग आहेत खरे. तथापि त्या ठिकाणींही अनिर्बंध अतिशयोक्ति, चालू अथवा जुन्या रीतीभातींची हेटाळणी किंवा अवहेलना या आणि अशाच दुसऱ्या विसंगत गोष्टींचें मिश्रण करून हे प्रसंगही त्यांनीं वांयाच घालविले आहेत. उपरोधिक टीका करण्याच्या त्यांच्या भूमिकेला हें साजेसेंच आहे; पण त्यामुळें विनोदाची, शब्दनिष्ठ किंवा भावनानिष्ठ विनोदाची, प्रतिपत्ति होत नाहीं हें ध्यानांत ठेवलें पाहिजे.

**स्वयंपाक घरांतील गोष्टी** ज्या प्रसंगानिमित्त लिहिल्या गेल्या त्याचा विचार केला तर, या लेखांत गडकऱ्यांना उपहासच जास्त अभिप्रेत आहे हें सहज ध्यानांत येईल. मनोरंजन मासिकांत घरगुती कामासंबधीं कोणा स्त्रीलेखिकेनें एक दोन लेख लिहिले; तेव्हां असल्या क्षुद्र (?) विषयांवर लेख लिहिले जावे या गोष्टीची टर करण्याच्या हेतूनें गडकऱ्यांनीं

आपल्या स्वयंपाक घरांतील गोष्टी लिहिल्या. त्यामुळें त्यांच्या लिहिण्यांत उपहासाची छटा साहजिकच आली. या लेखाला त्यांनीं जे चार प्रास्ताविक शब्द लिहिले आहेत त्यांत त्यांच्या स्वभावानुरूप अतिशयोक्तीचा व विकृतरूपदर्शनाचा भरपूर सांठा आहे; त्याबरोबरच अलीकडच्या धड ना जुनें आणि धड ना नवें अशा त्रिशंकूवत झालेल्या स्त्रियांच्या संसारांतील वर्तनाचें बरेंचसें मार्मिक विवेचनही येथें आहे. पण तें इतकें बोंचक आहे कीं, विनोदापेक्षां वाचकांची दृष्टि गंभीर विचाराकडेच जास्त वळते. साधारण वाचकांस मात्र हंसून हंसून पोट दुखावयास लावण्याजोगा हा विनोद खास आहे. कारण वर्ण्य विषयाशीं जिव्हाळा वाटत नसला म्हणजे सहजच त्याचा अगदीं विकारशून्य हंशा व्हावयाचाच. यापुढें पक्वान्नांची जी यादी दिली आहे त्यांत गडकऱ्यांच्या स्वतंत्र प्रतिभेचा अंश थोडा आहे. त्यांतील बहुतेक पक्वान्नें आज कित्येक वर्षें अगदीं सर्वसामान्य लोकांच्या सुद्धां परिचयाचीं आहेत. यामुळें त्यांतील शब्दांच्या कोटयांचें श्रेय गडकऱ्यांस मुळींच मिळत नाहीं. आपलें चुलीपुढचें काम संभाळून ज्या वृद्ध आयाबायांनीं या पक्वान्नांचें जतन केलें त्यांना हें सर्व श्रेय आहे. गडकऱ्यांचा मान फक्त संग्राहकाचा आहे.

कवींचा कारखाना हा लेखही पूर्ण स्वतंत्र नाहीं. त्यांतील पुष्कळसा भाग **मराठी रंगभूमि** या अमोल ग्रंथांत व

नाट्यकलारुक्कुठार या टीकाप्रबंधांतील ग. र. इनामदार यांच्या प्रास्ताविक लेखांत पूर्वींच आलेला आहे. त्याचेंच पुष्कळसें विस्तृत चर्वण गडकऱ्यांनीं केलेलें आहे. त्यांतही आधुनिक कवींविषयीं जिव्हाळ्याऐवजीं अवहेलनाच जास्त उत्पन्न केली आहे. या दृष्टीनें विनोदप्रतिपत्तीच्या बाबतींत विवाहविषयक लेखांपेक्षांही हा लेख कमी प्रतीचा आहे. तो वाचतांना सात्त्विक हर्ष वाटत नाहीं. पण आधुनिक कवींविषयीं अपवादाशिवाय सरसहा प्रतिकूल बुद्धि मात्र उत्पन्न होते; आणि ती एका आधुनिक कवीनेंच उत्पन्न करावी या बद्दल उद्वेग वाटल्याशिवाय रहात नाहीं. डिकन्सला सौंदर्यदर्शन नव्हतें असें म्हणतात. गडकऱ्यांच्या बाबतींत तसें म्हणतां येत नाहीं; कारण सिंधूसारखीं त्यांचीं नितांत रमणीय पात्रें आम्हांला लगेच चूप करतील. पण पुढें त्यांच्या नाटकांविषयीं, विशेषत: इंदू बिंदु सारख्या पात्रांविषयीं विवेचन करतांना दिसून येईल कीं, वर्ण्य विषयाचा हिडीसपणा किंवा काळी बाजू दाखविण्याकडे गडकरी फारच वेळां झुकतात. यामुळें मनांत सात्त्विक भाव उत्पन्न होऊन हर्षोल्हास वाटण्याऐवजीं वर्ण्य विषयाबद्दल अवहेलनाबुद्धीच उत्पन्न होते. व ती तशी उत्पन्न करणाराविषयीं विषाद वाटल्यावांचून रहात नाहीं.

रिकामपणच्या कामगिरींत स्विफ्टच्या गलिव्हर्स ट्रॅव्हल्स

मधील बोंचक उपरोधिकपणा खेंचून भरला आहे. आणि त्याला अवहेलना व टवाळी यांचें स्वरूप कवींच्या कारखान्यांत आलें आहे. ॲडिसनचा नेड सॉफ्टले किंवा जॉन्सनचा डिक मिनिम हे लेखही कवींच्या कारखान्याच्या स्वरूपाचेच आहेत; किंबहुना नेड सॉफ्टलेमधील कल्पना कवींच्या कारखान्याला आधारभूत असण्याचाही संभव आहे. या दोन लेखांत ॲडिसनच्या लेखानें वाचकाचें मन हळुवार बनतें यांत संशयच नाहीं. रमणीयता व नाजूकपणा हे ॲडिसनचे गुणच तसे आहेत. रांकट व टीकाप्रिय जॉन्सनच्या डिक मिनिमबद्दल सुद्धां थोडें कौतुक वाटल्यावांचून रहात नाहीं. परंतु कवींच्या कारखान्यांत ( यांतील कारखाना हा शब्दच किती दुष्ट आहे. ) जिव्हाळा नाहीं, कौतुक नाहीं; तर निवळ टवाळी आहे. आणि तीही निर्दयपणानें केलेली आहे. स्वयंपाकघरांतील गोष्टींमधील पक्वान्नांत स्वतंत्रपणा मुळींच नाहीं; व प्रस्तावनेंत उपरोध फार. यामुळें या लेखांतही तितकी विनोदप्रतिपत्ति होत नाहीं. रिकामपणाची कामगिरी या निबंधाचें इतर दृष्टया महत्त्व फार आहे. त्यांतील ठसकेदार भाषा, उपरोध करण्याचें उच्च सामर्थ्य, उपरोधाच्या मागील सुधारणेविषयींची कळकळ व क्वचित प्रसंगीं भरमसाट अतिशयोक्तीही शक्य कोटींत आणून ठेवण्याचें धाडस, या गोष्टी खरोखरच वाखाणण्याजोग्या व अभिमानास्पद

आहेत; व पुस्तकांत शब्दनिष्ठ किंवा भावनानिष्ठ विनोद शुद्ध स्वरूपांत नसल्यामुळें त्या दृष्टीनें पुस्तक कमी प्रतीचें आहे असें म्हटल्यानें त्याची किंमत कमी होते असेंही नाहीं. पण गडकऱ्यांच्या विनोदाविषयींच बोलत असतांना लक्ष केंव्हांही झालें तरी विनोदबाह्य विषयाकडे जाणार नाहीं हें सहज आहे. आणि निवळ विनोदापुरतेंच पाहिलें तर वरच्यासारखें हीनत्वदर्शक विधान करणें भाग आहे.

यांखेरीज जे विनोदी लेख आहेत त्यांतील कित्येक अपूर्ण व बहुतेक अगदींच क्षुद्र आहेत. तेंव्हां त्यांच्या विषयीं चार सामान्य विधानें थोडक्यांत करून नाटकांकडे दृष्टि वळविण्यास हरकत नाहीं.

**नाटक कसें लिहावें** यांत अण्णा किर्लोस्करांची आदरशून्य थट्टा गडकऱ्यांनीं निष्कारण केलेली आहे. पोपच्या एका निबंधाच्या धर्तीवर केलेलें प्रस्तावनेसंबंधींचें मार्मिक विवेचन फक्त बाद केलें म्हणजे यांत मग अतिशयोक्ति आणि थट्टा यांखेरीज कांहीं उरत नाहीं. शेवटीं तर शंकर पार्वती आणि ब्रह्मदेव सरस्वती यांच्याविषयींच्या हिडीस कल्पनांत लेखाची परिणति झाली आहे.

**छोटया जगूच्या रिपोर्टांत** हंसण्याजोगें कांहींच नाहीं. कावळयाच्या दृष्टीनें लिहून मोठया माणसानें छोटयावर लादलेला हा एक बाष्कळपणा आहे.

**नाटक कसें पहावें** या लेखाची उभारणी पहावें या एका शब्दावरील कोटीवर आहे. अतिशयोक्ति व एकच विषय पिंजण्याची खोडी हींच या लेखाचा विशेष होत. त्यांतच स्पष्ट व सहज समजणारी भाषासरणी न साधल्यामुळें कल्पनामधील विसंगतीही लवकर लक्षांत येत नाहीं. तसेंच नेहमींच्या वृत्तीप्रमाणें जगांतील सर्वच गोष्टींची हेटाळणी करण्याची प्रवृत्तीही येथें आहेच. राष्ट्रीय सभा, राजकीय पक्षोपपक्ष, बहिष्कारादि चार ठराव, यांची टवाळी यथेष्ट करून वर 'या चार ठरावांचा असा दुरुपयोग करतांना मला मनापासून वाईट वाटत आहे' अशी निर्घृण टीप या निबंधांत गडकऱ्यांनीं मारली आहे. एखादी गोष्ट पिंजण्याच्या प्रवृत्तीचें उदाहरण म्हणजे नटाशीं वागण्याच्या पद्धतीचें कोष्टक ! स्विफ्ट्नें पॅर्ट्रिजवर जे एक दोन लेख लिहिले त्यांची आठवण हा लेख वाचून होते. त्यांतच शेवटीं शेवटीं लेखाला एकदम गंभीर वळण दिल्यामुळें विनोदाचा सर्व हेतूच फसल्यासारखा झाला आहे. डीफोचा A Quack Doctor वरील निबंध आणि ॲडिसनचा Lions वरील निबंध हीं इंग्रजी वाङ्मयांत लेखाला शेवटीं गांभीर्य प्राप्त झाल्यामुळें हास्यभावनेचा भंग झाल्याचीं प्रसिद्ध उदाहरणें आहेत.


**प्रमादपंचदशी** हा लेख त्यांत जरी मधून मधून कोट्या

सांपडल्या आणि शब्दार्थाची ओढाताण असली तरी विनोदी नाहीं. नेपथ्यविधानांतील चुका दाखवून दुसऱ्यास उपदेश करणारा अगदीं गंभीर स्वरूपाचा असा हा लेख आहे.

**दीडपानी नाटक** उपदेशपर आणि उपहासमिश्रित आहे. प्रो. कोटिबुद्धे आठ महिन्यांच्या बालकाशीं युक्तिवाद चालीत आहेत हा प्रसंग विनोदपूर्ण पण अतिशयोक्तीचा आहे. बाकी शेवटचा प्रसंग ठीक आहे.

**सकाळचा अभ्यास** हें गडकऱ्यांच्या प्रतिभेचें अत्यंत विशुद्ध व रमणीय असें बालक आहे. याला अतिशयोक्तीचा किंवा बाष्कळपणाचा वास नाहीं. यांत कोटया किंवा श्लेष नाहींत, शब्दांचीं किंवा कल्पनांची कसरत नाहीं. तर दोन अजाण परंतु निष्कपटी बालकांची ही यथार्थदर्शित अशी हृद्य क्रीडा आहे. कवि या क्रीडेबरोबर स्वतःच नाचतो आहे असा या ठिकाणीं भास होतो. सात्त्विक विनोद आणि तोही अत्युच्च करण्याची गडकऱ्यांची शक्ति किती निर्मर्याद आहे हें यावरून उत्कृष्ट प्रत्ययास येतें; व त्यावरूनच गडकरी यांनीं इतर ठिकाणीं आपल्या प्रतिभेचा पुष्कळ अंशीं जाणून बुजून दुरुपयोग केला असें म्हणण्यास आधार मिळतो.

**मुंबईतील लेखन** या निबंधास पुरेशी सुरवातही झालेली नाहीं. पण त्यांत गडकऱ्यांच्या धाडसी अतिशयोक्तीचें एक उत्तम उदाहरण सांपडतें. आपल्या मुंबईच्या खोलीचें




असें चित्र देऊन मोरी ‘ अ ’नें दर्शविलेली जागा व्यापून होती असें ते लिहितात. स्पष्टीकरणार्थ त्यांचाच उतारा पहा,

‘ अ ’ तुकडा मोरीचें खोलीशीं प्रमाणशीर क्षेत्रफळ दाखवीत असून ‘ ब ’ तुकड्यावर माझ्या ट्रंकेची बैठक आहे. ‘ ब ’ तुकडा दाराशीं असल्यामुळें त्यांत माझी बैठक, वळकटी वगैरे लावणें शक्य नव्हतें. शिवाय ‘ ब ’ व ‘ ड ’ हे तुकडे सारखेच लहान व आकुंचित ! “ एक्सपेरिमेंट ” साठीं ‘ ड ’ तुकड्यांत सतरंजी अंथरून निजून पाहतांच कळून आलें कीं, त्या कबरस्थानांत माझा साडेतीन हात देह छापखान्यांतल्या “ लेडा ” प्रमाणें इतका “ फिट्ट ” बसला कीं, जराशी शारीरिक हालचाल करितांना भिंतीकडून किंवा मोरीच्या कठड्याकडून जोराचा प्रतिकार होणार.

जॉनसनच्या गॅरटसवरील निबंधांतील उत्कृष्ट विनोद कोणीकडे आणि तत्सदृश अशाच विषयावरील हा पोरकटपणा कोणीकडे. असें हें गडकऱ्यांच्या किरकोळ लेखांतील विनोदाचें स्वरूप आहे. आणि त्यांत गडकरी विनोदी म्हणून फारसे चमकत नाहींत. **मूकनायक** हें दीड पानी नाटक मुद्दाम तसेंच ठेविलें आहे. त्याचा विचार योग्य स्थळीं होईलच.

## प्रकरण तिसरें

### वेडयांचा बाजार

आतां यापुढें नाटकांची चर्चा करण्यास हरकत नाहीं. काव्य किंवा गद्य लेख यांपेक्षां गडकऱ्यांच्या नाटकांतील विनोदाचा परिचय मराठी जाणणारांना अधिक आहे. तसेंच नाटकांतील विनोदासंबंधींच गडकऱ्यांची सर्वत्र स्तुति होत असते. अर्थात असें होणें अगदीं साहजिकच आहे. वाचकांची संख्या नाटक पहाणारांच्या संख्येपेक्षां केव्हांही झाली तरी कमीच; आणि प्रत्यक्ष रंगभूमीवर पाहिलेल्या प्रसंगांचा ठसाही नेहमीं जास्त स्पष्ट व चिरंतन असणार. शिवाय गडकऱ्यांच्या नाटकांमध्यें कांहीं कांहीं प्रसंगीं अत्युत्कृष्ट विनोदाचे मासले मिळत असल्यामुळें मार्मिक प्रेक्षक वाचकांनाही भारल्यासारखें होतें. तेव्हां इतक्या सर्वांचा पाठिंबा मिळाल्यावर नाटकें पहाणाऱ्या शेंकडों रसिक (?) लोकांचें बहुमत

चार विरोधी टीकाकारांच्या तोंडावर टाकून त्यांना मूर्ख म्हणून बाजूस सारणें ही गोष्ट सांप्रदायिकांना सुलभ जाते यांत काय नवल! आणि म्हणूनच नाटकांतील विनोदासंबंधीं सत्यकथन हें जास्त अडचणीचें व टीकाकाराला पुष्कळांच्या रोषास पात्र करणारें आहे. तथापि निर्विकार मनानें नाटकांत काय आढळतें हें पहावयाचें व जें खरें दिसेल तें सांगावयाचें असा संकल्प असल्यानें कोणाची भीडभाड धरून चालणार नाहीं.

नाटकांसंबंधीं विचार करतांना चर्चेची मांडणी कशी करावी हा एक अडचणीचा प्रश्न आहे. सर्वच नाटकें एकदम घेऊन निरनिराळे गुणदोष दाखवीत गेलें तर सोयीच्या व स्थळमर्यादेच्या दृष्टीनें तें जास्त बरें असें वाटतें. उलटपक्षीं प्रत्येक नाटकाचा स्वतंत्र विचार केल्यास निरनिराळीं नाटकें वाचणारांची सोय होऊन शिवाय प्रत्येक नाटकाच्या कमी अधिक दर्जासंबंधीं स्वतंत्र विवेचन करावयास सांपडेल. यामुळें शेवटीं पुन्हां सर्व नाटकांचें सिंहावलोकनात्मक विवेचन थोडक्यांत कां होईना पण करून द्विरुक्ति पतकरावी लागेल हें खरें. तथापि दुसरा मार्गच वाचकांच्या सोयीचा वाटून हा द्विरुक्तिदोष मीं पतकरण्याचें ठरविलें आहे.

नाटकांचा पृथक पृथक विचार करावयाचा म्हणजे तो कालानुक्रमानुसार करणें हेंच जास्त युक्त ठरेल. गडकऱ्यांच्या

नाटकांचा लेखनदृष्टया कालानुक्रम ठरविण्याचा प्रयत्न त्यांच्या भक्तांपैकीं कोणीं केल्याचें माझ्या पहाण्यांत नाहीं. म्हणून माझ्या पुरताच केवळ आंतील पुराव्यावरून मीं पुढील क्रम ठरविला आहे. (१) वेडयांचा बाजार (२) प्रेमसंन्यास (३) पुण्यप्रभाव (४) राजसंन्यास (५) एकच प्याला (६) भावबंधन. अर्थात हा क्रम कां व कसा बसविला हें सांगण्याचें प्रस्तुत स्थळ नाहीं. आणि कदाचित प्रत्यक्ष पुराव्यामुळें त्यांत बदल होण्याचा संभव आहे ही गोष्ट माझ्या ध्यानांत आहे.

× × × ×

अर्थात वेडयांच्या बाजाराचा प्रथम विचार करावयाचा. हें नाटक अपुरें आहे व गडकऱ्यांनीं तें अगदीं अपरिपक्व स्थितींत लिहिलें आहे. तथापि त्यांतही गडकऱ्यांच्या विनोदांतील गुणदोष बऱ्याच स्पष्ट स्वरूपांत आहेत. हें नाटक वाचलें आणि प्रि. भाटे यांची प्रेमसंन्यासाची प्रस्तावना पाहिली म्हणजे प्रिन्सिपालसाहेबांच्या नजरेस तें आलें होतें कीं नाहीं याची जबरदस्त शंका उत्पन्न होते. 'इतर नाटककारांचीं पात्रें निवळ पाचकळपणा करून किंवा शब्दांवर शुष्क कोटया करून प्रेक्षकांना हंसवितात,' असा बाकीच्या नाटककारांवर सरसहा शेरा मारून भाटयांनीं गडकऱ्यांना मात्र निराळ्या व उच्च स्थानीं

बसविलें आहे. पण सदर नाटकाच्या दोन अंकांपैकीं अर्धा एक प्रवेश सोडून दिला म्हणजे उरलेला विनोद हा निवळ धांगडधिंगा आणि पांचट व शुष्क कोटया यांचाच बाजार आहे. अश्लीलपणाची फोडणीही मधून मधून त्यांत नाहीं असें नाहीं. फक्त या बाबतींत गडकरी अद्याप इतके निर्ढावलेले दिसत नाहींत एवढेंच.

वेडयांच्या बाजाराचे पहिले दोन प्रवेश अगदीं संथपणाचे आहेत. त्यांतल्या पहिल्या प्रवेशावरून नाटकरचनेचें कौशल्य गडकऱ्यांच्या आंगीं उपजतच मोठया प्रमाणांत होतें हें सहज ध्यानांत येतें. दुसऱ्या प्रवेशांत नणंदाभावजयांचा संभाषणप्रसंग सहृदय साधला आहे. पण तो स्वतंत्र नसून नाटककार सौभद्राचें अनुकरण करीत आहे हें या ठिकाणीं स्पष्ट दिसून येतें. रुक्मिणी आणि सुभद्रा यांच्यामध्यें विनोदात्मक संभाषण उठवून देतांना मानवी स्वभावदर्शनाचें जें सामर्थ्य किर्लोस्करांनीं दाखविलें आहे त्या सामर्थ्यापासून गडकरी अद्याप बरेच दूर आहेत ही गोष्टही येथें पटल्यावांचून रहात नाहीं.

पण तिसऱ्या प्रवेशांत प्रवेश केला कीं, आपण एखाद्या खेडवळ व संस्कृतिहीन अशा अशिक्षित नाटककारानें लिहिलेलें कांहीं तरी वाचीत आहों कीं काय असें वाटल्याशिवाय रहात नाहीं. कदाचित पडद्याआड नाटकी पात्रांमध्यें अशा प्रकारचे

धांगडधिंग्याचे व बाष्कळपणाचे प्रसंग नेहमीं घडत असतील आणि हा प्रवेश त्यांचें यथार्थदर्शनही असेल. पण त्यांत सहृदयपणा, खोलपणा, औचित्य अथवा अर्थगौरव यांचा बिलकुल वास नसून नाटकाशीं तर त्यांचा संबंध जवळ जवळ कांहींच नाहीं. 'अरे कां त्रास देतोस मर्दा' हें देशपांडे या विदूषकी थाटावर रेखाटलेल्या पात्राचें पहिलेंच भाषण ऐकलें किंवा वाचलें कीं कशी किळस येते; आणि आपण उनाड, चवचाल व अक्कलशून्य अशा पोरांच्या अड्ड्यांत आलों असून येथून केव्हां एकदांची सुटका होते असें वाटूं लागतें. पण त्याऐवजीं पुढें हा प्रकार वाढतच जातो. 'तालीम नाहीं आखाडा,' 'नाद नाहीं आवाज,' 'दंड कां हांत,' 'मान कां कंबर,' 'नांव नाहीं होडी,' 'पूज्य कां शून्य,' 'पाठ कां पोट,' 'मध्यम कां उत्तम,' 'गुरू कां जनावर,' 'कडी कां कुलूप,' 'खल कां बत्ता,' 'सही नाहीं शिक्का,' अशा कोटयांचा (?) एकसारखा नेटानें मारा होऊं लागला आणि त्यांत आणखी इतरांचीही भर पडूं लागली म्हणजे मन विरस होतें व देशपांडयासारखा एखादा मनुष्य आपल्या घरीं असता तर त्याला आपण प्रथम चाबकानें चांगलें लंबें केलें असतें, पण नाटकांत ती गोष्ट शक्य नाहीं म्हणून वाईट वाटतें.

गडकऱ्यांच्या सांप्रदायिकांना या कोटयांत काय रस आढळत असेल तो त्यांचा त्यांनाच ठाऊक. वास्तविक पहातां ही

निरर्थक आणि बावळट वटवट म्हणजे प्रतिभाशून्यतेचा एक उत्कृष्टतम मासला आहे. गडकऱ्यांनाही ही गोष्ट पटली असावी. कारण अनिवार कोटीबाजपणा चालू ठेवून सुद्धां त्यांनीं असल्या हीन भारुडाचा पुढें कधींहीं अंगिकार केला नाहीं.

पण गडकऱ्यांच्या ज्या विनोदी कोटयांमुळें लोकांनीं पोट धरधरून हंसणें अपरिहार्य आहे असें पुष्कळांना वाटतें त्या कोटया या नव्हत. त्या कोटया म्हणजे शब्दाचा अर्थ चटकन पालटून त्याच्या दोन किंवा अधिक अर्थांवर कसरत करून श्लेषात्मक चमत्कृति ज्यांमध्यें केलेली आहे अशा कोटया होत. गडकऱ्यांच्या अर्ध्याहून अधिक विनोदाचा भार या अशा कोटयांनीं उचललेला आहे. हा कोटयांचा प्रसार मराठींत जारीनें असा सुरू केला श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांनीं. पण या बाबतींत शिष्यानें गुरूला फारच मागें टाकलें व असें करतांना गुरूच्या भांडवलावर पोट भरण्यासही मागें पुढें पाहिलें नाहीं.

वस्तुतः भावनानिष्ठ विनोदापेक्षां निवळ कोटीचा दर्जा पुष्कळच खालचा असला तरी अवधान राखून केलेली कोटीही पुष्कळदां चांगली हास्यानंदकारक होईल. आणि चांगली कोटी करण्यालाही सामान्य बुद्धि लागते अशांतला भाग नाहीं. पाहिलेंच तर हा सर्व बुद्धीचा खेळ आहे व त्यांतही अनेक अवधानें संभाळलीं पाहिजेत. त्यांत पहिलें अवधान म्हणजे

औचित्य राखलें पाहिजे. नाहींतर उद्यां सर्वच नाटकांतील सर्वच पात्रें एक सारख्या कोटयाच करीत बसलीं तर त्यामुळें विनोद उत्पन्न होण्यापेक्षां स्वत: नाटककारच हास्यविषय होऊन बसेल.

औचित्य साधावयाचें म्हणजे प्रथम स्थळ आणि काळ हीं ओळखून मग कोटी कोणा पात्राच्या तोंडीं घातली पाहिजे. नाहीं तर इकडे नायिकेचा प्राण जातो आहे आणि दुसरीकडे नायक कोटया करतोच आहे असा हास्यास्पद प्रसंग व्हावयाचा. स्थळकाळाबरोबर पात्राचा स्वभावही लक्षांत घेतला पाहिजे. गडकऱ्यांच्या कोटयांवर आक्षेप घेतांक्षणींच त्यांचे भक्त एकदम उलटून विचारतात, 'तुमचा शेक्सपिअर नाहीं कां कोटया करीत! रोमिओ आणि ज्यूलिएटमधील मर्क्यूशियो कोटया करतो नाहीं तर काय करतो?' पण यावर उत्तर एवढेंच कीं शेक्सपिअरच्या कोटया स्वभावानुरूप असतात. ऊठ बसल्या प्रत्येक पात्र कोटया करीत नाहीं. अगदीं हीच गोष्ट आमच्या इकडचे पुष्कळ नाटककार विसरतात. सदासर्वकाळ कोटीबाज असा एखादा मनुष्य नाटकाच्या लहानग्या जगांत सुद्धां असूं शकेल; किंबहुना मेझर फॉर मेझरमधील बेनेडिक आणि बिआट्रिस किंवा आपल्या कडील विचित्र आणि लीला यांच्यासारखें शब्दास शब्द आणि टोल्यास टोला करणारें युग्मही क्वचित – पण फारच

क्वचित – सांपडेल. परंतु कोटीशिवाय भाषणच नाहीं अशी गडकऱ्यांच्या बहुतेक सर्वच पात्रांची स्थिति पाहिली म्हणजे हीं पात्रें आपल्या या मर्त्य भूमीवरील नसून मंगळा सारख्या एखाद्या अपरिचित ठिकाणचीं आहेत कीं काय असा भास झाल्याविना रहात नाहीं.

स्थळ, काळ आणि स्वभाव यांच्या मर्यादेबरोबरच संख्येची मर्यादाही पाळणें आवश्यक आहे. किंबहुना स्थळ, काळ व स्वभाव यांच्या मर्यादा पाळूं लागतांच कोटयांची संख्या सहजच कमी व योग्य प्रमाणांत होईल.

या गोष्टी ध्यानांत न घेतल्या म्हणजे चांगली कोटीही हर्षोत्पत्ति करीत नाहीं. शिवाय एकदां औचित्यभंगाची संवय लागली कीं, मग ग्रंथकर्त्याला कोटीशिवाय कांहीं सुचेनासें होतें. अर्थातच नंतर कशाबशा ओढून ताणून आणलेल्या कोटया, त्याच त्याच कोटयांची पुनरावृत्ति किंवा एका कोटीकरतां सबंध प्रवेशच्या प्रवेश असा प्रकार होऊं लागतो. व नाटककाराच्या पदरीं हास्यास्पदता मात्र येते.

गडकऱ्यांनीं खरी चूक कोणती केली असेल, तर ती हीच कीं, त्यांनीं कोटीबाजपणा अतिरेकाला नेला. रसिकवर न. चिं. केळकर यांनीं म्हटलें आहे कीं, 'कोटी सहज स्फुरली पाहिजे; ती ओढाताण करून आणण्याचा प्रयत्न होतां उपयोग नाहीं.' यमकाच्या बाबतींत मोरोपंताची जी स्थिति

झाली तीच हुबेहुब गडकऱ्यांची कोटयांच्या बाबतींत झाली आहे. यामुळें पुष्कळच ठिकाणीं नीरस व पुनरुक्त कोटयांनीं गडकऱ्यांनीं आपलीं नाटकें खेंच भरलीं आहेत. याच नादानें वाहवतांना निवळ शब्दांची कसरत संपल्यावर एका सबंध कल्पनेची कसरत करून विनोदवचन साधीत असतां त्यांना अनिर्वाच्य अश्लीलपणाचा अवलंब करावा लागला आहे. अशा या अस्वाभाविक, नीरस व पुनरुक्त कोटया आणि अश्लील विनोदवचनें यांनींच गडकऱ्यांचा विनोद तीन हिश्शांहून जास्त भरला आहे. आणि याचमुळें स्वाभाविक प्रतिभेनें स्फुरणारीं विनोदी पात्रेंही त्यांना फारशीं रेखाटतां आलीं नाहींत.

वेडयांच्या बाजाराच्या दोन अंकांत गडकऱ्यांची प्रतिभा अगदीं बाल्यावस्थेंत आहे हें स्पष्ट दिसतें. यामुळें 'तालीम कीं आखाडा' अशा सुरस (?) कोटयांकडेच त्यांचा कल झुकता आहे. पण वर निदर्शित केलेल्या प्रकारच्या कोटयांची सुरवात या नाटकांतही आहे. तिसऱ्याच प्रवेशांत गडकऱ्यांची आवडती व पुन्हां पुन्हां येणारी नांव शब्दावरची कोटी आहे. पण येथें ती अल्पांशानेंही साधली नाहीं. 'मोठयांना कोण ठेवणार नांव?' असें पांडूनें विचारतांच नांव शब्दाचाच दुसरा एखादा अर्थ पकडून शाब्दिक कसरत करावयास पाहिजे; पण तसें न होतां, 'नांव का होडी'

या देशपांडयाच्या पांडित्यावरच समाधान मानावें लागतें. याच प्रवेशांत पुढें बाळाभाऊ म्हणतो, ' आम्हीं आपले उगीच आ करणारे;' यावर तात्याचें उत्तर, ' लोकांना आश्चर्यानें आ करावयाला लावाल ! ' केवढें अर्थगौरव आहे या कोटींत पण ! पुढच्याच (चवथ्या) प्रवेशांत यशोदाबाई मुलाला नीट उपदेशाच्या चार गोष्टी सांगतांना म्हणते कीं, ' उगीच तोंड करावयाचें काय कारण ? ' यावर तिचा शिकला सवरलेला आणि नायकाचा जोडीदार असा मुलगा उत्तर करतो, ' आई आतां तोंड न केलें तर उद्यां लोक तोंड काढू देणार नाहींत कुठें. ' आ शब्दावर कोटी करणारें नाटकी पोर तरी होतें. पण हा अभिजात मनुष्यही तशाच कोटया करूं लागतो ! त्याच्या या तोंडावरच्या कोटीकरतांच त्याच्या भोळ्या भाबडया आईच्या तोंडीं तोंड हा शब्द नाटककारानें घातला असें या ठिकाणीं वाटल्याखेरीज रहात नाहीं. ही कोटी पण नांव शब्दावरच्या कोटी प्रमाणेंच गडकऱ्यांना फार प्रिय आहे. आणखी अनेक ठिकाणीं त्यांनीं तिचा उपयोग केला आहे.

या सुशिक्षितांनंतर दुसऱ्या अंकांतील तिसऱ्या प्रवेशांत पिलंभट भेटतो. हा भिक्षुकही पहावा तो कोटीबाज. आपल्या आत्मगत भाषणांत तो म्हणतो ( पृष्ठ ३९ ),

**आमची आजी वारली तेव्हां मात्र कोणी कोणी म्हणाले**

कीं, " तिचें काय वाईट झालें; सोनें झालें तिचें."
मग कां ती सोनामुखी फार खात होती म्हणून
म्हणाले कोणास ठाऊक.

काय ही कोटयांची कल्पना अनिवार! आणि त्याकरितां गृहीत काय धरावयाचें कीं, पिलंभटासारख्या जहांबाज भिक्षुकाला सोनें हा पदार्थ माहीत नव्हता.

इतर नाटकांत प्रामुख्यानें वावरणारी अश्लीलता या नाटकांतही नाहीं असें नाहीं. नाटकी पोरांच्या बाष्कळपणांत तिचा कांहीं थोडा थोडका वास येत नाहीं. पण चांगल्या सुसंस्कृत स्त्रियांच्या तोंडींही ती आढळते. वेणू आणि तिची भावजय बोलत असतां त्यांच्यांत पुढील संभाषण होतें.

### अंक १ प्रवेश २

**वेणू**—आज दुपारीं बाबा जेवणावर काय म्हणाले, ते सांगितलें नाहीं वाटतें मधुदादानें तुला ?

**यम**—कुठून सांगणें होणार? तुमचें तरी काय विचारणें ?

**वेणू**—हो खरेंच, राजाराणीची गांठ पडायची ती मंचकावरच ! [ पृ. १० ]

कोणी म्हणतील, स्त्रियांस्त्रियांत यापेक्षांही पुष्कळ बाष्कळपणा होतो; पण हा सर्व श्रृंगारिक प्रकार अगदीं उजळ माथ्यानें पुढें मिरवावयाचा कीं काय हाच खरा विचाराचा प्रश्न आहे. शिवाय आहे हीच कल्पना जास्त मुग्धपणानें

मांडतां आली नसतीच असें नाहीं. पण उघड चावटपणा करण्याची – आणि तोही वाटेल त्या पात्राच्या तोंडानें – जी गडकऱ्यांची संवय पुढें प्रकर्षाला गेली तिचें बीज येथें अगदीं स्पष्ट पहावयास सांपडेल.

खेरीज, अश्लीलता कदाचित भाषणाच्या ओघांत ऐकणारांच्या ध्यानांत येणार नाहीं अशा भीतीनेंच कीं काय, गडकरी आपल्या मनांतील हेतु नेहमीं जास्त स्पष्ट करीत असतात. दुसऱ्या नाटकांत या प्रकारचीं उदाहरणें पुष्कळच आहेत. पण, गूढार्थ स्पष्ट करण्याची ही त्यांची संवय या ठिकाणींही डोकें वर काढीत आहे. कारण, वर दिलेल्या एका वाक्यावरच वेणू थांबलीं असती तर कांहीं वयोवृद्ध रसिकांना त्यापासून आनंदाचें सुख मिळून त्यांतील उत्तान श्रृंगार इतर कोणाच्या फारसा ध्यानांत आला नसता. पण गडकऱ्यांचें तेवढयावर समाधान नाहीं. वेणूच्या या फाजील भाषणानें यमू लाजली हें ठीकच. एवढयावरच हें प्रकरण थांबावयास हवें. पण वेणू पुढें म्हणते, ' झालें मुरडलेंस नाक ! पोर व्हायची वेळ आली तरी आमच्या वहिनींचें पोरपण कांहीं गेलें नाहीं अजून !' आपल्या पात्राच्या गूढ बोलण्याचा अर्थ सर्वत्रांना व्यक्त झालाच पाहिजे यासाठीं कोण ही खटपट !

दोन अंक मिळून प्रवेश नऊ. त्यांत दोन प्रवेश

ग्रं. क्र. २०३५

निवळ धांगडधिंग्याचे व पांचटपणाचे; कोट्या शुष्क व औचित्यभंग करणाऱ्या; असें हें गडकऱ्यांच्या पहिल्या नाटकांतल्या विनोदाचें स्वरूप आहे.

तथापि उच्चतम विनोद निर्मिण्याची गडकऱ्यांची पात्रता व शक्ति होती; पण कोटीचा आणि अश्लील प्रसंग व कल्पना यांच्या दर्शनाचा मोह, तसेंच अनिवार अतिशयोक्तीची हौस, यामुळें ही शक्ति पूर्ण प्रकर्षानें प्रकट झाली नाहीं, हें दाखविणारा पुरावाही या पहिल्याच नाटकांत सांपडतो. पहिल्या अंकांतील चवथा प्रवेश, या दृष्टीनें पहातां, बऱ्याच नाजूक हातानें लिहिला आहे. अण्णासाहेबांचा तो आपल्या आजाराविषयीं अंतःकरणपूर्वक विश्वास व भोळ्या यशोदाबाईची बाहेरची भीति आणि पतिविषयक सात्त्विक काळजी, या गोष्टी इतक्या जिव्हाळ्याच्या कुंचल्यानें नाटककारानें रंगविल्या आहेत कीं, मन क्षणभर चकित होतें. प्रसंग साधा, भाषा तर रोजच्या व्यवहारांतील आणि अलंकारविरहित. पण त्यामधील विचित्रतादर्शन इतकें रम्य कीं, शुद्ध हर्षोत्पत्ति व्हावी आणि शेवटीं मनानें मनालाच प्रश्न करावा कीं, आपणही या वेडयांच्या बाजारांतीलच एक नाहीं ना ? त्यांतच माधवाच्या वेदांताची भर पडली म्हणजे वेडयांच्या ह्या चिरपरिचित बाजाराला आणखीच रंग चढतो.

पण हींच सर्व पात्रें पुन्हां अंक २ प्रवेश ५ मध्यें आलीं

कीं, गडकऱ्यांच्या अतिशयोक्तीच्या हौशीला उचल येते आणि खरोखर शहाण्या सुरत्यासुद्धां सगळ्यांचाच धांगडधिंगा सुरूं होतो. मग ' घातपात, ' ' परस्थान,' ' उत्तरेकडच्या खिडकींतून जाणें, ' जगांतील सर्व वाहनांची याद इत्यादिकांचें ओझें कल्पनेला जाचूं लागतें आणि प्रवेशाच्या अखेरीस खास वाटतें कीं, या वेडयांच्या बाजारासारखा कांहीं आपला स्वतःचा बाजार नाहीं. कारण नाटकी नाच्यांचा धांगडधिंगा अंक १ प्रवेश ३ आणि अंक २ प्रवेश ४ यांच्यांत जो पहावा, तोच या प्रवेशांत वरच्या दर्जाच्या पात्रांत ( कीं, कोणत्या तरी एखाद्या विषयाच्याच निदिध्यास लागल्यामुळें ज्यांचें डोकें ठिकाणावर नाहीं — आणि खरें पाहिलें तर अशी स्थिति आपणा सर्वांचीच बहुधा असते ) पहावयास सांपडला कीं, खास असें वाटूं लागतें कीं, मघांचे जर नाटकी पोऱ्ये होते तर हे नाटकी थोऱ्ये आहेत एवढेंच.

## प्रकरण चवथें

### प्रेमसंन्यास

प्रेमसंन्यास नाटकाचा विचार कोणत्याही दृष्टीनें करूं गेलें तरी शेक्सपिअरच्या रोमिओ आणि ज्यूलिएट या नाटकाची आठवण झाल्याखेरीज रहात नाहीं. गडकऱ्यांनीं आपलें नाटक, शेक्सपिअरचें नाटक डोळ्यापुढें ठेवून रचलें असें म्हणण्याचा माझा हेतु नाहीं. पण या दोन नाटकांमध्यें विषय व त्याची मांडणी ह्या दृष्टीनें अलौकिक साम्य आहे खास. शेक्सपिअरचा रोमिओ आणि गडकऱ्यांचा जयंत व शेक्सपिअरची ज्यूलिएट आणि गडकऱ्यांची लीला यांच्या स्वभावांत काडीमात्रही फरक नाहीं. दोन्ही नाटकांत, अशा आततायी व जगावेगळें प्रेम करणाऱ्या तरुण चंचल मंडळींना, अभिमान अहंकार व जडता यांनीं भरलेल्या या जगांत सुखानें राहणें अशक्य कसें आहे, हें दाखविलें आहे.

शेक्सपिअरच्या नाटकांत अगदीं सुरवातीपासूनच पुढच्या दुःखद शेवटाचें गाढ वातावरण जसें अनुभवास येतें तसेंच तें गडकऱ्यांच्या नाटकांतही येतें. अगदीं तिसऱ्याच, म्हणजे पहिले प्रस्तावनेचे प्रवेश संपून ज्यांत नुकती संविधानकाला सुरुवात होत आहे अशा प्रवेशांत, सुशीलेसारखी दीर्घ सूचना असणारी स्त्री म्हणते आहे, ‘देवा, या निराशेच्या प्रेमाचा खेळ कसा संपविणार आहेस तुझें तुलाच ठाऊक!’ अशा रीतीनें हें साम्य फारच असामान्य आहे. व त्यावर स्वतंत्र एक निबंध लिहितां येईल. पण तें स्थळ हें नव्हे. आज एवढेंच पहावयाचें कीं, गाढ तमोहत अशा या वातावरणांत विनोद कितपत उचित आहे; कित्येक टीकाकारांच्या मतें तर अशा वातावरणांत विनोद परिणामहानिकारक होय. इतकें तीव्र मत आजकाल कोणी मान्य करणार नाहीं. पण शें दोनशें वर्षांच्या टीकाकारांच्या सामुदायिक मतानें एवढें तरी खास निश्चित आहे कीं, खेदपर प्रसंगदर्शनानें मनाला वाटणारा ताण हलका करण्याकरितां अशा विनोदपर प्रसंगांची गरज असली तरी ती मर्यादित आहे; व असा विनोद नाटकाशीं अगदीं पूर्ण निबद्ध असला पाहिजे; बाहेरून आणून तो चिकटविला नाहीं इतका भास तरी उत्पन्न करण्याइतकें नाटककाराच्या आंगीं कौशल्य पाहिजे. नाहीं तर ज्या शेक्सपिअरला अनेक कोटीबाज पात्रें आपल्या हास्यपर

नाटकांतून खेळवतां आली त्यालाच तीं रोमिओ आणि ज्यूलिएटमध्यें तशीं खेळवतां आलीं नसतीं असें नाहीं. वास्तविक या नाटकांतला मर्क्यूशिओ हा शेक्सपिअरच्या कोटीबाजांतील अग्रगण्य आहे. पण त्याला सुद्धां, शेक्सपिअरनें अपूर्व संयमन करून, थोडक्या वेळांतच मागें ओढलें आहे. मग पुढें नाटकाचा गांभीर्ययुक्त असा प्रवाह वेगानें सुरू झाल्यावर, एका नर्सच्या प्रवेशाखेरीज, त्यानें विनोदाला कोठें थारा दिला नाहीं. आणि नर्सचा प्रवेश जितका विनोदी आहे तितकाच तो ज्यूलिएटचें अंत:करण विशद करणारा आहे. व म्हणूनच त्याचें महत्त्व जास्त आहे. रोमिओकडच्या निरोपासाठीं उत्कंठित असलेली ज्यूलिएट, नर्सच्या वायफळ बडबडीनें जों जों जास्त जास्त अधीर आणि चिडखोर बनत जाते, तों तों तिच्या अगाध प्रेमाचें कौतुक करावें, कां थोडया फार प्रमाणानें जाणून बुजून चाललेल्या या चेष्टेचें कौतुक करावें, हेंच गूढ सहृदय माणसाच्या अंत:करणांत उभें रहातें.

गडकऱ्यांच्या नाटकांत इतकी सफाई किंवा इतका नाजूकपणा आहे काय ? खास नाहीं असेंच उत्तर द्यावें लागेल. पात्रवार विचार साकल्यानें जेव्हां होईल, तेव्हां त्या त्या विनोदी म्हणून गणल्या जाणाऱ्या पात्रांचा प्रत्यक्ष नाटकांत संबंध काय, हें स्पष्ट होईलच. पण शब्दगत आणि प्रसंगगत

विनोदाचें तरी औचित्य गडकऱ्यांनीं कितपत राखलें आहे हें पहाण्यासारखें आहे.

प्रेमसंन्यासांत गडकऱ्यांचा कोटीबाजपणा परिणतावस्थेला गेल्यासारखा भासतो. नाटककार आत्मप्रत्ययानें लिहीत आहे; आपले वाचक प्रेक्षक काय दर्जाचे आहेत ही जाणीव त्याचें अंतःकरणांत आहे व त्यांना रिझविण्यासाठीं आपला मार्ग योग्य आहे अशा विश्वासानेंच त्याचा क्रम चालू आहे, असा भास येथें झाल्याविना रहात नाहीं. कारण वेडयांच्या बाजारापेक्षां या नाटकांत कोटया व अश्लीलता यांच्याबरोबरच अमानुष हेटाळणी या नवीन प्रकाराची भर घालण्यास नाटककारानें सुरवात केली आहे. एखाद दुसरें पात्र खेरीज करून कोटया सर्वांच्या तोंडीं आहेत; आणि त्यांत नेहमींच्याच कोटया पुन्हां पुन्हां आल्या आहेत. अश्लील कोटया पुरुषांच्याच नव्हे तर स्त्रियांच्याही तोंडीं आहेत. आणि अमानुष हेटाळणी कोणी कोणाची करावी या बद्दल निर्बंध नाहीं.

अगदीं शुष्क कोटया म्हणजे नांव आणि तोंड या शब्दांवरच्या. नांव शब्दावरील कोटयांचीं उदाहरणें हीं पहा.

**अंक १ प्रवेश २**

**मथुरा**—काय हें? आपल्याला आपल्या नांवाचा विसर कसा पडत नाहीं याचें—

**गोकुळ**—तूं माझ्या नांवानें नेहमीं खडे फोडीत

राहिली नसतीस तर खात्रीनें मी. नांव सुद्धां विसरलों असतों. [पृ. ७]

### अंक १ प्रवेश ३

**लीला**—आणखी सुधारक आपल्या बायकांना नांवानेंच हांका मारतात तसा गोकुळही नेहमीं आपल्या बायकोच्या नांवानें हांका मारीत असतो! [पृ. १७]

### अंक १ प्रवेश ४

**कमलाकर**—जगांतले सारे व्यवहार केवळ आपल्या नांवाच्या पतीसाठीं आणि पतीच्या नांवासाठींच करावे लागतात.

**मनोरमा**—मी मात्र साऱ्या गोष्टी पतीच्या नांवासाठीं करीत नसून अगदीं नांवाच्या पतीसाठींच करतें आहें. [पृ. २९]

आतां तोंड शब्दावरच्या कोट्या पहा.

### अंक १ प्रवेश ३

**गोकुळ**—पण हिच्या तोंडाची तोफ सुरू झाली म्हणजे माझ्यासारखा पुरुष सुद्धां गर्भ-गळित होतो!

**वसंत**—विलायतेस आपल्या बायकोबद्दल असें बोलणाराला खरोखर तोफेच्याच तोंडीं दिलें असतें.

**गोकुळ**—मग मलाही तिच्या तोंडाच्या तोफेला बळी दिलेलाच नाहीं का?

**कमलाकर**—कसलें आलें आहे तोंड? याच्यांतच पाणी नाहीं म्हणून! जरा तोंड करूं लागली कीं एक

श्रीमुखांत देऊन एका तोंडाचीं दोन तोंडें करावींत झालें !

**गोकुळ**—चांगला उपाय आहे हा ! एका तोंडानेंच सध्यां मी बेजार झालों आहें; मग दोन तोंडें झाल्यावर काय करावें लागणार न कळे ! [पृ. १७–१८]

अंक २ प्रवेश ४

**गोकुळ**—तिच्या तोंडाशीं तोंड देण्याची सोय नाहीं. [पृ. ५३]

\+ + +

**गोकुळ**—तिनें तोंड टाकलें तर मी अस्सें इकडचें तोंड तिकडे करून टाकीन. [पृ. ५७]

काय ही कोटयांची अनिवार हौस ! प्रसंग कांहींही असो पण गोकुळच नव्हे तर वसंतराव, कमलाकर, मथुरा एवढेंच नाहीं तर मनोरमा आणि लीला सुद्धां या वेडांतून सुटत नाहींत. बरें या कोटयांपासून स्वभावाविष्करणाला कांहीं मदत होते असेंही नाहीं. उलट कथापरिणतीचा ओघ मात्र थांबतो. पण त्यामुळें प्रेक्षकांत हंशा उत्पन्न होतो ना ? आणि यालाच जाणते सुद्धां विनोद म्हणतांना आढळतात.

पण या कोटया एवढयावरच थांबत नाहींत. यापेक्षांही चमत्कारिक आणि नीरस मासले आणखी हे पहा.

अंक १ प्रवेश २

**गोकुळ**—त्यानें केला दिवाळसण पण माझें निघालें दिवाळें !

**मथुरा**—आपल्यासारख्या दिवाळखोराला हें असेंच पाहिजे. [ पृ. ८-९ ]

\+ + +

**मथुरा**—कशाला ? ढणढण जळून धुरानें ओटी काळी करायला ?

**गोकुळ**—आतां दिव्याचा धूर नको म्हणून धुराचे दिवे आणणारच आहे मी. [ पृ. १० ]

## अंक १ प्रवेश ३

**कमलाकर**—नवऱ्याला डोकें नसलें म्हणजेच बायका डोक्यावर बसतात !

**गोकुळ**—या म्हणण्यांत काय अर्थ आहे ? भगवान् शंकराला एक सोडून पांच डोकीं होतीं तरी गंगामाई डोक्यावर बसल्याच कीं नाहीं अखेर ! [पृ. १७]

\+ + +

**सुशीला**—अशी कांहीं त्याची बायको मुलुखमैदान नाहीं अगदीं.

**गोकुळ**—खरेंच नाहीं. आमच्या हिला मुलुखमैदान म्हणून तिची किंमत कोण कमी करील ? [ पृ. १७ ]

याचे पुढें एक अश्लील कल्पना आहे आणि त्यासाठींच केवळ सुशीलेच्या तोंडीं मुलुखमैदान हा शब्द असावा. नाहीं तर शांत व गंभीर स्वभावाची सुशीला इतका हलका शब्द वापरील हें संभवत नाहीं. पुढें याच प्रवेशांत,

**विद्याधर**—सामाजिक सुधारणेला पाऊल पुढें टाकावयाला ही किती योग्य जागा आहे !

**गोकुळ**—याच काय, पण कुठल्याही बाबतीत, जुन्या चालीचा समाज विधवा पुढें आली कीं कधींच पुढें पाऊल टाकणार नाहीं. [ पृ. १८ ]

पाऊल पुढें टाकणें या शब्दसमूहावर कोटी करण्याच्या मोहांत गडकऱ्यांनीं विद्याधराच्या गंभीर भाषणाचा अगदीं विरस करून टाकला आहे. विधवापुनर्विवाहाविषयीं अत्यंत कळवळ्यानें केलेल्या एका न्याय्य विधानावर ही कोटी म्हणजे निवळ विरजण आहे.

### अंक २ प्रवेश २

**गोकुळ**—( स्वगत ) थकलों बुवा ही धांवपळ करून. दुमन पळून गेली पण तिला माझ्याइतकें कांहीं पळावें लागलें नसेल ! [ पृ. ५० ]

### अंक २ प्रवेश ४

**गोकुळ**—दोनचार दिवसांच्या बोलण्यावरून तुम्हीं ताडलेंच असेल कीं, आमच्या खटल्याचा प्रकार थोडासा विचित्र आहे !

**विद्याधर**—तुमच्यावर खटला वगैरे—[ पृ. ५३ ]

किती ओढून ताणून आणलेली ही कोटी !

**विद्याधर**—ही दांतखिळीची कथा म्हणजे खरो-खरीच दंतकथा आहे झालें. [पृ. ५४ ]

\+ + +

**विद्याधर**—अरेरे ! मग तुम्ही काडी कां मोडून देत नाहीं ?

**गोकुळ**—अहो, काडी मोडून द्यायला घरांत कांहीं तरी सत्ता चालली पाहिजे ना ?                [पृ. ५४]

+                +                +

**गोकुळ**—नाहीं हो; मला तिची इतकी ओकारी आली आहे कीं, तिच्या साऱ्या गोष्टी कोणापाशीं केव्हां ओकून टाकीन असें झालें आहे.                [पृ. ५५]

## अंक ४ प्रवेश २

**गोकुळ**—तेव्हां पांच पंचांत हातापायांचीं बोटें मिळविलीं कीं झाले पंचवीस.

**मथुरा**—पण भीतीनें घाबरून हातपायच गळाले मग बोटें कोठलीं आणणार ?                [पृ. ११०]

येथपर्यंत कोटयांची यादी दिली. या कोटया प्रसंगाला अनुकूल नाहींतच. पण आणखी एक कोटी अशी आहे कीं, निवळ तिच्याकरितां एक प्रवेश मुद्दाम उभारावा लागला आहे. अंक २ प्रवेश २ मध्यें तात्यासाहेब आणि कमलाकर फांशानीं सोंगटया खेळत आहेत; त्या वेळीं,

**तात्या**—( कमलाकरास ) किती पडले ? पोबारा ! मग पळालीच ती ! आतां हातीं लागत नाहीं.

**गोकुळ**—( स्वगत ) हां ! द्दुमन पळून गेली हीच बातमी.                [पृ. ४७]

कोण ही कसरत ! विसराळू गोकुळला द्दुमन पळून गेल्याची बातमी स्मरावी, याकरितां पोबारा शब्द त्याचे

कानीं पाडण्याचा कोण हा अट्टाहास आणि मग त्याकरितां सुधारक तात्यासाहेब आपल्याला मूलवजा असणाऱ्या कमलाकराशीं आणि तेही जुन्या काळचा सोंगटयांचा खेळ खेळत असलेले दाखविण्याचा प्रसंग आला तरी बेहेत्तर.

\+ \+ \+

आतां अश्लील कोटया आणि विनोदवचनें यांचा विचार करूं. अंक १ प्रवेश २ मध्यें गोकुळ मथुरा यांचा संवाद चालू आहे. त्यावेळीं, 'आठवण रहात नाहीं तर उपरण्याला गांठ मारून कां ठेवीत नाहीं ?' या मथुरेच्या प्रश्नावर गोकुळ तिला गांठींची माळ दाखवितो. मग सहज मथुरा म्हणते, 'आतां देशमुखांच्या इथें चार माणसें जमणार आणि तेथें असें सोंगासारखें – ' यावर गोकुळ उत्तर देतो, 'शाबास! हेंच विचारणार होतों – एकूण अंगवस्त्राच्या गांठीपेक्षां लग्नगांठच बरी म्हणायची.'

हा फाजीलपणा करून नाटयवस्तूच्या दृष्टीनें गडकऱ्यांनीं काय साधलें ? पुढें त्याच प्रवेशांत गोकुळ म्हणतो,

> खाणावळींतलीं दोनदोनशें पानें हलवावयाला तुझ्यासारखी खंबीर बायकोच पाहिजे. आणि या गुणामुळें मात्र तुझा बाप तुला अन्न तर देईलच पण तुझ्या वाटेल त्या गुणावर पांघरूण सुद्धां घालील. [पृ. ९]

नवरा बायकोच्या संभाषणांत किती पण उचित अश्लीलता ही; पण याचे जरा आधीं पुढील संवाद आहे.

**मथुरा**—लग्न तरी कुठें करणार होते माझें! पण हळदकुंकवाला अधार म्हणून —

**गोकुळ**—म्हणून माझ्या गळ्यांत तुझी तांत बांधली वाटतें? मग तुला जेजुरीच्या खंडोबाची मुरळी केली असती तर भंडार भरपूर नसता का मिळाला? [पृ. ८]

पीटांतील माणसें या योगें हंशा पिकवितील; पण हें काय सहृदय ग्रंथकाराचेंच लक्षण आहे काय? अंक १ प्रवेश ३ मधील मुलुखमैदान शब्द सुशीलेच्या तोंडीं अनुचित कसा हें वर सांगितलेंच. पण गोकुळची त्यापुढील मखलाशी ऐकली म्हणजे हा शब्द सुशीलेच्या तोंडीं कां आला याचा निवाडा होईल.

**गोकुळ** — विजापूरच्या मुलुखमैदान तोफेच्या आवाजानें नुसत्या गर्भिणींचेच गर्भपात झाले म्हणतात! पण हिच्या तोंडाची तोफ सुरू झाली म्हणजे माझ्यासारखा पुरुष सुद्धां गर्भ-गळित होतो. [पृ. १७]

गर्भगळित हा शब्द लाक्षणिक अर्थानें न घेतां वाच्यार्थानेंच घ्यावा याकरितां समासाचा पदविग्रह करून शब्द छापण्याची काळजी प्रेमसंन्यासाच्या सर्व आवृत्त्यांत घेण्यांत आली आहे, ही गोष्ट याठिकाणीं लक्षांत ठेवण्यासारखी आहे. लीला, सुशीला, जयंत, विद्याधर यांच्या सारख्या सुसंस्कृत मंडळींना अगदीं वर मान करून ऐकण्याजोगीच ही कोटी आहे नाहीं?

अंक १ प्रवेश ४ मध्यें कमलाकराचें स्वगत भाषण चालूं आहे. तो म्हणतो,

> शब्दाच्या शपथेखातर ज्यांची पुरतीशी तोंडओळख सुद्धां नाहीं अशीं वधूवरें तोंडाशीं तोंड भिडवावयाला तयार ! [पृ. २६-२७]

गडकऱ्यांची ही आवडती कोटी आहे. मुका शब्द आणि हा तोंडाशीं तोंड भिडविण्याचा प्रकार यांचा त्यांनीं बेहद्द आणि अनिर्बंध उपयोग केला आहे. वात्स्यायनाच्या कामसूत्रांवरच मग बहिष्कार कां घालावा ? पुढें कमलाकरच म्हणतो,

> पण पांचव्या वर्षी गोपींशीं बागडणाऱ्या गोपाळाला सोडून पुत्रप्राप्तीच्या आशेनें ब्रह्मचारी बजरंगाभोंवतीं घिरट्या घालणाऱ्या बिचाऱ्या बायकांनाच कां दोष द्यावा !
> [पृ. २७]

त्याच प्रवेशांत पुढें मनोरमा म्हणते,

> दयाळू आहे ? काय बोलतां ? आपल्या बायकोचा गळा कापावयाचा आणि कोणा मेल्या भलतीच्या गळ्यांत गळा घालावयाचा ! (पृ. २९-३०)

केवळ गळा शब्दासाठीं बिचाऱ्या मनोरमेची जीभ विटाळण्याचा प्रसंग ! अंक २ प्रवेश ४ मध्यें तर, या अश्लीलपणाचा आणि बीभत्सपणाचा कळस झाला आहे. आपल्या बायकोचें हिडीस वर्णन करतांना गोकुळची आणि

त्यापेक्षां नाटककाराच्या अभिरुचीची कींव केल्यावांचून रहावत नाहीं. पण यासंबंधीं जास्त विवेचन लौकरच पुढें करावयाचें आहे. येथें फक्त एक दोन अश्लील कोटयांचा विचार करावयाचा. त्यासाठीं पुढील संवाद पहा.

**गोकुळ**--आणि लज्जेनें म्हणाल तर ती कोणाला लाजल्याचें मला कांहीं स्मरत नाहीं. कां, कशी आहे गालांची शोभा.

**मथुरा**--(स्वगत) माझ्या गालांना नांवें ठेवीत आहेत आणि यांचे गाल मात्र अगदीं गुलाबी असतील नाहीं? गुलाबाचा रंग तर नाहींच; पण भोंवतालच्या मिशांच्या खुंटांनीं आणि त्यांच्या बुरखुंडांनीं कांटयांचें रान मात्र माजलें आहे खरें !

**विद्याधर**--(स्वगत) या बाईच्या धुमसणाऱ्या आवेशावरून लौकरच याचे गाल मात्र लाल होण्याचा रंग दिसतो आणि हा तर ऐकत नाहीं. (प्रगट) गोकुळ, स्त्रियांच्या सौंदर्यावर असें तोंड टाकणें चांगलें नाहीं.

**गोकुळ**—कां बरें, तिच्या गालावर तोंडसुख घेण्याचा माझा अधिकारच नाहीं का? [पृ. ५५-५६]

किती अभिरुचिसंपन्न संवाद हा! नवरा, पाव्हणा आणि बायको, सर्वच एका माळेचे मणी. नवऱ्याला अक्कल नाहीं म्हणून, पाव्हण्याची अक्कल शिक्षणानें पाघळली म्हणून आणि बायकोची लज्जा वाहूं लागली म्हणून हा असला संवादप्रसंग !

याच्या पुढची पायरी म्हणजे अंक ३ प्रवेश २ मधील वसंत आणि वीणा यांच्या संभाषणांची. हीं भाषणें स्वभावाला तरी धरून आहेत. तथापि प्रेमासाठीं हजारो मुली पळून जाव्या ही इच्छा किंवा साऱ्या कुमारिकांचीं लग्नें चोरून व्हावी, आणि विधवांचीं लग्नें राजरोस व्हावीं, ही वीणेची मनीषा, आणि, "आमची आई आतां पोक्त झाली पण बाबांना अजून लाजते? कधीं त्यांच्या गळ्यांत हात घालते; कां त्यांचें मोकळया मनानें चुंबन घेऊन आम्हां पोरींना धडा घालून देते; नांव नाहीं," (पृ. ८२) हें वीणेचें आचरटपणाचें भाषण; यांतील अतिरेक पचविण्याला कल्पनाशक्तीला फारच ताण द्यावा लागतो.

याप्रमाणें शाब्दिक विनोदाची ही हजेरी आहे. निवळ नीरस कोटया व त्याही प्रसंग न पहातां केलेल्या, आणि त्यांत भरीला अश्लील विनोदवचनें यांची ही खिचडी आहे. अजाण आणि असंस्कृत प्रेक्षकांच्या मनांत या पासून हर्षोत्पत्ति होते हें खरें. पण तेवढयानें त्या विनोदाला सहृदय म्हणावयास तयार होणें हें केवळ विवेकशून्यतेचें लक्षण आहे.

नाटकांतील विनोद त्रिविध असतो; एक भाषाचमत्कृतींनीं साधलेला; दुसरा प्रसंगगत; व तिसरा स्वभावपरिपोषात्मक. ज्या ठिकाणीं या तिहींचा योग्य मिलाफ आढळेल तेथील विनोदच केव्हांही सरस व रमणीय म्हणतां येईल.

प्रेमसंन्यासांत गडकऱ्यांच्या भाषाचमत्कृतींचा प्रसंगांशीं अगदीं संबंध नाहीं. किंबहुना कोटयाविना ते ते प्रसंग कदाचित जास्तच खुलून दिसले असते. उदाहरणार्थ पहिल्या अंकांतील तिसऱ्या प्रवेशांत विनोदनिष्पत्तीला भरपूर स्थळ आहे. चार काव्यशास्त्रमर्मज्ञ व नव विचाराची मंडळी एके ठिकाणीं जमलीं आहेत. त्यांतच गोकुळासारखा भोळसर, वेडपट, परंतु, निष्कपटी आणि जुन्याचा कट्टा तथापि आंधळा अभिमानी, समान हक्कानें बोलतो भांडतो आहे; हा प्रसंग खरोखरच हर्षोत्साह उत्पन्न करणारा आहे. त्यांतल्या त्यांत विशेषत: आवेशाला चढून जेव्हां गोकुळ जुन्या चालीरीतींचें अगदीं थेट शास्त्री पद्धतीनें मंडन करूं लागतो, तेव्हां तर, या विनोदप्रसंगाला अपूर्व बहार चढते; पण याच्यांतच ग्राम्य कोटयांचें, अश्लील विषयाचें आणि गोकुळचा स्वतःचा व त्याच्या स्त्रीचा स्वभाव यांबद्दलचें जें भारूड मिसळण्यांत आलें आहे, त्यामुळें या प्रसंगाचा विरस झाला आहे. या मिसळीमुळें अभिरुचिहीन प्रेक्षकांची सोय झाली हें खरें; पण त्यामुळेंच शुद्ध विनोदाचें स्वरूप गढूळ झालें; आणि या सर्व भरीचा कथापोषणाला उपयोग काय असा नाटयरचनाविषयक प्रश्नही उपस्थित झाला. गडकऱ्यांना प्रत्येक गोष्टींत अतिरेक करण्याची संवय आहे. पण आपल्या लेखणीवर जितकें संयमन ग्रंथकार

ठेवील तितकें त्याचें लिखाण जास्त परिणामकारक होतें हा अनुभव कोणत्याही सारस्वतांत अगदीं अबाधितपणें येईल. ग्रंथकाराचा एकदां स्वतःवरचा दाब गेला कीं, मग त्याचें लेखन, लिहिण्यापेक्षां भरकटणें या संज्ञेला जास्त पात्र होतें. विशेषतः गोकुळच्या या कोटया प्रतिकोटयांना इतरही मंडळी आपआपल्यापरी हातभार लावूं लागली म्हणजे तर विकृतपणाचा कळसच होतो. अंक ३ प्रवेश २ मध्यें अशीच अतिरेकाची सीमा करून गडकऱ्यांनीं दुसऱ्या एका चांगल्या प्रसंगाचा असाच बिघाड केला आहे. वसंतराव व वीणा, या विलायती सुधारणेनें भारलेल्या जोडप्याच्या कल्पना शेवटीं इतक्या स्वैर धावूं लागतात कीं, साधारण प्रेक्षकाची किंवा वाचकाची मति कुंठित होऊन त्याला त्या जोडप्याबरोबर धांवणें अशक्य होतें. नाहींपेक्षां थोडया नाजूक हातानें व आत्मसंयमनानें हाच प्रसंग रेखाटला असता तर, या वेडयांच्या थेरावरील ही टीका, खोंचदार परंतु आंगाला न बोंचणारी, अशी होऊन खरोखर विनोदपूर्ण झाली असती.

यानंतर अंक ४ प्रवेश २ हा हंशा पिकविणारा प्रवेश आहे. येथें सर्वांत जास्त औचित्यभंग घडला आहे. नाटयवस्तु व रसपोषणाच्या दृष्टीनें हा प्रवेश अगदीं हानिकारक आहे. परंतु ही गोष्ट ध्यानीं येण्याला संविधानक कोणत्या

सीमेला येऊन पोचलें आहे हें पाहिलें पाहिजे.

प्राच्य नाट्यशास्त्राप्रमाणें संविधानकाचा खरा शेवट – मध्य Crisis – परिसीमा म्हणा पाहिजे तर – हा शेवटच्या अंकांतील शेवटच्या प्रवेशांत होणाऱ्या शेवटापासून वेगळा असतो. त्या दृष्टीनें पहातां जयंताला खुनी म्हणून पकडलें जातें येथपर्यंत संविधानकाची उभारणी सारखी चढत्या कमानीवर चालली होती. पण येथें त्या कमानीचा मध्य गांठला गेला. आतां पुढें काय होणार हें जवळ जवळ निश्चित झालें. यापुढें गोष्टी नाटककर्त्याच्या हातीं राहिल्या नाहींत; तर पूर्वरचित प्रसंगांचा स्वाभाविक असा परिणाम हाच नाटककारानें दाखविला पाहिजे. येथपर्यंत प्रेक्षकांचें लक्षही वाढत्या प्रमाणावर खेंचलें जात असतें. पण यापुढें तेवढें औत्सुक्य रहात नाहीं; किंबहुना आतां एकदां अपेक्षेप्रमाणें सगळ्या गोष्टींचा झटकन उलगडा होऊन नाटक आटोपावें अशी त्याची मनस्थिति होते. अशा प्रसंगानंतर नाट्यवस्तूशीं ज्याचा कांहीं एक संबंध नाहीं अशा धांगडधिंग्याचा एक भला मोठा प्रवेश घालणें हें अगदीं विरस उत्पन्न करणारें आहे. आणि एवढें या प्रवेशांत आहे तरी काय म्हणून पहावें तर गोकुळच्या विसराळूपणाचें अस्वाभाविक प्रदर्शन – इतकें कीं, बिचाऱ्याला आपलें वय १५ कीं २५ याचीही आठवण राहूं नये. बरें यांत कांहीं कल्पनांची अपूर्व

कसरत पहावयाला मिळेल, तर तेंही नाहीं. फक्त चार नाटकी टारगट पोरांत जशा प्रकारचें संभाषण होईल, तसें संभाषण आणि तेंही नवराबायकोमध्यें येथें पहावयास मिळतें.

हाच मासला न्यायकोर्टाच्या प्रवेशाचा. या प्रवेशानें जयंतावरील आरोपाच्या शाबिती नाशाबितीला कांहीं उपयोग होत नाहीं; पण गोकुळची फजिती – जी साधण्याकरितां कल्पनाशक्तीला श्रम देण्याची कांहीं जरूर नव्हती – लोकांपुढें दाखविण्याचा मोह कवीला आवरला नाहीं.

जयंतावरील आरोपानंतर नाटकाचें वातावरण एकदम गंभीर होऊन नाटकाचा पुढचा भाग वेगानें संपविला गेला पाहिजे. शेक्सपिअरच्या नाटकांत रोमिओवर हद्दपारीची शिक्षा फर्मावली गेल्यानंतर, किंबहुना त्याच्या दुर्दैवी विवाहापासूनच सर्व प्रसंग इतके झपाट्यानें येतात कीं, प्रेक्षकाला किंवा वाचकाला आपण जणूं ओढून नेले जात आहों असा भास होतो. व कोठेंही लय बिघडत नाहीं. परंतु गडकऱ्यांच्या या दोन प्रवेशांनीं कथानकाची गति अडखळल्यासारखी होते; प्रेक्षकांचें चित्त द्विधा होतें; आधींच रहस्य कमी होत चाललेल्या विषयावर तें स्थिर होऊं शकत नाहीं; आणि शेवटीं परिणामाच्या दृष्टीनें संविधानकांत दृढता रहात नाहीं. बरें हा सर्व खटाटोप करून चार सहृदय कोट्या किंवा विनोदप्रसंग जर साधले असते तर गोष्ट

निराळी; पण त्यांचे ऐवजीं जुन्या नाटकांतील किंवा लेखांतील धिंगाणा मात्र दृष्टीपुढें येतो; असो.

तथापि नाजूक विनोद करण्याची गडकऱ्यांची शक्ति या नाटकांतही दिसून येते. पहिल्या अंकामधील तिसऱ्या प्रवेशांतील शाब्दिक कोटया सोडून दिल्या तर तेथें विनोदप्रसंग पुष्कळच साधला आहे. पण खरा सहृदय विनोद त्याच प्रवेशांतील जयंत आणि मनोरमा यांच्या संवादांत साधला आहे. मनोरमेनें, कवितेचा आणि लग्नाचा काय संबंध, हा प्रश्न विचारल्यावर, किंवा कवितेला काय चुलींत जाळावयाची आहे असें म्हणून कवितेचें निरुपयोगित्व स्थापित केल्यावर, ज्याच्या चेहऱ्यावर स्मिताची लकेर झळकणार नाहीं असा मनुष्य विरळा. येथील विनोद इतर भावनांशीं संमिश्र आहे हा आक्षेप या ठिकाणीं घेण्यांत येईल हें खरें; व एकंदर संभाषणांत जयंताविषयीं आपल्या मनांत कींवच वाटत असते हीही गोष्ट कबूल. तथापि हीं दोन भाषणें एक क्षणभर कां होईनां पण इतर सर्व भाव विसरवून आपणांला सृष्टींतल्या या अगाध विषमतेचें कौतुक करावयाला लावतात आणि गूढ हास्य उद्भूत करतात याविषयीं सहसा कोणाचें दुमत होणार नाहीं.

\+ \+ \+

परंतु वेडयांच्या बाजारांत नसणारा एक नवीन प्रकार

गडकऱ्यांनीं प्रेमसंन्यासांत सुरू केला. या प्रकाराचीं दोन आंगें आहेत; एक जगांतील यच्चयावत पवित्रतेची अमानुष हेटाळणी आणि दुसरें विकृत स्वरूपाची मनमुराद व किळसवाणी चेष्टा. हेटाळणी करतांना ती कोणाची करावी व कोणाची न करावी याचा विधिनिषेध गडकरी ठेवीत नाहींत. अगदीं परमेश्वरापासून तो आईबापांपर्यंत एकूण एक पूज्य गोष्टींची हेटाळणी करण्याचा गडकऱ्यांनीं विडाच उचलला आहे असें दिसतें. दुसऱ्या प्रकाराचा ओझरता उल्लेख निबंधाच्या सुरवातीस केला होता. कुरूप माणसांची टवाळी करण्याची गडकऱ्यांस अनिवार हौस दिसते. व ज्यांच्या अंतःकरणांत स्वतःखेरीज इतरांच्या विषयींच्या जिव्हाळ्याला थारा नाहीं त्यांना असल्या हृदयशून्य विनोदापासून आनंद व्हावा हें साहजिक आहे.

पण प्रश्न असा आहे कीं, हे दोन्ही प्रकार चांगल्या विनोदाच्या सदराखालीं येतील किंवा कसें? उद्यां एखाद्यानें चारसहा लग्नें एकदम केलीं तर त्यास अगदीं श्रीकृष्णाच्या पावलावर पाऊल टाकून चालणारा असें आम्ही म्हणूं. लहानपणीं एखाद्याच्या हातून कांहीं कमी जास्त फाजीलपणा झाला असेल तर त्यालाही आम्ही कृष्ण म्हणूं. अशा तऱ्हेनें या दोन व्यक्तींन व कृष्णांत, तुलनासाम्याला थोडा वाव असतांना सुद्धां. तुलना करून वर्ण्य मनुष्याची आम्हीं

थट्टा करूं. या थट्टेनें त्या मनुष्याचें थोडें फार हंसें होऊन, वर ज्या पूज्य व्यक्तीबरोबर त्याची तुलना केली तिजविषयीं आदर कमी होत नाहीं; उलट एखादी बाजारबसवी किंवा शिनळ स्त्री घेऊन तिची उपमा जर आपण द्रौपदीला दिली, व म्हटलें कीं, 'द्रौपदी काय कमी छिनाल होती; या बाईचाच पूर्व जन्मींचा अवतार ती!' तर द्रौपदीविषयीं निष्कारण हीन भावना जागृत केल्याचें पाप पदरांत पडून वर विनोद साधत नाहीं तो नाहींच. याच बाबतींत केळ्कर, सुभाषित आणि विनोद या पुस्तकांत म्हणतात,

> जे लोक विनोदी म्हणून आपल्यास दिसतात त्यांपैकीं कित्येक असे असतात कीं, त्यांस जगांतील प्रत्येक गोष्ट तुच्छ वाटते.... अशा लोकांना जगांत वंद्य किंवा पवित्र असें कांहींच नसतें. परंतु अशा लोकांनीं केलेल्या विनोदास विनोद संज्ञाच देतां येत नाहीं. [ पृ. ११३–आवृत्ति दुसरी ]

दुसरा प्रकार यापेक्षांही बीभत्स होय. एखाद्याच्या स्वाभाविक किंवा शारीरिक व्यंगाबद्दल थट्टा करून हर्षोत्पत्ति करणें हें विनोदाचेंच एक आंग खरें. पण व्यंगदर्शनाला सुद्धां कांहीं तरी सीमा आहे. आणि, शारीरिक व्यंग हें मनुष्यकृत नसतें व मनुष्याच्या उपायानें तें सुधारणेंही शक्य नसतें, ही गोष्ट लक्षांत आणली असत

अशा व्यंगाविषयीं जितकें कमी उपहासानें व जास्त सद्भावानें लिहावें तितकें तें सभ्यपणाचें व सहृदयपणाचें होणार आहे. पण गडकरी, अशा व्यंगांची जी बेहद्द हेटाळणी करतात ती अगदीं असह्य आणि नाटककाराच्या अभिरुचीविषयीं किळस उत्पन्न करणारी आहे. असला हा अमानुष उपहास रंगभूमीवर पहात ऐकत असतां पीटांतील लोक उघड, आणि पुढचे लोक लाजून, पण हंसत असतात हें प्रत्यक्ष अनुभवाला येतें. व यामुळें, ग्रंथकार आणि त्याचे वाचक व प्रेक्षक या सर्वांच्याच अभिरुचीची कींव करावीसें वाटतें. विकृतरूपोपहासाचा हा प्रकार प्रेमसंन्यासांत सुरू झाला व भावबंधनापर्यंत अनिर्बंध वाढतच राहिला. इतका कीं, पुढें पुढें तो पूर्ण सभ्यमान्य होऊन अलीकडे या प्रकाराचे पूर स्वाभाविकतःच वाढूं लागले आहेत.

अर्थात प्रेमसंन्यासांत या दोन्ही प्रकारांची नुसती सुरुवात आहे. अगदीं प्रथम, हा पूज्यभावनेचा अभाव अंक १ प्रवेश ३ मध्यें वसंतरावाच्या भाषणांत सांपडतो. तो आपल्या आईबापांसंबंधीं म्हणतो,

> आमचे निस्सीम हिंदु हाडाचे वडील द्रुमनताईच्या पुनर्विवाहाची गोष्ट काढितांच जानव्याचा गळफांस घेण्याची तयारी करितात आणि मातोश्री चुलींत सती जावयाला तयार होतात. [ पृ. १९ ]

आई, बाप, त्यांचे पूर्व ग्रह, जानवें आणि आईचें

गृहकृत्य, यांचें एकाच दमांत किती विद्रूप व आदरशून्य हें चित्र! हें इतकें भडक व बोंचक आहे कीं तें वसंतरावासारख्याच्या तोंडीं आहे हें समर्थन लंगडेंच पडणार. पुढें मथुराही याच वर्गांत येते.

> **गोकुळ**—खर्चाचें खातें हिच्या हातीं असून जमा माझ्या हस्तें व्हायची. साखरेच्या गोण्या तिच्या कामीं आणि मी नुसता ओझ्याचा बैल.
>
> **मथुरा**—( स्वगत ) हें मात्र अगदीं खरें! म्हणून तर ऋषिपंचमीच्या दिवशीं मला खणखणीत उपास पडतो! [पृ. ५७]

बैल शब्दावर कोटी करण्याकरितां एका हिंदू स्त्रीच्या तोंडीं केवढें धाडसी वाक्य हें!!

दुसरा विकृतरूपदर्शनाचा प्रकार या सबंध प्रवेशभर आहे. वास्तविक विनोदप्रसंगाला अत्यंत अनुकूल असा हा प्रवेश आहे. गोकुळ आणि विद्याधर जिच्याविषयीं खुद्द बोलत आहेत, तीच प्रत्यक्ष तेथें हजर; तिच्या आगमनाची वार्ता बोलणारांना नाहीं; पण प्रेक्षकांना मात्र सर्व कांहीं दिसत आहे. असा मोठा मनोरंजक आणि कुतूहल उत्पन्न करणारा हा प्रसंग आहे. आणि त्याची सुरुवातही ठीक झाली. जोंपर्यंत गोकुळ आपल्या बायकोच्या स्वभावदोषांसंबंधीं बोलत आहे तोंपर्यंत या विनोदी परिस्थितीचें आकलन करणें कल्पनेला शक्य आहे. पण लगेच पुढें

मथुरेच्या स्वरूपवर्णनाचा भाग येतो. आणि या सर्व प्रवेशाचा विघाड होतो. आवेशाआवेशानें, आणि आपल्या स्वभावाला किंवा ज्ञानाला विसदृश व अपरिचित वाटणाऱ्या रूपकालंकारादिकांनीं जेव्हां गोकुळ स्वतःच्या बायकोच्या कुरूपतेचें वर्णन करूं लागतो, आणि त्यांत लहान सहान अवयवांचीही मोजदाद करण्यास चुकत नाहीं तेव्हां खास असें वाटतें कीं, हा मानवहृदयी मनुष्य नाहीं. मथुरा जें म्हणते कीं, 'यांना तर मनुष्य म्हणायचेंही कारण नाहीं.' (पृ. ५४) तेंच हळु हळु खरें वाटूं लागतें. खरोखर या अमानुष उपहासापासून असा काय मोठा रस उत्पन्न होतो हें मला कळतच नाहीं. आणि गोकुळला मनुष्य म्हणावयास तयार नसणारी मथुराच जेव्हां स्वतः त्याच्या मिसाळ खुंटांचें वगैरे वर्णन थोडक्यांतच करूं लागतें तेव्हां तर नाटककारानें अगदीं मात केली असें म्हणण्याची पाळी येते.

हा प्रकार इतका हिडीस आहे कीं, त्याचा योग्य वेळीं योग्य तोच निषेध झाला पाहिजे. नाहींपेक्षां ही सांथ विनोदीबुव अशा गडकरीभक्तांमध्यें झपाट्यानें पसरून महाराष्ट्र सारस्वतांत अत्यंत हीन स्वरूपाची भर पडेल. स्तुतीच्या भरांत खुद्द गडकऱ्यांचे हे दोष दाखविण्याचें राहिल्यामुळें, त्यांच्याच पुढच्या पुढच्या नाटकांत हा प्रकार कसा वाढला व भावबंधनांत त्यावर कळस कसा चढला हें आतां

हळु हळु निदर्शनास येईलच. ही हेटाळणी व उपहास यांना विनोद न म्हणतां, अर्वाच्य थट्टा या सदरांत ज्या दिवशीं त्यांना, निदान विचारी मंडळी तरी घालावयास तयार होतील तो सुदिन.

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं. ......
ता. ......
ठाणे.

## प्रकरण पांचवें

### पुण्यप्रभाव

सामान्य अशा सिद्धांतांचें विवेचन वेडयांचा बाजार आणि प्रेमसंन्यास यांच्या चर्चेंत येऊन गेलेंच आहे. आतां फक्त उदाहरणें दाखविण्याचें व क्वचित ठिकाणीं थोडें टीकेचें एवढेंच काम उरलें आहे.

शाब्दिक श्लेषात्मक व इतर कोटयांची पुण्यप्रभावांतही रेलचेल आहे. अगदीं नेहमींची गडकऱ्यांची आवडती नांव शब्दावरील कोटी पुढील ठिकाणीं सांपडते.

**अंक १ प्रवेश १**

**सुदाम**--आपल्या नांवावर पाणी सोडतांच दुसऱ्याचीं नांवें बुडवायला मोकळे ! [ पृ. १४ ]

\+ + +

**सुदाम**—कायहो, आपलें नांव सांगाल का ?

**नूपुर**—माझ्या बारशाच्या पूर्वीच माझे आईबाप

मेले, तेव्हां मला नांव ठेवण्याचें तसेंच राहिलें आहे. [पृ. १६]

### अंक २ प्रवेश १

**सुदाम**—चांगली भरचवाठ्यावर त्याच्या नांवानें हांका मारीत सुटलीस ती!

**दामिनी**—आतां माहेरच्या माणसाचें नांव काढायची सुद्धां चोरीच वाटते? [पृ. ४९]

या खेरीज इतर कोटयांची यादी पुढीलप्रमाणें–

### अंक १ प्रवेश १

**सुदाम**—आपल्या नुसत्या अंगाला भस्म चोपडतां पण दुसऱ्याचा सारा संसार भस्म करून टाकितां. [पृ. १४]

\+ + +

**सुदाम**—इकडे हातांतल्या चिमटयानें चिलमीवर निखारे ठेवण्याचा जरा सराव होतो न होतो तोंच दुरून दुसऱ्याच्या अंतःकरणाला चिमटे घेऊन त्यावर अंगार ठेवण्याची तयारी! [पृ. १४]

### अंक १ प्रवेश २

**कंकण**—लाथ मारीन तिथें पाणी काढीन अशी धमक आहे माझ्या अंगांत!

**नूपुर**—पुढें पुढें या प्रतिज्ञेचा शेवट, घरांतल्या घरांत बायकोला लाथ मारून तिच्या डोळ्यांतून पाणी काढण्यांतच होत जातो. [पृ. ३९]

### अंक २ प्रवेश १

**कंकण**—अरे, अरे, अरे, मग तूं अशा बायकोशीं एकदम काडी कां मोडून देत नाहीस?

**सुदाम**--आपल्या धर्माप्रमाणें संसाराच्या समुद्रांत बुडत्याला काडीचासुद्धां आधार मिळण्याची आशा नाहीं ! [ पृ. ५३ ]

प्रेमसंन्यासांतही अशीच काडी शब्दावर कोटी आहे.

**अंक ३ प्रवेश ६**

**सुदाम**--हा कोंडवाडा आहे वाटतें हरवलेलीं जनावरें ठेवण्याचा ?

**नूपुर**—एकानें मला सांगितलें, कीं इथें एका गरीब गाईचा कोंडवाडा केला आहे म्हणून !

**सुदाम**—अस्सें काय ? बरें, दरवाजावर खडे मारलेस ते कशाला ?

**नूपुर**--आपला खडा टाकून पाहिला वासरूं आहे का म्हणून ! [ पृ. ८३ ].

**अंक ६ प्रवेश ३**

**नूपुर**—आतां मला राजाज्ञेचा आधार आहे.

**कंकण**--आतां राजाज्ञा राहील बाजूला आणि देवाज्ञा मात्र होईल तुला ! [ पृ. १२२ ]

या सर्व कोटयांत सरस कोणती नीरस कोणती हें निवडणेंच कठीण आहे. इतक्या त्या पांचट आणि उथळ आहेत. आणि त्या सर्वांवर अंक २ प्रवेश ३ मधील कंकणाच्या एकपरिच्छेदात्मक स्वगत भाषणानें कळस चढविला आहे. आमच्या इकडे हौशी आगरी जातीचे लोक उत्सवानिमित्त नाटकें करतात आणि मग त्यांत त्यांना 'स्वगत,' 'पडद्यांत' हे शब्द सुद्धां नक्कल म्हणतांना पाठ

असतात. अगदीं त्याच बावळटपणाची व पोरकटपणाची आठवण, कंकणाचें ' हे प्राणेश्वरी कीं हे प्राणदात्या ' वगैरे भाषण वाचून होते. पोरकट आणि हलक्या स्वरूपाचीं पात्रें नाटकांत असूं नयेत असें माझें म्हणणें नाहीं. मच ॲडो अबाउट नथिंग या शेक्सपिअरच्या नाटकांत डॉगबेरी काय कमी उथळपणाची बडबड करतो? पण त्या उथळ वाटणाऱ्या बडबडींत सुद्धां सहृदय माणसाला गंभीर अर्थ सांपडतो. तसें गडकऱ्यांच्या या कोटयांचें किंवा पचकळपणाचें नाहीं. त्यांतल्या त्यांत समाधानाला जागा एवढीच कीं, या नाटकांत प्रेमसंन्यासांतल्याप्रमाणें वरच्या दर्जाचीं पात्रें तरी या कोटयांच्या आखाडयांत उतरत नाहींत.

उलट, अश्लीलपणांत मात्र प्रेमसंन्यासापेक्षां येथें गडकऱ्यांनीं जास्त उदार हात दाखविला आहे. कदाचित सरावामुळें आणि अनुभवामुळें आलेल्या आत्मप्रत्ययाचा हा परिणाम असेल! कोटयांच्या वेळीं वरच्या दर्जाच्या पात्रांना त्यांनीं वगळलें, तसेंच यावेळीं त्यांना वगळतां आलें असतें; पण लोकप्रियतेच्या नादीं लागून तसें गडकऱ्यांनीं केलें नाहीं असें दिसतें:

अंक १ प्रवेश १ मध्यें सुदाम ईश्वराविषयीं म्हणतो, ' आजचा हा रागरंग असाच अंधेरांतला आईसा दिसतो. ' अनुदार कल्पना सुदामाच्या तोंडीं घालण्याचें कांहींच हरकत

नाहीं. कारण त्यायोगें त्याचा स्वभाव अधिकच खुलेल. पण त्या अनुदार कल्पना अश्लील भाषेंतच वठवल्या पाहिजेत असें कांहीं त्यावरून होत नाहीं; जवळ जवळ, या पुढील सर्वच प्रवेश वरच्या नमुन्याचा आहे. स्त्रीपुरुषसंबंधाविषयीं व स्त्रियांच्या पावित्र्याविषयीं हवीं तीं विचकट विधानें सुदाम आणि नूपुर यांच्या तोंडीं अनिर्बंध रीतीनें नाटककारानें घातलीं आहेत. आपल्या बालगोपालांसह जर एखादा कुटुंबी हें नाटक पहावयास गेला तर हीं अश्लीलतासूचक विनोदवचनें ऐकून आपल्या पत्नीसमोर व जाणत्या मुलांसमोर त्याला मान खालींच घालावी लागेल. शिवाय या प्रवेशांत स्वतंत्र बुद्धीचा फारसा अंश आहे असें नाहीं. फ्रेंच हास्यपर नाटकांत व दुसऱ्या चार्लस राजाच्या कारकीर्दींत रंगास चढलेल्या इंग्रजी हास्यपर नाटकांत अशा प्रकारचे प्रसंग वारंवार आढळतात. आणि त्यांचेंच हें जरा हुषारीनें केलेलें अनुकरण आहे. या नाटकांत अशा बाह्य अनुकरणाची छटा आणखीही एक दोन ठिकाणीं आहे; तिचा योग्य स्थळीं विचार करूं.

अंक १ प्रवेश २ मध्यें थोडा श्रृंगारमिश्रित असा बीभत्स विनोदाचा भाग आणून त्या सुंदर प्रसंगाचा गडकऱ्यांनीं विरस केला आहे. ज्यूलियस सीझर मधील पोर्शिया आणि ब्रूटस यांच्यांतील प्रसंगाची अंधुक आठवण करून देणाऱ्या या प्रवेशांत शेवटीं कालिंदी आणि वृन्दावन

[library stamp]

यांचें, गडकऱ्यांच्या आवडत्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे तोंडांत तोंड घातल्याखेरीज नाटककाराला राहवलें नाहीं. आणि तेंही कंकण तेथें उभा असतांना. देवघेव आणि दलाल या शब्दांकरितां कोणता प्रसंग नाटककाराला घडवावा लागला आहे, हें पुढील उताऱ्यावरून कळेल.

> **कालिंदी**—या रहस्याच्या नादांत आपण केतनाचा मुका सुद्धां घेतला नाहीं.
>
> **वृंदावन**—हं, रागावूं नकोस; हा घे आणि त्याला नेऊन दे!
>
> **कालिंदी**—भलतेंच! प्रेमाच्या बाजारांतली देवघेव दलालामार्फत होत नाहीं.
>
> **वृन्दावन**—प्रेमाच्या व्यवहारशून्य जगांत तर दोन जीवांचा एकजीव झाल्यावरच चुंबनाची देवघेव दलालामार्फत करावी लागते! [पृ. ३१.३२]

स्वतःच्या नोकराच्या समोर चाललेला हा अतिप्रसंग व त्यांत कालिंदीसारख्या स्त्रीरत्नाच्या तोंडीं प्रेमाचा बाजार हे शब्द, या गोष्टी किती सदभिरुचिसंपन्न आहेत नाहीं?

अंगवस्त्रावरची अश्लील सूचना या नाटकांतही आहे. कंकण, आपल्या वृंदावनासारख्या धन्याला म्हणतो आहे,

> धनीसाहेब, यांत हंसण्यासारखें कांहींच नाहीं! चाकरांच्या वांट्याला धन्याचीं जुनींपानीं वस्त्रें, अंगवस्त्रें, अशीं— [पृ. ३४]

नशीब वाचकांचें ! गडकरी शेवटचा शब्द पुरा करण्याच्या आणखी भरीस पडले नाहींत.

अंक १ प्रवेश ३ मध्यें नूपुर किंकिणीविषयीं म्हणतो,

> माझेंही तिच्यावर प्रेम आहे ! तिचें तुझ्याशीं कांहीं लग्न नाहीं लागलेलें अजून ! माळावरची माती कोणींही उपसावी ! [पृ. ३८]

अविवाहित कुमारिकांसंबंधीं किती हिडीस कल्पना ही ! प्रत्यक्ष व्यवहारांत कॉलेजांत शिकणाऱ्या मुलींशीं मुलांचा होणारा चावटपणा या शास्त्राधारें अगदीं क्षम्य आणि उचित ठरेल. याचेंच पुढें नूपुर म्हणतो,

> काय केसाळ तोंड हें ! किंकिणि, चुंबनासाठीं या बोकडासारख्या दाढीमिशीच्या जंगलांत तोंड घालणें म्हणजे पुरा वनवासच म्हणायचा. [पृ. ३९-४०]

### अंक २ प्रवेश १

> **दामिनी**—साधु ? कुठले साधु ? त्यांची एखादी खूण सांगा बघूं !
>
> **नूपुर**—काल जातां जातां ज्यांनीं तुम्हांला खूण केली ते ! पटली खूण ? [पृ. ४६]

या चावट कोटीला मदत प्रत्यक्ष हावभावांची मिळाली म्हणजे मग हास्यरसाला बघावयालाच नको ! त्याच प्रवेशांत पुढें सुदाम घरीं आला असतां, या तिऱ्हाइताला आपल्या स्त्रीशीं विश्रंभालाप करीत असतांना पाहून, साहजिकच

रागावून म्हणतो, 'बेशरम, बदमाष;' त्यावर नूपुर उत्तर करतो,

> तुमचा मत्सर विलक्षण आहे बुवा! अर्ध्या घटकेची
> वडीलकी इतकी गाजवूं देणार नाहीं मी! [पृ. ४७]

प्रत्यक्ष कुंटणखाण्यांत इतकी निर्मर्याद व पचकळ भाषणें होत असतील काय? माहितगारांनीं साक्ष पटवावी. साध्या दृष्टीला तर हें कांहीं अजब स्वभावदिग्दर्शन दिसतें. पण खुबी ती याहूनही पुढें आहे. खुद्द सुदामच थोड्या वेळानें म्हणतो,

> अगदीं अवेळीं आलांत हो.... अजून तरी चला.
> तुम्ही काढता पाय घ्या आणि मला जरा संधि द्या!
> [पृ. ४७]

बेशरमपणाची कमाल यापेक्षां या प्रकाराला जास्त काय म्हणावें? पण कदाचित वाचकांच्या ध्यानांत आपली अश्लील सूचना येणार नाहीं अशा समजुतीनेंच कीं काय गडकरी नूपुराच्या तोंडीं लगेंच पुढें हें भाषण घालतात,

> मी मुळींच ताकास तूर लागूं देत नाहीं. भाग्यशाली
> आहांत बुवा. [पृ. ४७]

आतां तरी 'मला संधि द्या,' याचा अर्थ वाचकांना कळलाच पाहिजे कीं नाहीं? कोण हा अट्टाहास!

यापुढें नवरा बायकोचा प्रवेश. जरा जास्त रहस्यमय भांडण त्यांच्यामध्यें व्हावयास हरकत नाहीं. आणि तेंही

गूढार्थमय झालें तर चांगलेंच दिसेल. पण पुढचीच कोटी पहा;

**दामिनी**—परवां असेंच; माझ्या माहेरचा तो हा भेटला, त्याच्याशींच लागलीं हुमरीतुमरीवर आलों; त्यानें आपला माझ्याकडे पाहून कानाडोळा केला एवढें बरें झालें, नाहीं तर—

**सुदाम**—एवढें बरें झालें नाहीं, पण एवढेंच वाईट झालें; जो तो तुझ्याकडे पाहून असा कानाडोळा करतो म्हणून तर ही आटाआट एवढी. [पृ. ४९]

एक कानाडोळा शब्दावर कोटी करण्याच्या भरांत कोण विचकटपणा हा ! पण एवढयावरच संपलें नाहीं; सुदामाचें पुढचेंच भाषण पहा.

देवदर्शनाच्या वेळाच पहा मुलीं कशा निवडल्या आहेत त्या ! पहांटेची कांकडआरती तर मध्यान्हीस शेजारती ! [पृ. ४९]

यावर टीकात्मक आतां काय लिहावें ? याच्या जोडीला कंकणाचें हें एक भाषण बसविलें म्हणजे पुरतें माप भरलें.

लग्नाच्या बायकोवर पुरुषाचें कधीं प्रेम ऐकलें आहे कुणी ? प्रेम असें चुलीपाशीं बसायचें नाहीं; तें वारा खात, बाहेर तरंगत फिरतें." [अंक४,प्र.२,पृ.९५]

गडकऱ्यांच्या 'विनोदांतच फक्त अश्लीलता आहे असें नाहीं, तर ती त्यांच्या नाटकांतून इतरत्रही विखुरलेली आढळते.

त्यांतलें एकच उदाहरण द्यावयाचें तर वृंदावनाचें पुढील भाषण पहाण्यासारखें आहे.

**वृंदावन**—नवऱ्याच्या नांवाचा मोठेपणा चारचौघांत केव्हां गाजवीन असें तिला होऊन जातें. पतीच्या पुरुषार्थासंबंधानें रहस्यांतलें रहस्यसुद्धां स्त्रीजवळ ठराविक मुदतीबाहेर टिकत नाहीं ! या गोष्टींची केतनासारखीं पाळण्यांतलीं पोरें सुद्धां साक्ष देतील.

[ अंक १, प्रवेश २, पृ. २७ ]

\+ + +

पुण्यप्रभावांत प्रसंगगत असा जो विनोद साधला आहे तो बहुतेक अनुकरणात्मक आहे. स्वतंत्र रचनाकाराचा मान गडकऱ्यांना त्या बाबतींत मिळणार नाहीं. पण अनुकरणांत सुद्धां प्रत्यक्ष विनोदपर परिस्थिति निर्माण करण्यापेक्षां, शृंगारपूर्ण, अचकटविचकट आणि नीरस कोटयांवरच त्यांनीं भर दिला आहे हें आतांपर्यंतच्या उताऱ्यावरून दिसेलच. पहिल्या अंकांतील पहिल्या प्रवेशांत विनोदप्रसंग नसून, सुदाम आणि नूपुर यांचीं बाष्कळ प्रवचनें मात्र आहेत. त्यामुळें संविधानकाच्या गतीला फारशी चालना मिळण्याचें काम मुळींच होत नाहीं. फक्त त्यांचें स्वभावाविष्करण करण्यास थोडीशी मदत होते एवढेंच. त्यानंतर तिसऱ्या प्रवेशांत किंकिणीचा संबंध आहे. आणि त्या ठिकाणीं किंकिणीच्या स्वभावगत विनोदामुळें पुष्कळच बहार आली आहे यांत

संशय नाहीं. पण नूपुराच्या जोडीला कंकण उभा ठाकल्यावर जो शिमगा होतो त्यानें सर्व प्रवेशाचा रसभंग झाला आहे. हातीं आलेला हा चांगला विनोदप्रसंग गडकऱ्यांनीं वायां दवडला आहे. अंक २ प्रवेश १ मधील अश्लील कोट्यांसंबंधीं वर लिहिलेंच. या प्रवेशांत, पेटाऱ्यांत बसण्याचा प्रसंग हा पाश्चात्य नाटककारांच्या अनुकरणाचा प्रकार आहे. आणि तोही नीट साधला आहे असें म्हणतां येणार नाहीं. कारण, पेटाऱ्यांत अथवा अन्य गुप्त जागीं एकाला बसवून, दुसऱ्याशीं रंगभूमीवरचें पात्र बोलत असावें, नवीन आलेल्या माणसाला मात्र पटाऱ्यांत कोणी आहे याची जाणीव नसावी, आणि मग त्यांच्यांतील भाषणांनीं श्रोत्यांच्या मनांत कुतूहल व उत्सुकता उत्पन्न व्हावीं; अशा तऱ्हेनें बहुधा हा गोपनाचा प्रवेश सर्वत्र रचण्यांत येतो. इंग्रजी वाङ्मयांतील या प्रकारचें उत्कृष्ट उदाहरण म्हणजे शेरिडन याच्या स्कूल फॉर स्कँन्डलमधील, पडद्यामागें लेडी टीझल असतांना जोसेफ व सर टीझल यांच्यामधील संवादाचा प्रवेश होय. स्क्रीन सीन म्हणून हा प्रवेश सुप्रसिद्ध आहे. तसा प्रकार या ठिकाणीं साधून थोडा हर्षोत्सुकताप्रसंग गडकऱ्यांना निर्मितां आला असता; पण मग पुढची शब्दाशब्दी कशी साधली असती ? याच प्रवेशाचा पुढचा भाग, त्यांतील अश्लीलता सोडून दिली तर,

चांगला विनोदप्रसंग आहे. पण हा बुरखाप्रवेश इतका लांबविला आहे कीं, पुढें नाटकांत त्याचा जो उपयोग करण्यांत आला आहे त्या मानानें ही लांबी असह्य वाटते.

पुण्यप्रभाव हें नाटक हास्यप्रधान खरें; त्याच्या विषयांत, प्रेमसंन्यास किंवा एकच प्याला यांच्याइतकें गांभीर्य नाहीं, हेंही तितकेंच खरें. पण गडकऱ्यांना नाटकाचा शेवट मात्र तितका हास्यप्रधान व गांभीर्यविरहित करतां आला नाहीं. दुसऱ्या अंकांतील वसुंधरा व भूपाल यांच्या प्रवेशापासूनच संविधानकांत खेदमिश्रित गंभीरतेची छटा पसरली. आणि वृंदावनानें चवथ्या अंकांत कालिंदीला कैदेंत टाकल्यावर तर संविधानकाच्या चढत्या कमानीचा मध्य गांठला असें वाटूं लागतें. आतां या पुढें वास्तविक द्रुत गतीनें कथानकाचा प्रत्यक्ष शेवट प्रेक्षकाला दिसून त्याची बोळवण व्हावयास पाहिजे. परंतु या नंतर सुद्धां दामिनी, कंकण, किंकिणी यांचे, खेडयांतील ललितांना लाजवितील इतके पचकळ प्रवेश आलेच आहेत. अगदीं सहाव्या अंकांत, कीं ज्या वेळीं पुढचा प्रवेश पांच मिनिटांच्या आंत होऊन, नाटककार आपलीं सर्व सूत्रें गुंडाळणार असें वाटूं लागावें, त्यावेळीं सुद्धां, पुन्हां कंकणाचें प्रेमशास्त्र वर डोकें काढतेंच.

वास्तविक नाटकाची सुरुवात करणें हें जितकें कठिण

आहे, त्यापेक्षांही मांडलेला पसारा आवरता घेणें हें जास्त कठिण आहे. परंतु प्रेमसंन्यासांत आणि पुण्यप्रभावांत, दोन्हीं ठिकाणीं, कथानक द्रुत गतीनें नाट्यमध्यापासून प्रत्यक्ष शेवटाकडे धांवत असतांनाही, विसंवादी विनोदप्रसंगांस वाव देऊन गडकऱ्यांनीं आपली अकुशलता प्रगट केली आहे. किंबहुना हंशा पिकविण्याच्या मोहाला बळी पडून त्यांनीं आपल्या नाट्यरचनेंत निष्कारण बिघाड उत्पन्न केला आहे. यामुळेंच अशा या विनोदी म्हटल्या जाणाऱ्या प्रवेशांतून क्वचित थोडा फार भावनानिष्ठ विनोद सांपडला, तरी तो अनुचित प्रसंगामुळें बोंचकच होतो.

या नंतर, अमानुष विनोद म्हणून ज्याचें मीं नामकरण केलें त्याचीं उदाहरणें आतां पहावयाचीं. प्रेमसंन्यासांत मथुरेचें हिडीस वर्णन झालें; यांत तो मान कंकणाला मिळाला आहे. अंक १ प्रवेश ३ मध्यें, ज्यामुळें वर्ण्य विषयाबद्दल हसूं येण्याऐवजीं तिटकाराच वाटेल अशा प्रकारचें किळसवाणें वर्णन निदर्शनास येईल. ब्रह्मदेवकृत शरीरव्यंगावर भडिमार करण्याची गडकऱ्यांची ही हौस मोठीच चमत्कारिक आहे.

पण पूज्यभावाच्या अभावाचीं या नाटकांतील उदाहरणें तर मनाला चीड आणणारीं आहेत. सुदामाचीं पुढचीं अंक २ प्रवेश १ मधील भाषणें वाचा;

**सुदाम**—आणि म्हणूनच बायकांना सारखें जपलें पाहिजे ! परपुरुषाचें वारेंसुद्धां लागूं देतां कामा नये ! माझी बायको आरशांतल्या माझ्या प्रतिबिंबाशेजारीं फाजील सलगीनें उभी राहिली तरीसुद्धां मला दुजाभाव वाटतोच. सप्तर्षींच्या तांड्यामध्यें उघड्या आकाशांत वयोवृद्ध वसिष्ठानें आपल्या बुद्रूक सोबतिणीला दाटीदाटीनें जवळ बसवून घेण्याचें दुसरें काय कारण असणार ? नळराजानें वनवासांत दमयंतीची वरात कशाला काढिली असावी ? वृद्ध कुंतीला विदुराच्या घरींच ठेवून तरण्याताठ्या द्रौपदीला मात्र बरोबर वागविण्यांत पांडवांचा हाच हेतु होता ! श्रीरामानें सीतेला रानावनांत नेली, आणखी तिथें सुद्धां अशा जरबेंत ठेवली, कीं लक्ष्मणासारख्या सख्ख्या भावाला तिच्या नुसत्या दागिन्यांचीही ओळख नीटशी असूं नये ! थांब, नीट ऐकून घे ! पुढेंमागें संसारांत पडलास तर हे दाखले तुला उपयोगी पडतील ! विष्णूनें लक्ष्मीसारख्या चंचल बायकोला अष्टौप्रहर पाय चेपीत बसवून ठेविली आहे; बिछाइतीच्या निमित्तानें शेषासारख्या जातिवंत नागाचा पहारा ठेविला आहे आणि भंवतालीं लांब शेंडीचा नारद, अणकुचीदार चोंचीचा गरुड, किंवा घोडमुखाचा तुंबर यांसारख्या विद्रूप सोंगांचाच गराडा घातलेला आहे. अरे, भोळा शंकर तर शेजार टाळण्यासाठीं मसणांतच जाऊन बसला ! तसबिरींतून देवादिकांची बायकांना वामांकीं खिळवून बसविण्याची हौससुद्धां शृंगारवृत्तीची नसून

सावधपणाचीच असावी! आपल्या आर्य पूर्वजांना सौंदर्याची मुळींच चाड नव्हती. [पृ. ५१–५२]

\+ + +

**सुदाम**—दामिनि, हा पतिव्रताधर्म नाहीं; सीतेनें रामाला असें म्हटलें नाहीं; अहिल्या गौतमाच्या विद्रूप दाढयामिशा आणि जटा पाहूनही असें बडबडली नाहीं; सुग्रीवासारख्या माकडाचीसुद्धां तारेनें अशी हेटाळणी केली नाहीं; रावणाची दहा तोंडांची प्रभावळ पाहूनसुद्धां मंदोदरीला कांहीं भुताटकीची शंका आली नाहीं; पांच पांडवांच्या पकडींत पडूनसुद्धां द्रौपदीनें भुताखेताबद्दल अवाक्षर काढिलें नाहीं; तुम्हां आजकालच्या हुच्च बायकांपेक्षां त्या बिचारींवर पातिव्रत्याची पांचपट जबाबदारी होती. पण ती माउली तसल्या जोखमाच्या अडचणींतून सहीसलामत बाहेर पडली. आणि तुला एक नवऱ्याबद्दल पातिव्रत्य संभाळायाचें तर लागलीच तीन तेरा करते आहेस. [पृ. ४८.]

\+ + +

**सुदाम**—( स्वगत ) खरेंच; द्रौपदीचा दृष्टांत जरा चकला खरा, सीता सहा महिने परघरीं राहिलेली,—तारेला दोन नवरे, [**तारा म्हणजे हरिश्चंद्राची तारामती ही गोष्ट सुद्धां गडकरी विसरतात**] अहिल्येच्या बाबतींत इंद्राचा पाजीपणा! छे:, ही पतिव्रतांची यादी एखाद्या बदफैली राणीनें कुणा पंडिताला पैसे चारून करून घेतल्यासारखी वाटते!

[पृ. ४८]

पूज्यवर श्रीपाद कृष्णांनीं गणपतीच्या हेटाळणीला सुरुवात करून श्रीगणेशा केला; त्यांचे शिष्य पवित्र स्त्रियांवरही आपला हल्ला चढवूं लागले; आणि आतां शिष्यांचे शिष्य मौजा उडवीत आणि घोडे हांकीत मुंबापुरीमध्यें दर आठवड्या पंधरवड्याला शिमगा करीत आहेत. खुद्द गडकऱ्यांची सुद्धां या बाबतींत सारखी प्रगतीच झाली. प्रेमसंन्यासांत या प्रकारास नुसती सुरुवात झाली; पुण्यप्रभावांत थोडा आत्मविश्वास वाढला; आणि पुढें राजसंन्यास, एकच प्याला व भावबंधन, यांत त्याचा इतका कळस झाला कीं, जगांत गडकऱ्यांना कांहीं पूज्य वाटतें कीं नाहीं हें कळेनासेंच झालें. हा सर्व फक्त एकाच गोष्टीचा परिणाम. गंभीर व विशुद्ध विनोदाची आमच्यांत कल्पनाच कमी; आणि ज्यांना होती त्यांचा — कोल्हटकर, गडकरी यांच्या सारख्यांचा— पीटांत हंशा पिकविण्याचा अट्टाहास. यामुळें गडकरी आणि कोल्हटकर यांचाच विनोद फक्त लोकांना परिचित आणि आवडणारा; आणि बिचाऱ्या केळकरांच्या रसाळ विनोदाची कोणाला आठवणही नाहीं. बरें असें कोणी म्हणेल, तर त्याला मत्सरी वगैरे विशेषणें लावून गिल्ला करून खालीं बसविण्याची सांप्रदायिकांची करामत. असा कांहीं विलक्षण प्रकार आज महाराष्ट्र सारस्वतांत झाला आहे.

## प्रकरण सहावें

### राजसंन्यास

राजसंन्यास हें नाटक अपुरें आहे. वेड्यांच्या बाजारांत दोन अंक तरी पुरे आहेत. येथें अंक तर राहोच पण कांहीं कांहीं प्रवेशही अपुरे आहेत. गडकऱ्यांना कोणत्या प्रसंगाची कशी जुळणी करावयाची होती हेंही येथें स्पष्टपणें समजत नाहीं. पांचव्या अंकाच्या थाटावरून एवढें मात्र वाटतें कीं, शेवटच्या गंभीरपणांत भलत्या प्रसंगानें विरस पाडावयाचा गडकऱ्यांचा बेत बहुधा नसावा. पण आरंभापासून अंतापर्यंत कोठेंच कांहीं धर नसल्यानें, या नाटकांत औचित्य अगर अनौचित्य यांसंबंधीं विवेचन करणें शक्य नाहीं. फक्त कोटया, अश्लीलपणा, इत्यादिकांचें दिग्दर्शन करूनच एकच प्याल्याकडे वळलें पाहिजे. निवळ शाब्दिक कोटयांचीं उदाहरणें हीं पहा.

## अंक १ प्रवेश २

**देहू**—या उड्या नाहींत! जिवबा, या उड्या नीट यायला दंगलींत दिवस घालवावे लागतात.

**जिवाजी**—दंगल म्हणजे? धिंगामस्ती?

**देहू**—अहो, दंगल म्हणजे आखाडा! आतां मीं उड्या मारल्या नाहींत, दोन बैठका मारल्या!

**जिवाजी**—या बैठका मारायला शिकण्यांत आजवर वेळ घालविलास म्हणून तर तुझ्या नशिबानें अशी ही बैठक मारली आहे. [पृ. १४]

+ + +

**देहू**—अहो, फुकट होत नाहीं देहाची तयारी! अशी मेहनत करावी लागते.

**जिवाजी**—तुझ्या देहाच्या तयारीसाठीं तुझ्या जातभाईंना मात्र खरी मेहनत पडेल! [पृ. १५]

किती किळसवाणा ग्राम्यपणा हा! याच प्रवेशांत पुढें जिवाजी म्हणतो, ' शिवाजीच्या नांवांत रामदासाइतका राम नाहीं. ' पुन्हा नांव शब्दानें ओढलेंच! अश्लील कोटीचें एक उदाहरण याच प्रवेशांतील पुढें दिलें आहे तें पुरेसें आहे. जिवाजीच म्हणतो,

अरे, बालपणीं म्हणजे सुमार सात आठ वर्षेंपर्यंत मीं सुद्धां बाळब्रह्मचारीच होतों. पुढें मात्र शेजारीं पाजारीं—( कावेबाजपणानें हंसतो ) [पृ. २१]

या अश्लील सूचनेला आणखी अभिनयाची भर. किती अभिजात विनोद आहे हा!

पण, कोटया आणि अश्लीलसूचकता यापेक्षां या नाटकांत, आहे या अर्ध्या मुर्ध्या स्थितींत सुद्धां, अमानुष विनोदाची प्रगति बरीच दिसते. वेडयाच्या बाजारांतून प्रेमसंन्यासांत पाऊल टाकतांना, बाष्कळ व पोरकट कोटयांपेक्षां शब्दश्लेषांची आवड वाढली आणि या अमानुष विनोदाची भर पडली. पुढें, पुण्यप्रभावाच्या वेळीं अश्लीलता अधिक वाढली; परंतु कोटयांचें प्रमाण कमी होऊन अमानुष विनोदाचें प्रमाण पुष्कळच वाढलें. आणि पुढें मग प्रत्येक नाटकांत त्याचीच सारखी वाढ होऊन भावबंधनांत तर अगदीं कळस झाला. राजसंन्यास पुरें झालें असतें तर त्याच्यांत आणि भावबंधनांत या प्रकाराबद्दल अहमहमिकाच लागलेली दिसली असती. जास्त टीका करण्याच्या भानगडींत न पडतां पुढें नुसते उतारेच देतों.

### अंक १ प्रवेश २

**जिवाजी**—अक्षरांच्या तऱ्हा अगदीं हुकमी ! गिचमिड अक्षरें काढलीं तर वडारणीचें केंस उकलतां येतील; पण तीं अक्षरें उकलायचीं नाहींत ! [ पृ.१२–१३ ]

प्रेमसंन्यासांत जपानी सौंदर्यावर हल्ला; येथें एका सबंध वडारी जातीवर हल्ला ! आतां हेटाळणीचा, टवाळीचा व आदरशून्यतेचा हा नमुना पहा.

### अंक १ प्रवेश २

**जिवाजी**—आतां उघड माप पदरांत घालूं लागलों

तर म्हणशील कीं, पंत आडमाप बोलतां म्हणून : अरे, शिवाजी म्हणज मूठदावल्या हातीं साडेतीन हात उंचीचा, नाकीं डोळीं नीटस, काळगेल्या रंगाचा, रांकटलेल्या अंगाचा, हरहुनरी ढंगाचा, लिहिणें पुसणें बेतासबात, गुडघ्यांत अमळ अधू, असा एक इसम होऊन गेला ! त्याची काय मातब्बरी सांगतोस एवढी? म्हणे हिंदुपदपाच्छाई उठविली ! कायरे, मोंगलाई मोडलीन् आणि मराठेशाही झाली म्हणून इकडची दुनिया तिकडे झाली वाटतें? शिवाजीच्या राज्यांत लिंबोणीला आंबे लागले का शेळीनें आपली पोर वाघाच्या पेटयाला दिली, कां कणसांतून माणसें उपजलीं? अरे, केलें काय असें शिवाजीनें? मोंगलाईत हुकमती केसांची टोळी दाढीखालीं लोंबत होती ती मराठेशाहींत कवटीवर चढली एवढाच लाभ ! शिवाजी नशिवाचा म्हणून नांव झालें इतकेंच ! त्यांतून तुला खरें सांगूं? अरे, खरा मोठेपणा अशा आरडाओरडीवर नसतो ! शिवाजीची खरी लायकी चारचौघांना पुढें कळणार आहे ! त्या माणसांत कांहीं जीव नाहींरे !

[ पृ. २० ]

\+ + +

**जिवाजी**—बेटा देहू, या जगांत खऱ्याकडे कोणी खोल नजरेनें बघत नाहीं ! ऐन मुहूर्तावर नारायण कुळकर्णी "सावधान" ऐकून सावध झाला आणि संसार सोडून श्रीसमर्थ रामदास झाला एवढेंच काय तें लोक बघतात ! पण नारायण पळाला कां याचा

कुणी नीट विचार करीत नाहीं! त्याला सांगून आलेली मुलगी काय चेहऱ्यामोहऱ्याची, कुळशीलाची होती याचा कुणी विचार केला का आजवर! अरे, बाबत अगदीं साधी आहे! समर्थांच्या गळ्यांत बांधण्यासाठीं आणलेल्या त्या लग्नाच्या घोरपडींत कांहीं तरी मोठी गोम होती! आंवत्याभंवत्यानीं नवऱ्यामुलाला खच चिडविलें असेल; म्हणून आयत्या वेळीं पोराच्या जातीनें पळ काढिला आणि दुसरें काय? सावधान कसले नि समर्थ कसले? पुढें अशा फकिरी बाण्यानें अंगाला राख चोपडून नारायणाचा रामदास झाला, झालें! बाकी, खरें म्हणशील तर समर्थांला संसाराची मनापासून आवड होती! कां म्हणून नाहीं विचारिलेंस! तर त्यांनीं स्पष्ट म्हटलेंच आहे कीं, आधीं प्रपंच नेटका करावा आणि मग म्हातारपणीं परमार्थ पहावा म्हणून! आणि एवढ्यासाठींच अटकळीचा मनुष्य आधीं प्रपंचाचा पसारा फैलावून सोडतो! शिवाजीनें सहा बायका कारे केल्या? नेटका प्रपंच साधावा म्हणून! [ पृ. २२ ]

पण, हें सर्व गडकरी कांहीं स्वतः लिहीत नाहींत, जिवाजीसारख्या पाजी मनुष्याच्या पाजीपणाचें हें प्रदर्शन आहे, असा नेमका पक्ष या ठिकाणीं उभा करण्यांत येईल, हें मी जाणून आहें. तथापि, जिवाजीच्या तोंडून कां होईना, पण महाराष्ट्राच्या या दोन महाभाग पुरुषांची टवाळी — पिशाचहृदयी टवाळी — आणि तीही कांहीं उच्च हेतू साधण्यासाठीं किंवा

स्वभावपरिपोषासाठीं नव्हे, तर निवळ हंशा उत्पन्न करण्यासाठीं म्हणून करणाराच्या नसांत महाराष्ट्रीय रक्तच खेळत होतें काय, असा प्रश्न त्वेषानें मनांत आल्याखेरीज, या भाषणांचें वाचन संपतच नाहीं. टवाळी करून जिवाजीचा सर्वांविषयींचा आदरशून्य भावच जर गडकऱ्यांना दाखवावयाचा होता — त्यामुळें नाट्यवस्तूस कोणता परिपोष लाभतो हें जाणणें दुर्घटच आहे — तर टवाळीकरितां यापेक्षां दुसरे विषय खास सांपडले असते; पण हंशा पिकविण्याच्या भरांत हाडाचा महाराष्ट्रीय असा हा नाटककार इतका वाहवला; मग त्याचे अंध आणि सामर्थ्यहीन भक्त व पंथीय किती बहकावे! या प्रकारांना आळा बसण्याकरितां तरी गडकऱ्यांच्या विनोदाचें सत्य स्वरूप निर्दयपणें उघडें करण्याची आतां वेळ आली आहे.

## प्रकरण सातवें

### एकच प्याला

एकच प्याला हें एक अपूर्व नाटक आहे. त्यांतील ती गांभीर्य आणि क्षुद्रपणा यांची सरमिसळ पाहिली म्हणजे अगदीं चमत्कारिक वाटल्यावांचून रहात नाहीं. तथापि हें नाटक संपूर्णत: खेदपर्यवसायी आहे याची साक्ष त्याच्या अगदीं पहिल्या अंकाच्या पहिल्या प्रवेशापासून पटते. आणि हें खेदाचें वातावरण पुढें सारखें वाढतच जातें.

या नाटकाचें रहस्य काय, हा जरी प्रस्तुत विषय नसला तरी त्याविषयीं कांहीं तरी एक निश्चित कल्पना ठरविल्याखेरीज त्या मधील विनोदाचें परीक्षण करणें गैरवाजवी होईल. दारू, ही ह्या नाटकांत इतक्या प्रमुखपणानें वावरत आहे कीं, हें दारूचें नाटक आहे असा सर्वसाधारण अबाधित ग्रह होऊन बसला आहे. खुद्द गडकरी यांच्या मनाचाही, या बाबतींत

पक्का निश्चय झालेला, बाह्यतः तरी दिसत नाहीं. आपण दारूवर लिहीत आहों ही जाणीव त्यांनाही ठाम आहे. पण त्यांतही, कोणत्याही प्रलोभनाचा पहिला प्रसंग टाळणें हेंच जरूर आहे, हें तत्त्व प्रतिपादण्याचा आपला उद्देश आहे, अशीही त्यांनीं आपली समजूत करून घेतली आहे. आणि यामुळेंच, शरद् आणि रामलाल यांचें प्रकरण, त्यानीं संविधानकांत आणलें आहे. पण त्यांच्या मनांत स्पष्ट कदाचित नसेल, असेंच कांहीं तरी शेवटीं त्यांच्या हातून झालें आहे. एकच प्याला नाटक, म्हणजे एका अभिजात, सद्गुणी, विद्यावंत आणि उदारहृदय अशा माणसाच्या करुणास्पद अध:पाताचें चित्र होय; आणि हा अध:पातही, केवळ त्याच्या मनाच्या हळुवारपणामुळें झालेला आहे. भिन्न परिस्थितींत मनाचा जो कोमलपणा त्याला वैभवाच्या शिखरावर नेऊन पोंचविता, तोच कोमलपणा, अगदीं ऐनप्रसंगीं पापाचा साथीदार – Evil genius – मिळाल्यानें, त्याला रसातळाला पोंचवीत आहे. हेंच एकच प्याल्याचें रहस्य. दारू हें केवळ एक बाह्य चिन्ह आहे. त्या ऐवजीं दुसरें कसलेंही व्यसन असतें तरी परिणाम हाच झाला असता.

आणि या दृष्टीनें एकच प्याला एक उत्तम ट्रॅजेडी आहे. याचमुळें सुधाकराविषयीं अगदीं शेवटल्या क्षणापर्यंत एकही

वेळ तिरस्कार मनांत न येतां आपलेपणाच वाटत रहातो; आणि, त्याच्या स्वभावदोषामुळें झालेला परिणाम, हा स्वाभाविक आहे अशी खात्री असूनही, हें असें झालें नसतें तर बरें झालें असतें, असें मनांत आल्यावांचून रहात नाहीं.

परंतु गडकऱ्यांना, आपण काय करतों याची स्पष्ट जाणीव नव्हती म्हणून म्हणा, किंवा विनोदप्रसंगाचा अतिरेक, त्यांत बाष्कळपणा येईपर्यंत करावयाचा, या त्यांच्या वृत्तीमुळें म्हणा, एकच प्याल्याच्या गंभीर व करुण परिणतीला एकसारखे धक्के बसतील असे प्रसंग, नाटकाच्या अगदीं शेवटपर्यंत घालण्याचा मोह त्यांना आवरला नाहीं; एवढेंच नव्हे, तर (Evil genius) पापप्रवर्तक या नात्यानें तळिरामाची स्वभावरचनाही, जितकी सखोल व्हावयास पाहिजे होती तितकी करतां आली नाहीं.

परंतु स्वभावरचनेचा विषय निराळा आहे. व तो येथें चर्चावयाचा नाहीं. येथें फक्त विनोदप्रसंगाचे जे प्रवेश एकच प्याल्यांत घातलेले आहेत त्यांचा विचार करावयाचा.

अंक १ प्रवेश २ मध्यें तळिराम व भगीरथ यांचा संवाद आहे. तळिरामाचा जो स्वभाव गडकऱ्यांनीं दाखविण्याचा प्रयत्न केला आहे, त्या दृष्टीनें, यांतील हंसू आणणारीं भाषणें पुष्कळच औचित्यपूर्ण आहेत. त्यांत कल्पनेची कसरतही ठीक आहे. पण कल्पनेच्या कसरतींत

अतिरेक झाला नाहीं तर मग गडकरी कसले ? त्याबरोबरच अश्लील आणि नीरस कोटया, हें सर्वही त्यांत आलेंच पाहिजे. पहिलीं एकदोन भाषणें होण्याबरोबरच, तळिरामाची गाडी या रुळलेल्या मार्गावर आल्याखेरीज राहिली नाहीं, हें पुढें कोटयांचीं उदाहरणें येतील तेव्हां स्पष्ट दिसेल. पण यामुळेंच प्रस्तुत प्रवेशांतील परिणामकारकपणा गडकऱ्यांनीं घालविला आहे.

अंक १ प्रवेश ४ मध्यें दारूबाजांची मजलस आहे. दारू हा प्रमुख विषय नव्हे अशी कल्पना नसल्यामुळें, दारूबाजांची ही वटवट गडकऱ्यांनीं हवी तेवढी लांबविली आहे. आणि ज्यांना दारूबाजांच्या वाष्कळ कोटयांनीं, त्याच त्याच शब्दांच्या पुनरुच्चारांनीं आणि अमानुष हावभावांनीं हर्षोल्हसित व्हावयाचें असेल, त्यांनीं याला विनोद म्हटल्यास खुशाल म्हणावें. पण गडकऱ्यांनीं केलेल्या अतिरेकानेंच, शेवटीं त्या मधील हास्य तर राहोच पण बीभत्सपणाही नाहींसा होऊन एकदम या व्यसनाधीनतेविषयीं गंभीर विचारच मनांत येऊं लागतात. संविधानकाच्या परिणतीला या सर्व अतिरिक्त बाष्कळपणाची बिलकूल आवश्यकता नाहीं. हा प्रवेश आणि अंक १ प्रवेश ३ हे दोन्ही एकांत आटोपशीरपणें आणतां आले असते. पण एक प्रवेश गंभीर आणि एक हास्याचा अशी रचना करण्याच्या पद्धतीनें कदाचित तसें करूं

दिलें नसेल. अशा रीतीनें या प्रवेशांत सहृदय विनोद नसून, उलट, आहे तो बीभत्सपणा, औचित्यभंग करणारा मात्र आहे. पहिल्या अंकांतील तिसऱ्या प्रवेशाच्या शेवटीं तळिरामाची बायको गीता आली म्हणजे मात्र थोडा रसिकपणा प्राप्त होतो. त्यांच्या भाषणांतही ओढून ताणून आणलेल्या कोटया असल्या, तरी एकंदरींत दारूबाज नवरा आणि त्याची बेदरकार बनलेली बायको, यांच्या मधला हा सामना क्षणभर हर्षभावना उत्पन्न करणारा आहे खास.

अंक १ प्रवेश ४ आणि अंक २ प्रवेश ३ हे पुन्हां एकाच प्रकाराचें लांबविलेले तुकडे आहेत. दुसऱ्या अंकांतील तिसऱ्या प्रवेशाचा उद्देश भगीरथाला सावध करण्याचा आहे, व त्या दृष्टीनें हा प्रवेश आणि त्यांतील बाष्कळ बडबड यांची जरूरी आहे. पण दोन्ही प्रवेश एकत्र करून आटपशीरपणा आणला असता तर जास्त परिणामकारकपणा आला असता. अर्थात दारूबाजाच्या निशेचें उजाड चित्र म्हणजे कांहीं सहृदय विनोद नव्हे, हें मात्र विसरून चालणार नाहीं.

येथपर्यंतच्या या प्रवेशांनीं संविधानकाच्या परिणतीला मदत न झाली तरी निदान अडथळा होत नाहीं. पण अंक ४ प्रवेश ३ मध्यें, आपल्या दारूबाज स्नेह्यांना नोकरीकरितां भेटून निराश झाल्यावर, हळू मनाचा सुधाकर ज्या *ठिकाणीं*,

'आतां यापुढें एक दारू—प्राण जाईपर्यंत दारू—शेवटपर्यंत दारू' [ पृ. ७८ ] असा निश्चय करतो त्या ठिकाणीं संविधानकाच्या चढत्या गतीची परिसीमा होते. आतां पुढें शेवट कोणता होणार हें प्रेक्षकाला दृष्टीसमोर दिसूं लागतें. कदाचित सुधाकर सुधारेल, या विफळ आशेवर आतांपर्यंत उत्सुकतेनें डांबलेली त्याची मनोवृत्ति आतां स्थिर होते; व एकदां झटकन शेवट होऊन सृष्टीच्या न्याय्य तराजूचें माप सुधाकराच्या पदरांत पडावें व या खेदपर प्रकारावर शेवटचा पडदा लवकर पडावा अशा मनःस्थितींत तो असतो.

आतां यानंतर, पुन्हां पुन्हां ते पहिले दारूबाजांचे बाष्कळ व नीरस प्रवेश आणून, प्रेक्षकाच्या मनांतील लयांत विसंवादी सूर उत्पन्न करणें व नाटकाच्या गांभीर्याचा भंग करणें ही खरोखर चीड आणणारी ( Revolting ) गोष्ट आहे. बरें प्रवेश तरी कोठचा ? तर वैद्य आणि डॉक्टर यांचा पोरकट संवाद. याचा मुख्य संविधानकाशीं कांहीं एक संबंध नाहीं; कल्पना ताणूनही हा प्रकार शक्य कोटींतील वाटत नाहीं; रोग्याच्या डोक्याशीं, ही नुसती कटकट मात्र भासते. आणि विनोदांत प्रतिभेचें किंवा गांभीर्याचें नांव तरी ? निवळ शाब्दिक श्लेष, लहान मुलें खेळतांना ज्या प्रकारच्या कोट्या करतील तसल्या कोट्या, 'पथ्यपाणी केलें तर रोगी बरा होईल' या सारखे सिद्धांत, या सर्व भारुडाची पोतडी म्हणजे

हा प्रवेश. त्यापेक्षां सर्वांना दारूच्या निशेंत लोळत ठेवून पडदा उघडला असता तर पुढच्याच सुधाकराच्या प्रवेशाला किती बहार चढली असती !

सुधाकरानें या प्रवेशांत शेवटीं, आपली मघां केलेली दारू-पिण्याची प्रतिज्ञा पार पाडली. आणि रामलाल सुद्धां त्याच्या वाक्प्रवाहापुढें हतबुद्ध होऊन गेला. गडकऱ्यांच्या दृष्टीनें नाटकाचें रहस्यही त्यांनीं या ठिकाणीं सांगून टाकलें. दारूनें होणाऱ्या मानवतेच्या हानीचीही ओळख येथें वाचकांना पुरी पटली. तथापि अंक ५ प्रवेश २ मध्यें तळिरामाच्या घरीं पुन्हां मजलस आहेच ! तिजमध्यें तर हवी त्याची घोर हेटाळणी चालू असून, संविधानकाच्या स्वाभाविक द्रुत गतीला संपूर्ण अटकाव या ठिकाणीं झाला आहे.

अशा तऱ्हेनें प्रसंगगत विनोद, पाहिला तर एकच प्याल्यांत अगदीं थोडा आहे. आणि तोही विसंगत आहे. बाकीचा सर्व बाष्कळपणा असून, गांभीर्याचा दुष्ट भंग करणारा म्हणून, तो अंतःकरणाला बोंचणारा आहे. जे जे प्रवेश हंसू आणतांना दिसतात, त्यांत गीता आणि तळिराम यांच्या एका प्रसंगाखेरीज विनोदात्मक असा प्रसंग मुळींच नाहीं; तर त्या निवळ दारूबाजांच्या मजलशी आहेत. व त्यांत स्वाभाविकच बीभत्स हास्यविनोद चाललेला आहे. गडकऱ्यांच्या हेतूला पोषक असें सुद्धां त्यांमध्यें फार थोडें आहे. आहे त्याचीही

फार लांबण लागलेली आहे. आणि गडकऱ्यांच्या हातून, कळत म्हणा नकळत म्हणा, मनुष्य स्वभावाचा जो एक रहस्यमय पडदा उकलला गेला, त्याला पोषक असें तर या प्रवेशांतून कांहींच नाहीं. शिवाय अशा या प्रवेशांतून कोटया कशा प्रकारच्या आहेत त्याचा मासला पहा.

**अंक १ प्रवेश १**

> **सिंधू**—हें काय भलतंच ? आपलं नांवानंच हाक मारीत सुटायचं ?
>
> **सुधाकर**—तर काय तुझं नांव टाकूं ? मग तूंच उलटी माझ्या नांवानं हांका मारीत सुटशील ! [ पृ.२]

पुन्हां नांव शब्दावर कोटी ! भिंतीवर लिहून ठेवलेल्या यमकांच्या प्रकारांतलाच प्रकार हा. पुढें अंक १ प्रवेश २ मध्यें तळिराम म्हणतो,

> पण उघडयाबागडया गरिबांनीं एकच दागिना घातला म्हणजे तो काळया कुळकुळीत अंगावरील पांढऱ्या कोडासारखा किळसवाणा दिसतो; हें लक्ष्मीचं असलं कोडकौतुक करण्यांत काय अर्थ आहे ? [पृ. १७]

कोटीकरितां कोण किळसवाणी कल्पना ही ? पुढच्याच प्रवेशांत सुधाकर म्हणतो,

> कारण हक्काची रजा तुंबता तुंबता जितक्या दिवसांची तितक्याच महिन्यांची— [पृ. २०]

पण कदाचित एवढयावर वाचकांना नाटककाराच्या मनांतील फाजील अर्थ ग्रहण करतां येणार नाहीं या

भीतीनेंच कीं काय, सिंधूच्या तोंडीं पुढील वाक्य घातलें आहे. 'दादा येवो बाबा येवोत, मूळस्वभाव जाईना.' आतां, या मल्लिनाथीची काय बरें आवश्यकता होती ? वाचकांच्या कल्पनेवर जास्त कमी सोंपविण्याइतका संयम दाखविला असता तर ! पुढें अंक १ प्रवेश ४ मध्यें ही कोटी आहे.

**तळिराम**--आज एक इतकी वाईट गोष्ट झाली, कीं कांहीं विचारूं नका.

**खुदाबक्ष**--मग विचारल्यावांचून सांग ! [पृ. २१]

या पुढचा अंक २ प्रवेश ३ म्हणजे या वरच्या सारख्या प्रकाराचा अतिरेक आहे. अंक ४ प्रवेश ४ मध्यें पुढील कोटया सांपडतात.

**जनुभाऊः**—अबब ! काय या मात्रा ! एखाद्या नवशिक्या कवीच्या पदांतूनसुद्धां इतका मात्रांचा सुकाळ नसेल ! [पृ. ८१]

\+ + +

**वैद्य**—प्राणापेक्षांही अमूल्य आहेत हीं औषधं.

**जनुभाऊ**—तरीच, रोग्याचा प्राण घेऊन, शिवाय पैसेही घेतां औषधांबद्दल ! [पृ. ८१]

\+ + +

**वैद्य**—वैद्य हाच रोग्याचा खरा जिवलग मित्र असतो.

**तळिराम**—रास्त आहे ! एरवीं रोग्याच्या जिवाशीं इतकी लगट कोण करणार ? [पृ. ८१]

\+ + +

या नाटकांतील अश्लीलपणाचा भार खुद्द सुधाकरानें सुद्धां उचललेला आहे. सिंधूच्या सद्गदित होण्याबद्दल जें गोड आणि नाजुक भाषण त्याच्या तोंडीं आहे, त्याच्याच शेवटीं पुढील वाक्य आहे,

> स्त्रीपुरुषांच्या संबंधांत ऋतुमान नियमानं सारखंच टिकून राहील असं नाहीं ! [पृ. ५]

आणि स्पष्टीकरणार्थ, ध्या सिंधूच तयार आहे म्हणावयाला कीं,

> आमच्या इथं थट्टेला काळ वेळ नाहीं. आणि सुमारही नाहीं. [पृ. ५]

गडकऱ्यांच्या विनोदालाच सिंधूचा हा शेरा किती तंतोतंत लागू पडेल ! अशीं आणखी पुष्कळ उदाहरणें सांपडतील. पण आपण करतों हें ठीक नाहीं, असें स्वतः गडकऱ्यांनाही वाटतें, हें दाखविणारें एकच उदाहरण देऊं म्हणजे झालें. अंक १ प्रवेश २ मध्यें तळिराम आणि भगीरथ यांचा संवाद शेवटीं कोणत्या थराला जातो पहा.

> **तळिराम**— शेवटीं असं वाटायला लागतं कीं, संसारमार्गावरच्या प्रवाशानं लग्नाची बोजड बेडी पायांत अडकवून घेण्यापेक्षां एखाद्या सार्वजनिक मार्गाला लागावं हें बरं. ... असल्या बाहेरख्याली संबंधांत पोरावाळांच्या खिल्लाराशीं नुसता नांवापुरतासुद्धां संबंध ठेवायचं कारण नाहीं. शिवाय बेइमानी दिसलीच तर बाहेरच्या रस्त्याकडे

चोट करायला मोकळाच!...बदचाल दिसली तरी तिची हकालपट्टी करतांना पोटगी खर्चाचा तिला आहेर करण्याचं कारण नसतं.

**भगीरथ**--जाऊं द्या! चार घटका मजेनं जाण्यासाठीं जमायचं, तिथं ही असली किळसवाणी कटकट कशाला हवी? [पृ. १४]

मला तर वाटतें कीं, गडकऱ्यांची सात्त्विक बुद्धि जागृत होऊन, भगीरथाच्या रूपानें, त्यांच्यावरच हा किळसवाण्या कटकटीचा शिक्का मारीत आहे.

अमानुष विनोदापैकीं एक अंग, म्हणजे विकृत रूपाची हेटाळणी हें या नाटकांत बहुतेक नाहीं. पण त्याच्या ऐवजीं दारूबाजांचे घाणेरडे अड्डे रंगभूमीवर आणून गडकऱ्यांनीं आपली हौस भागवून घेतली आहे. परंतु दुसरें अंग जें सर्व गोष्टींची टवाळी, तें मात्र या नाटकांत भरपूर आहे. राष्ट्रासाठीं तळमळणाऱ्या व हाल सोसणाऱ्या देशभक्तांची, त्यांच्या प्रयत्नांची, सभांची, सारांश सगळ्या सार्वजनिक चळवळींची हेटाळणी ( याशिवाय स्त्रीपातिव्रत्य वगैरे नेहमींच्या टवाळीच्या गोष्टी आहेतच ) गडकऱ्यांनीं इतकी बेसुमार व अनिर्बंधपणें केली आहे कीं, कोणालाही खेद वाटल्यावांचून रहाणार नाहीं. हा अंक ५ प्रवेश २ वाचला, त्यांची इतर नाटकांतील टवाळी ध्यानांत आणली, व त्यांचे भक्त आढ्यतेनें त्यांच्या टवाळीच्या कोटयांची आणखी आणखी उदाहरणें

देतात तीं पाहिलीं, म्हणजे असें वाटूं लागतें कीं, या गृहस्थाला जगतांत कांहीं पवित्र किंवा पूज्य वाटत होतें कीं नाहीं ! कदाचित कांहीं चळवळी चुकल्या असतील, आणि सभा, ठराव वगैरे गोष्टी कांहींजणांच्या दृष्टीनें निरुपयोगीही असतील; तशी त्यांवर निर्विकार व अविकृत टीका केली तर ती आदरानेंच वाचली जाईल. पण गडकऱ्यांनीं केलेली टवाळी इतकी निर्घृण आहे कीं, तिला नांव काय द्यावें हेंच कळत नाहीं. येथें जलाल, जहाल, मवाळ, सुधारक, दुर्धारक, कोणी सुटत नाहीं. प्रत्येकाला विकृत स्वरूपांत दाखवून हास्यास्पद करण्याचा प्रयत्न मोठ्या हौशीहौशीनें केलेला आहे. आणि हा सर्व प्रकार गडकऱ्यांनीं दारुड्यांकरवीं करविला आहे. कित्येकांना हीच गोष्ट, हा बीभत्स विनोद समर्थनीय ठरविण्यास पुरेशी वाटते. पण वास्तविक तसें नाहीं. एखाद्या सुसंस्कृत समाजांत, या सार्वजनिक चळवळींसंबंधीं विनोदपर टीका झाली असती, तर त्यामुळें त्या चळवळींबद्दल उपहास व अवहेलना उत्पन्न होण्याऐवजीं विचारच जास्त जागृत झाला असता; पण दारुड्यांच्या तोंडीं ही टवाळी आल्यानें, सर्व चळवळी व त्यांचे महान आधारस्तंभ, अत्यंत हीन व क्षोभकारक अवहेलनेला पात्र होतात. हिंदी प्रगतीची चळवळ तरी गडकऱ्यांनीं आपल्या अमानुष विनोदांतून वगळावयाची

होती ! पण जेथें द्रौपदीचें पावित्र्य थट्टेस पात्र, तेथें ही अपेक्षा तरी कशी करावी ?

या नाटकांतील विनोद इतक्या तऱ्हांनीं दोषसंकुल असतांही त्यांत कांहीं स्थळें अशीं आहेत कीं, त्या ठिकाणीं, विशुद्ध विनोद निर्माण करण्याची गडकऱ्यांची शक्ति ( जी पुढें भावबंधनांत प्रकर्षाला पावली ) अनुभवास येऊन अत्यंत हर्ष होतो. पहिल्या प्रवेशांतील थोडाफार अश्लीलतेचा भाग सोडला म्हणजे त्या ठिकाणीं किती रमणीय विनोद आहे ! भाई विलायतेस जाणार म्हणून सिंधूचें अंतःकरण भरून आलेलें; स्वतः सुधाकराची तीच स्थिति; पण त्यांतल्या त्यांतच सिंधूच्या मनःस्थितीची नाजूक थट्टा करण्याचा त्याचा प्रयत्न व त्या वेळच्या त्याच्या कित्येक सुरस कल्पना; हा सर्वच देखावा किती विनोदपूर्ण आहे ! ' भाई, हिचं समाधान करतां करतां मला पुरेसं झालं आहे; मला वाटतं यापुढं मला वकिलीची सनद सोडून देऊन हा एवढाच उद्योग करीत बसावं लागणार ! ' ( पृ. ४ ) हें त्याचें भाषण; किंवा, ' भाई, तूं अगदीं पढतमूर्ख आहेस ' ( पृ. ४ ) या परिच्छेदांतील सिंधूच्या गंगायमुनांचें काव्यमय वर्णन; तशीच पुढच्याच भाषणांतील अश्रूंच्या संगमाची कल्पना; इत्यादि गोष्टींनीं हा प्रसंग अत्यंत मनोहर झाला आहे. भाबड्या सिंधूविषयीं सहृदय माणसाच्या अंतःकरणांत

जिव्हाळ्याचें हंसू उकळ्या उकळ्यांनीं आणण्याचें या प्रसंगांत केवढें सामर्थ्य आहे !

पुढें अंक २ प्रवेश ३ मध्यें, आपण माहेरीं गेलों असतां इकडे सुधाकराचें कसें होईल याची स्त्रीस्वभावसहज अशी काळजी लागून, सिंधू जेव्हां म्हणते, ' इथं एकटं राह्यचं; ' त्यावेळीं ' मग एखाद्या बोर्डिंगांत ठेवतेस का मला ?' [ पृ० २० ] हा अगदीं साध्या शब्दांत केलेला सुधाकराचा प्रश्न, त्यांत कोटी वगैरे कांहीं नसतांना, किती सात्त्विक आणि जोराचें हास्य उद्भूत करतो ! तसेंच अंक ३ प्रवेश १ मध्यें सिंधू आपल्या मुलास जेवूं घालीत आहे आणि गाणें म्हणत आहे, त्यावेळीं जेवण संपल्यावर ती म्हणते,

> हं, चला, झालं वरं आतां ! झाली पुन्हा दांडगाईला
> सुरवात ? वन्सं, सांभाळा बाई तुमचं रत्न हें !
> तुमचीं माणसंच भारी अचपळ. [पृ. ४०]

या वाक्यांत कोठें कोटी नाहीं, कांहीं नाहीं. पण त्यांतील त्या, तुमचीं या शब्दानें सूचित होणारा अर्थ इतका रमणीय आहे कीं, हें गडकऱ्यांच्या विशुद्ध आणि सात्त्विक विनोदाचें, भावनानिष्ठ विनोदाचें, उत्कृष्ट उदाहरण म्हणून दाखवितां येईल. इतक्या या उदात्त शक्तीला मागें लोटून, धांगडधिंगा, पचकळपणा आणि अश्लीलता यांचा आश्रय करून, गडकऱ्यांनीं काय मिळविलें ?

# प्रकरण आठवें

## भावबंधन

भावबंधन हें फार विचित्र नाटक आहे. टीकाकाराला तें अगदीं बुझावून सोडणारें आहे. गडकऱ्यांची प्रतिभा आणि बुद्धि यांचा अत्यंत आनंदमय असा विलास या नाटकांत पहावयास सांपडतो. पांच सात रसांचें यथेच्छ संमिश्रण या ठिकाणीं प्रेक्षकवाचकांना रिझवितें. आणि असें असूनही रचनेच्या दृष्टीनें हें नाटक इतकें सैल आहे कीं, त्याचा मध्यबिंदू अमूक म्हणून शोधून काढून, त्याच्या भोंवतीं त्यांतील सर्व प्रसंग फिरतात असें दाखविणें दुर्घट किंबहुना अशक्यच आहे. ज्याला इंग्रजींत Extravaganza म्हणून म्हणतां येईल तसा प्रकार या नाटकाचा आहे. आणि एकसूत्रीपणा नसल्यानें वेगवेगळे प्रसंग मनावर काय स्वतंत्र परिणाम करतील तेवढाच खरा. सबंध संविधानक असें डोळ्यापुढें आणणें

कठीण आहे.

याचमुळें, निरनिराळ्या प्रसंगांचे परस्परसंबंध दाखविणें व उचितानुचिताचा विचार नाट्यरचनादृष्टीनें करणें हें या नाटकांतही अशक्य आहे. परंतु मृदुलालित्यपूर्ण अशा या नाटकाला सुद्धां गंभीर वळण देण्याचा मोह, ग्रंथकाराला आपल्या स्वभावानुरूप आवरला नाहीं; आणि यामुळें, इंदुबिंदूंचें पुढचे पुढचे बाष्कळ प्रवेश, फाजील लांब व कांहीं प्रसंगीं अस्थानीं झाले; एवढेंच फार तर संविधानकाच्या दृष्टीनें या स्थळीं सामान्य विधान करतां येईल. तथापि एकंदर नाटकाचा रोख, हास्यविनोद हाच दिसत असल्यानें युक्तायुक्ताचा विचार तितक्या दृढतेनें करणें शक्य व आवश्यक नाहीं. अर्थात, प्रत्यक्ष संविधानकाच्या परिणतीच्या दृष्टीनें परीक्षण करणें अशक्य असलें तरी त्या त्या ठिकाणचा विनोद, जात्या कोणत्या दर्जाचा आहे हें परीक्षून पहाण्यास कोणतीच हरकत नाहीं.

योग्यायोग्याचा विचार सोडून प्रत्यक्ष विनोदाकडेच दृष्टि टाकली तर, पहिली ही गोष्ट ध्यानांत येते कीं, या नाटकांत कांहीं विनोदप्रसंग – ज्यांना फ्रेंच टीकाकार Mote de situation म्हणतात — फार कौशल्यानें साधले आहेत. अगदीं पहिल्याच प्रवेशांत, बिचारा घनःश्याम मालतीसंबंधीं बोलणें करण्यास आला आहे. पण त्याला आपल्या विषयास सुरुवात करण्याइतकीही फुरसत धुंडिराज देत नाहीं.

धुंडिराजाचा तो बोलण्याचा पट्टा आणि त्यामुळें घनश्यामाची वाढती उत्सुकता आणि तळमळ, हा प्रसंग खरोखरच बहारीचा विनोदपर आहे. यांत धुंडिराजाच्या स्वभावविशेषानें भर पडते ही गोष्ट खरी. पण ही स्वभावचर्चा बाजूला ठेवून विचार केला तरी, येथील प्रसंगगत विनोद कांहीं कमी ठरत नाहीं.

या नंतरचा प्रवेश म्हणजे, आपल्या तरुण मंडळांत येऊन घनश्याम मालतीला गंभीरपणें मागणी घालतो हा होय. घनश्यामाचा दर्जा, त्याजविषयीं या सर्व मंडळींचें मत, त्यांच्या परस्पर संस्कृतींतील भेद, या गोष्टी ध्यानांत घेतां, घनश्यामानें मालतीला मागणी घालण्याचें धाडस करावें, आणि तेंही प्रभाकर, लतिका, यांसारखीं फटाकडीं माणसें समोर दिसत असतांना, ही गोष्ट इतकी हास्यास्पद आहे कीं, त्या प्रसंगींच्या कोटया आणि घनश्यामाची ग्राम्य हेटाळणी हे प्रकार सोडून दिले तर, हा प्रसंग हर्षानंद दिल्यावांचून रहाणार नाहीं.

या शिवाय नमूद करण्यासारखे दोन प्रवेश, म्हणजे अंक १ प्रवेश ५ — ज्यामध्यें धनेश्वर आवेशानें सर्व मराठी पुस्तकांना बंदी करतो — आणि अंक २ प्रवेश १. या प्रवेशांतील धनेश्वर आणि लतिका व मालती यांच्यांत, परस्परांच्या स्थितीची कल्पना परस्परांना नाहीं; आणि वाचकांनाच मात्र ती आहे. अशा प्रसंगीं त्यांचीं जीं भाषणें चाललीं आहेत तीं सर्व निर्दोष

हास्यप्रतिपत्तिकारक आहेत.

या खेरीज क्वचित, उत्कृष्ट भावनानिष्ठ विनोद, सहज जातां जातां स्फुरित करणारीं स्थळेंहीं या नाटकांत कांहीं ठिकाणीं विखुरलेलीं आहेत. उदाहरणार्थ, लतिका आणि प्रभाकर यांचा कृतककलह चालू असतां लतिका रडकुंडीस येते, त्यावेळीं,

**मालती**—प्रभा, गोड शब्दांनीं बोललें तर काय होईल बरें ?

**प्रभाकर**—सहान् चार दहा पावसाळे तुझ्यापेक्षां जास्त पाहिलेले आहेत.

**मालती**—आणखी हा अकरावा पाहिलास आत्तां !

[ अंक १ प्रवेश २, पृ. २६ ]

लतिकेच्या अश्रूंना पावसाळ्याचें असंबद्ध स्वरूप देऊन किती बहारीचा विनोद या ठिकाणीं साधला आहे ? पुढें अंक ३ प्रवेश ३ मध्यें प्रभाकर, कानडयाचें सोंग घेऊन धनेश्वराकडे रहात असतां, एकदम ' हा प्रभाकर तुझ्यापुढें हजर आहे ' असें म्हणून जेव्हां प्रगट होतो, त्यावेळची लतिकेची गोंधळलेली मनःस्थिति किती हृदयंगम आहे. आपल्या प्रेमाचा परिस्फोट न व्हावा असा हेतू असतांना, तो अकल्पित रीत्या झाला, तेव्हां काय करावें हेंच तिला सुचत नाहीं. आणि ती भांबावून म्हणते,

माझी परीक्षा पाहण्याकरितां हें सोंग घेतलेंत ? मला हिणवायचा बेत होता नाहीं का तुमचा ? काहो,

> माझी परीक्षा पाहाण्याचा तुम्हांला कोणी अधिकार दिला हो ? अशीं सोंगें घेऊन दुसऱ्याच्या घरांत शिरतां काय ? दम खा, आत्तां सरकारी शिपाई बोलावून आणवितें आणि खोड मोडतें तुमची चांगली ! मालतीताई ! बाई, तें दार तरी लावून घे तेवढें ! हें सोंग कोणीं बघितलें तर तिकडूनही पंचाईत व्हायची.
>
> [पृ. १२०]

शिपाई बोलाविण्यापासून एकदम दार लावण्यापर्यंत कोण ही घसरगुंडी ! खरोखर, लतिकेच्या शब्दांत विनोदात्मक असें काय आहे ? पण तिची गोंधळलेली मनोवृत्तीच इतकी विनोदपूर्ण आहे कीं, या स्थितींत, जें काय ती बोलेल तें हास्योत्पादकच होणार.

पण, हे हाताच्या बोटावर मोजण्याइतके चार प्रसंग, आणि धुंडिराजाचा स्वभावपरिपोष, यांमधील रमणीय विनोद सोडला, म्हणजे मग बाकी खालीं, ग्राम्य, शाब्दिक व अश्लील कोटया आणि अमानुष विनोद याच गोष्टी, व त्याही अत्यंत विपुल प्रमाणांत रहातात. बाष्कळ, श्लेषात्मक व अश्लील अशा सर्वच कोटयांची यादी देत बसलों, तर तो एक ग्रंथ होईल; म्हणून कांहीं उदाहरणांवरच काम भागविलें पाहिजे.

निवळ श्लेषात्मक व नाटयप्रसंगाशीं अर्थाअर्थी कांहीं संबंध नसलेल्या पुढील कोटया पहा.

## अंक १ प्रवेश २

**मनोहर**—या युद्धाच्या समाप्तीसाठीं आम्हीं तटस्थांनीं काय करावें?

**लतिका**—एकमेकांकडे पहात तटस्थ बसलें म्हणजे झालें. [पृ. १७]

\+ + +

**प्रभाकर**—काव्यरसाची सीमा झाली हें दाखविण्यासाठीं विधात्यानें या तिळाचा गालावर हा सुंदर पूर्णविरामच देऊन ठेवला आहे.

**लतिका**—आज माझ्या वर्णनांत अगदीं तीळ उणा पडूं द्यायचा नाहीं असा तुमचा संकल्प दिसतो. [पृ. २०]

\+ + +

**प्रभाकर**—लतिके, हें तुझें प्रेमाचें बोलणें नव्हे.

**लतिका**—हें माझें बोलण्याचें प्रेम आहे. [पृ. २४]

\+ + +

**लतिका**—(रडत) प्रेमाचें सोंग आणलेंत तें हीं मुक्ताफळें उधळायला वाटतें?

**प्रभाकर**—हो; एरवीं हीं डोळ्यांतल्या आसवांचीं मुक्ताफळें कशीं दिसलीं असतीं? [पृ. २५]

\+ + +

**प्रभाकर**—लतिके, खरें सांगूं, तुझ्याजवळ बोलण्याची सोयच नाहीं मुळीं.

**लतिका**—तुमच्याजवळ सोयीचें बोलणेंच नाहीं मुळीं. [पृ. २६]

\+ + +

**लतिका**—जन्मनक्षत्राच्या उपज़त जोरावरच नक्षत्रासारख्या मुली मिळविण्याचे ते दिवस गेले. [पृ. ३२]

\+ + +

**लतिका**—म्हणजे? मी विचार केल्यावांचून बोलतें वाटतें? ऐक, मालतीताई.

**प्रभाकर**—ती काय ऐकणार? ती बोलल्यावांचून विचार करते. [पृ. ३६]

याच प्रवेशांत पुढें नेहमींची तोंड शब्दावरची कोटी आहे.

**अंक १ प्रवेश ३**

**धनेश्वर**—फारच मर्यादशील मुलगी तूं! वडिलांनीं निवडलेला नवरा—.

**लतिका**—तसा वयोवृद्ध असता म्हणजे वडिलांइतकाच पूज्य मानला असता. [पृ. ४२]

\+ + +

**प्रभाकर**—कांहीं हरकत नाहीं! भेटायची चोरी झाली तर चोरून भेट घेईन!... प्रेमावांचून परदेशी होण्यापेक्षां प्रेमासाठीं परदेशी झालेलें काय वाईट! [पृ. ४४–४५]

परंतु अशा निवळ नीरस कोट्यांपेक्षां उत्तानशृंगारिक व अश्लील कोट्यांचें प्रमाण या नाटकांत बेसुमार वाढलें आहे. अंक १ प्रवेश २ हा, गडकऱ्यांनीं कोणा फ्रेंच नाटककारापासून घेतला कीं काय असा संशय येतो.

सुशिक्षित आणि पुढारलेल्या अशा एखाद्या संस्कृतिसंपन्न हिंदु कुटुंबांत, हा प्रवेश आजच्या स्थितींतही अस्वाभाविकच वाटतो. त्यांतल्या त्यांत प्रभाकरानें लतिकेचें तीळ न् तीळ वर्णन करावें; त्यांत हव्या त्या अश्लील कोट्या, आणि त्याही एकांतात नव्हे, तर चार चौघांत कराव्या; त्या चार चौघांनींही या विषयीं नापसंती दाखवूं नये; उलट, एखादी चावट सूचना गूढ राहिली तर ती व्यक्त करण्यालाच मदत करावी; हा एकंदर प्रकार सदभिरुचिसंपन्न माणसाला केव्हांही असह्यच वाटेल. पहिल्या प्रवेशांतील तो निष्कपट सरळहृदयी धुंडिराज कोठें, आणि वेश्यागारांतही मनुष्याला कदाचित लाज आणील, असा पुढच्याच प्रवेशांतील सुशिक्षित तरुणतरुणींचा हा थिल्लरपणा कोठें? हा प्रकार पाहिला म्हणजे नेहमीं अतिरेकाचें शेवटचें टोंक गांठणाऱ्या गडकऱ्यांच्या प्रतिभेविषयीं अक्कल गुंग होऊन जाते. उदाहरणाकरितां पुढील दाखले पहा—

**प्रभाकर**—ताई, सौंदर्य हें परमेश्वरस्वरूप आहे. आणि परमेश्वर वाचाळाला मुका करतो, आणि मुक्याला वाचाळ करतो. हा मनोहर जरासा मुखस्तंभ आहे; नाहीं तर इतक्या दिवसांच्या परिचयानें मुक्याला वाचाळता कशी येते हा प्रीतिशास्त्रांतला पहिला धडा तुला तोंडपाठ झाला असता!

**लतिका**—हें काय हो? तुम्हीं काय बोलतां याचा विचार केलात कां? भारीच चंचल तुमची जीभ!

तुमच्या बोलण्याचा अर्थ भलताच होतो. [पृ. १७]

प्रीतिशास्त्रांतला हा पाणचट घडा, येथें आधीं नकोच होता. त्यांतही प्रभाकराच्या पहिल्याच वाक्यावर गडकरी थांबले असते, तर कांहीं गुलाबी रसिकांची सोय झाली असती. पण पुढच्याच वाक्यानें गूढार्थ स्पष्ट करण्याचा प्रयत्न गडकरी करतात, आणि तेवढयानें समाधान न होऊन लतिकेच्या टीपेची त्याला पुस्ती जोडतात. ही काय जाणून बुजून अश्लीलसूचकता नव्हे काय? आणि काय यासाठींच चांगल्या चांगल्या वाचकांनीं हंसावें? उपरणें तोंडावर घेऊन, किंवा पंख्याच्या आड तोंड लपवून कित्येक जण या ठिकाणीं हंसतही असतील हें खरें; पण म्हणजे ती कांहीं सदभिरुचि नाहीं. तथापि, इतक्यानेंही पूर्ण समाधान न होऊन मालतीसारख्या सच्छील मुलीच्या तोंडीं, गडकरी पुढील वाक्य घालतात.

**मालती**—लतिके, नुसती जीभ चंचल आहे कीं तोंडही चंचल आहे? [पृ. १७]

यानंतर पुढील संवाद पहा—

**प्रभाकर**—विरक्त दृष्टीनें पाहिल्यामुळें झालेल्या अनादरानें एका हृदयावरचा पदर जड निश्वासानें हालत आहे, तर नजरेला नजरेची ओळख पटल्यामुळें दुसऱ्या हृदयावरचा पदर उत्कंठेच्या दणदणाटामुळें हादरत आहे! एका मूर्तीला स्पर्श न केल्यामुळें मत्सरानें

कंप सुटत आहे तर दुसरीकडे स्पर्शाच्या कल्पनेमुळें—कीं लतिके, अस्पर्श्यवृत्तीच्या कल्पनेमुळें ?—

**मनोहर**—सरस्वतीच्या तरुण उपासका ! तुझ्या-देवीच्या मंदिरांत हा भ्रष्टाकार होत आहे.

**प्रभाकर**—मनोहरा भलत्या टीकेंत काय अर्थ आहे ? नुसत्या काकदृष्टीच्या स्पर्शमात्रानें सौंदर्याची मनोमयी मूर्ति दूषित झाली तर मला त्यांत आनंदच वाटेल.

एक सुशिक्षित तरुण, चार मंडळींत, स्त्रीसमाजामध्यें, आणि ज्या मुलीशीं त्याचें लग्न अद्याप ठरलेंही नाहीं अशा मुलीविषयीं बोलतो आहे हें येथें ध्यानांत ठेवलें पाहिजे. आणि त्यांतही त्याच्या मनांतील अर्थ स्पष्ट करावयाला मनोहराची टीप पाहिजेच ! जरा पुढें, प्रभाकर वर निर्देशिलेलें लतिकेचें तीळ न् तीळ वर्णन करूं लागतो. त्यांतील त्या कल्पनेच्या गोलांटया उडया, बारीक सारीक अवयवांचें सुद्धां भलभलत्या उपमांनिशीं वर्णन, वगैरे गोष्टी पाहिल्या म्हणजे, हें कोणा प्रत्यक्ष स्त्रीचें वर्णन नसून, भिंतीवर टांगलेल्या एखाद्या निर्जीव चित्राचें वर्णन आहेसें वाटूं लागतें. शिवाय या वर्णनांतील इतकी ही बारकाई प्रत्यक्ष स्वतःच्या पत्नीच्या वर्णनांत पतीला सुद्धां साधेल कीं नाहीं याचा संशयच आहे. या दृष्टीनें हें वर्णन म्हणजे विशुद्धपणाचा आणि सहृदयतेचा निव्वळ खून आहे. त्याचीं सुरवातीचींच चार वाक्यें पहा—

यौवनाच्या पहिल्या प्रहरांत प्रीतीच्या मंदिराभोंवतीं
गालाच्या गुलाबी ठाण्यावर लज्जेचा नाजूक पहारा असतो.
बदलत्या ऋतुमानाचे – **सोडून दिला हा विषय** –
बदलत्या वयोमानाचे– [पृ. १९].

आतां यांतील ' सोडून दिला हा विषय, ' ही टीप व तीही जाड ठशांत न घालतां, तसेंच वाक्य सुरू ठेवलें असतें तर त्यांतील दीर्घ सूचना साधारणतः ध्यानांतही आली नसती. पण ती ध्यानांत यावी हा तर अट्टाहास ! पुढें आणखी पहा.

**प्रभाकर:**—पण नवयौवनाची तरल लीका नाजूक विनोदावांचून वर्णन करितां येईल का ? [ **हा सर्व नाजूक विनोदच चालला आहे !** ] आणि आपल्या सुंदर विनोदाचा नवयुवतीच्या सलज्ज स्मिताकडून सत्कार करविण्यासाठीं रसिक तरुण कोणता अपराध करायला तयार होणार नाहीं ?

**लतिका**—सारखे इकडे पाहून असें वेडेंवांकडें बोलूं नका. [पृ. २१]

\+ \+ \+

**प्रभाकर**—सौंदर्यासाठीं तरुणाला स्त्रियांच्या तोंडाकडे पहावयाचा प्रसंग येतो. धांदलीच्या वेळीं नाइलाजानें धीट कोण होत नाहीं ? यावेळीं वृत्ति किती तदाकार होते म्हणून सांगूं ? [पृ. २१–२२]

\+ \+ \+

> **लतिका**—कुणी सांगितलें तुम्हांला माझें तुमच्यावर प्रेम आहे म्हणून ? माझें कांहीं तटलें नाहीं इतक्या गरिबीनें प्रेमाचा सवदा ठरवायला. [पृ. २४]

मागें कालिंदीच्या प्रेमाचा बाजार झाला, आतां लतिका सवदा करीत आहे. किती सदभिरुचिसंपन्न विनोद हा ! आणि या सर्वांची तरफदारी गडकरी पुढीलप्रमाणें करितात;

> **प्रभाकर**—आपल्या इष्टमित्रांनीं याच गोष्टींच्या आठवणी करून देऊन वृद्धापकाळीं संसार रंगवायचा असतो ? [पृ. २७]

किती सुंदर विषय पण इष्टमित्रांना !

या सर्व प्रकारांत एक गोष्ट आणखी ध्यानांत ठेवली पाहिजे कीं, हा संवाद अविवाहित तरुणतरुणींत चालला आहे; आणि प्रभाकराचें प्रेमशास्त्राचें ज्ञान तर अनुभवाच्या मुशींतून बाहेर पडल्यासारखें दिसतें. हें काय गौडबंगाल आहे तें उकलत नाहीं. कदाचित कोणा अनुभविकाजवळून त्यानें वात्स्यायनाचे सप्रयोग पाठ घेतले असतील !

पण हा बेछूट फाजीलपणा फक्त प्रभाकराचाच विशेष आहे असें नव्हे. पुढें अंक २ प्रवेश १ मध्यें, लतिका नवीन तऱ्हेचा भडक पोषाख करून येते, त्यावेळीं पुढील संवाद आहे.

> **धनेश्वर**—काय पोषाखाची तऱ्हा ही !
>
> **लतिका**—प्रे, मालती, लुक ॲट् मी ॲन्ड टेल् इफ्

आय् डु नॉट लुक् ए नाइस मेरी लिटल् गर्ल् ऑफ सेव्हन्टीन्. जस्ट कनफेस्, मालती, डोंट् यू वुइश यू वेअर ए—

**मालती**—यू वेअर ए व्हॉट? यू नॅस्टी लिटल् थिंग्, यू आर क्वाइट डेव्हिलिश! [पृ. ६५]

लतिकेच्या फाजीलपणाला मालतीची टीप हवीच! पण धनेश्वरही त्यांच्याच माळेंत. त्याच प्रवेशांत तो पुढें म्हणतो,

झालें, उद्यां लतिकेचें लग्न निघालें, म्हणजे देवकें बसवितांना शेजारीं पाटावर सुपारी का बसवूं अभद्रासारखी? तेवढ्यापुरती आसपास उसनवार करतां येते थोडीच? [पृ. ६७]

परंतु अमानुष विनोदाची तर गडकऱ्यांनीं या नाटकांत अगदीं सीमा केली आहे. हेटाळणी व विकृतरूपोपहास या विषयींची आपली हौस येथें त्यांनीं मोकाट सोडली असून तिचाच स्वैर धिंगाणा नाटकांत सर्वत्र आढळतो. निवळ उदाहरणांनींच या प्रसंगीं काम होईल.

### अंक १ प्रवेश २

**प्रभाकर**--इतिहास आणि भूगोल या दोन्हीं दृष्टींनीं भारत भूमीचा पानिपत हाच कपोलप्रदेश ठरतो. [आणि म्हणूनच त्यावर वेळोवेळीं हल्ले झाले असें पुढें प्रतिपादन केलें आहे] [पृ. १९-२०]

### अंक १ प्रवेश ४

**महेश्वर**—सांग, शर्विलकाप्रमाणें चोरी करूं का

दुष्यंताप्रमाणें मृगबालकांचा खाटीक बनूं ? [पृ. ४८-४९]

## अंक २ प्रवेश १

**प्रभाकर**—योगवासिष्ट — बृहद् योगवासिष्ठ ! बहोतही बडा ग्रंथ ! षष्टिलक्ष ग्रंथ. नीरस व्हेरि मच्. एक पंडित काशीघाट पारायण केलो, तर तीन तरुण लोक गंगेंत जीव दिले; दोन लोक जागेवर मेलो.. कंटाळला. [पृ. ६१]

\+ + +

**धनेश्वर**—अनुरूप वधूवरांना निष्ठेनें वागावयाला परस्परांचें गुणच पुरेसे होतात. परंतु विषम वयाच्या जोडप्यांत ही जबाबदारी एकट्या पत्नीवरच असते. तेव्हां ती निरक्षेप सद्गुणांची मूर्तीच असावयास पाहिजे. तात्त्विक दृष्टीनें पाहिलें तर विवाहांतल्या एकनिष्ठेच्या शपथांची विषम विवाहालाच फार जरूरी असते. लग्नविधींत या शपथांना इतकें महत्त्व दिलेलें पाहून माझी अशी समजूत होत चालली आहे, कीं या आपल्या पवित्र आर्यावर्तात पूर्वीं विषम वयाच्या बाला-वृद्ध विवाहाचाच काय तो एकटा प्रचार होता. [पृ. ६८]

\+ + +

**धनेश्वर**—तरुण द्वारकाधीशानें सोळाहजार एकशें आठ वडील माणसें घरांत आणलीं त्याचें गोळाबेरजेचें माप सांगण्यापलीकडे जगानें काय कौतुक केलें ? पण त्याच श्रीकृष्णानें राधेसारख्या एकाच वडील माणसाचा संसार थाटून दिला तर त्या अलौकिक चमत्काराचें अजून

कोडकौतुक चाललें आहे. तेंच वृद्धापकाळींच्या लग्नाचें भूषण. [ पृ. ६८–६९ ]

**अंक २ प्रवेश ३**

**महेश्वर**—हे स्वर्गस्थ देवांनों आणि स्वर्गाखेरीज दुसरीकडे खितपत पडलेल्या पितरांनों, तुमच्या साक्षीनें या इंदूला मी वचन देतों. [ पृ. ८८ ]

पानपता पासून तो पितरांपर्यंत, कोणीही या टवाळीच्या सत्रांतून सुटत नाहीं. तथापि कुरूपतादर्शन आणि कुरूपताउपहास यांची जी कांहीं हौस गडकऱ्यांनीं या नाटकांत भागवून घेतली आहे तिचा प्रकार तर अगदीं किळसवाणा आहे. भावबंधनांतील इंदुबिंदूंचे प्रवेश, आणि त्यांच्या विषयीं इतर पात्रांनीं काढलेलें उद्गार, एवढेंच निराळें काढून एकत्र छापलें, तर तें वाचणारांस, लेखकाला मनुष्यहृदय तरी होतें कीं नाहीं याचाच संशय पडेल. ईश्वरनिर्मित कुरूपतेची गडकऱ्यांनीं येथें इतकी राक्षसी टवाळी केली आहे कीं, तेवढयामुळें त्यांच्या इतर सगळ्या विनोदावर भयंकर काळोखी पसरली आहे. तिरस्कार किंवा व्याजोक्तियुक्त विनोद, अथवा अश्लील आणि ग्राम्य कोटया यांना फक्त साहित्यशास्त्रीय दृष्टीनें कमीपणा देतां येईल. पण अशा पाशवी.— अथवा पाशवी म्हणून त्या पशूंना तरी उगाच कां हेटाळावें — व हिडीस उपहासाला म्हणावें तरी काय ?

सुसंस्कृत मनाचा व नायकस्थानापन्न, असा प्रभाकरच या घाणेरड्या प्रकाराला सुरुवात करतो. अंक १ प्रवेश २ मध्यें तो म्हणतो,

> यांच्या लग्नानंतर वर्षाच्या आंत दोन तरुण संन्यासी जन्माला येतील, दोन आईबापांच्या जोड्या पुत्रांवांचून परदेशी होतील, आणि अन्नवस्त्राचे दोन खटले सरकारांत दाखल होतील. [पृ. २३]

प्रभाकराच्या या भाषणापासून या किळसवाण्या प्रकाराला सुरुवात होऊन तो सर्व नाटकभर अनिर्बंध चालू रहातो. बरें, हें सर्व जाणून बुजून चाललें आहे याला येथेंच अंक १ प्रवेश ३ मध्यें चांगला पुरावा आहे. या ठिकाणीं प्रभाकरानें असाच फाजीलपणा केला असतांना लतिका म्हणते, 'प्रे शट् अप् युवर नॉनसेन्स्. इटिज ब्रूटल.' (पृ. ४३) **ब्रूटल** विनोद म्हणजे काय हें गडकऱ्यांना कळतें; पण वळत नाहीं. त्याला कोण काय करणार ?

पुढें अंक २ प्रवेश ३ मध्यें महेश्वराच्या तोंडीं असेंच एक किळसट वर्णन इंदूचें घातलें आहे; आणि पांचव्या प्रवेशांत बिंदूच्या वर्णनानें पक्षपात टाळला आहे. आम्हां दोघींशीं लग्न करा म्हणून बिंदूनें म्हटल्यावर महेश्वराच्या तोंडीं, त्यांच्या काळ्या रंगासंबंधानें इतकें कळकट भाषण घातलें आहे कीं, तें उतरून घेणें हे सुद्धां शिसारी आणणारें आहे.

पण यावर कांहीं मंडळी अशी कोटी लढवितात कीं, अशा या कुरूप पोरी मागें लागल्यावर बिचाऱ्या महेश्वरानें तरी काय करावें ! पण मुळांत, माझ्याशीं लग्न कराहो, माझ्याशीं लग्न कराहो, अशी स्त्रीस्वभावविरुद्ध आणि कदाचित वन्य जातींतही आढळणार नाहीं अशा पद्धतीची ही मागणी, नाटककारानें या मुलींना जी निर्लज्जपणें करावयास लावली आहे, त्यांतच प्रथम अमानुषपणाचा कळस आहे. महेश्वराकडून प्रभाकराकडे आणि प्रभाकराकडून महेश्वराकडे, विवाहाच्या याचनेकरितां धडपडतांना या मुलींना पाहिलें म्हणजे आपण नाटक पहात नसून स्मशानांतील पैशाची सृष्टि पहात आहों कीं काय, असेंच क्षणभर वाटूं लागतें.

या दृष्टीनें अंक २ प्रवेश ३, अंक ३ प्रवेश २ आणि अंक ५ प्रवेश १ हे विरूपताउपहासाचे मेरुमणी म्हणून शोभण्यासारखे आहेत. अंक ३ प्रवेश २ मध्यें इंदु आणि बिंदु अशा दोघी एकदम महेश्वराला पकडतात आणि लग्नासाठीं त्याला ओढूं लागतात; त्या वेळीं महेश्वर म्हणतो;

> बायांनों, माझी अशी दैना करायला मी कांहीं एकीचाही नवरा झालों नाहीं अजून ! हें पहा, तिलोत्तमेसाठीं सुंदोपसुंद झगडून मेले, त्याप्रमाणें तुम्हीं माझ्यासाठीं आधीं द्वंद्वयुद्ध खेळा; तोंपर्यंत कुंवारपणाला न शोभण्याजोगें मी कुणाला कांहीं करूं देणार नाहीं !
>
> [ पृ. ११६ ]

हंशा पिकविण्यासाठीं केवढी दुष्ट कल्पना ही. स्त्रीहृदयाचा व स्त्रीचारित्र्याचा कोण हा अपमान! आणि तरी सुद्धां, श्रीपाद कृष्ण प्रस्तावनेंत म्हणणार कीं, भावबंधनांतील विपुल हास्यरस हजारों प्रेक्षकांस हंसवून त्यांच्या मुरकुंडया वळवील!

## प्रकरण नववें

# स्वभावपरिपोषविचार

आतांपर्यंत नाटकांचा विचार करीत असतां एका आंगाची चर्चा करण्याचें अजिबात टाळलें. हें आंग म्हणजे स्वभावपरिपोषाचें. गडकऱ्यांनीं विनोदीं पात्रें कोणतीं निर्माण केलीं व त्यांच्या स्वभावांत विनोद कसा काय साधला, ही नाटकदृष्ट्या जास्त महत्त्वाची गोष्ट आतांपर्यंत चर्चिण्याची ठेवली याचें कारण, दोन तीन पात्रें सोडून दिलीं असतां गडकऱ्यांच्या सहाही नाटकांतील विनोदी पात्रांच्या स्वभावांत एक प्रकारचें विलक्षण साम्य आहे; आणि त्या दृष्टीनें त्या सर्वांचा एकाच ठिकाणीं विचार केल्यास स्थलसंकोचाबरोबरच तुलना साधून सोईचें होणार आहे.

वेडयांच्या बाजारांतील **बाळाभाऊ** आणि इतर बहुतेक पात्रें; प्रेमसंन्यासांतील **वसंत** आणि **वीणा**; पुण्यप्रभावांतील

**किंकिणी, दामिनी** आणि **कंकण**; राजसंन्यासांतील **देहू**; आणि भावबंधनांतील **महेश्वर**; हीं सर्व मंडळी एका माळेचे मणी आहेत. **बाळाभाऊला** नाटकी प्रेमाचें वेड लागलें आहे; **किंकिणी** कालिंदीबाईसाहेबांसारखें होण्याकरितां धडपडत आहे; तर दामिनीला दागिन्यांखेरीज कांहीं सुचत नाहीं; **कंकण** बाळाभाऊची सुधारून वाढविलेली आवृत्ति आहे, प्रेमवेडानें त्यालाही घेरलें आहे; राजसंन्यासांतील **देहू** शिवाजी होण्याच्या लालसेनें शरीर कमावून, मग एखादा रामदास शोधण्याच्या गडबडींत आहे; तर **महेश्वर** म्हणजे, नाटकांचें वेड कमी, पण नाटकी प्रेमाचें वेड जास्त, असा स्वभावबदल झालेला बाळाभाऊच पुन्हां भावबंधनांत अवतरला आहे. अशा रीतीनें आंगीं पात्रता नसतांना आकाशांतील चंद्राच्या मागें लागणारीं हीं सर्वजणें आहेत. प्रत्येकाच्या चंद्राचें स्वरूप स्थितिभेदाप्रमाणें निरनिराळें असेल; परंतु स्वभावपरिपोषाची मूलभूत कल्पना एकच.

अर्थात ही कल्पना विनोदकारक आहे यांत शंका नाहीं. लोकमान्य टिळक सुपारी खात होते म्हणून सुपारी खाऊन लोकमान्य बनूं पहाणारा पढतमूर्ख तरूण जितका हास्यास्पद, तितकाच किंबहुना जास्त हास्यास्पद, नाटकांतील प्रेमाची हुबेहुब उठावणी, प्रत्यक्ष व्यवहारांत स्थळकाळ न पहातां करणारा मूर्ख मनुष्य होय, यांत संशय नाहीं. जगांत

बहुतेक प्रत्येक मनुष्याच्या डोक्यांत असें कांहीं ना कांहीं वेड हें असतेंच: कोणी बेसुमार बुद्धिबळें खेळण्याचा नादी असतो, तर कोणाला चावडीवर बसून चार घटका चकाट्या पिटल्याखेरीज चैनच पडत नाहीं. कोणी रस्त्यानें चालतांना आजूबाजूकडे यत्किंचितही दृष्टि न टाकतां, सरळ नाकाच्या समोर चालण्यांत सभ्यपणा मानतो; तर कोणाला सरळ चालतांच येत नाहीं; मानेचे चार पट्टे इकडे आणि चार तिकडे हे झालेच पाहिजेत; आणि येणाराजाणाराशीं कांहीं काम नसतांही चार आल्या गेल्याचे प्रश्न झाले नाहींत तर मग समाधान नाहीं. अशी ही लकब, किंवा जिला आम्हीं फर्ग्युसन कॉलेजच्या परिभाषेंत 'फट' म्हणतो, ती प्रत्येक माणसांत असते.

पण या लकबीची हास्यास्पदता मात्र मनुष्या मनुष्याशीं पालटते. तसेंच, जितके मनुष्याचे इतर गुण जास्ती तितकी ही लकब जास्तच विनोदप्रतिपत्तिकारक होते. डाग झाला तरी चंद्रावरचाच आल्हादकारक होतो. म्हणून उद्यां कोणी एखाद्या आरशावरचे डाग दाखवूं लागेल तर त्या बद्दल मनांत कांहींच कुतूहल उत्पन्न होणार नाहीं. तद्वतच लकब अगदींच मूर्ख किंवा बेवकूब किंवा नीच वृत्तीच्या माणसांत दाखवूं गेलें असतां हंसें होईल; पण तें त्या लकबीचें न होतां त्या माणसाच्या मूर्खपणाचें मात्र होईल. आणि

मूर्खपणाविषयींच्या हंशानें विनोदभावना जागृत होण्याऐवजीं तिरस्कार मात्र वाटूं लागेल. अगदीं वैयक्तिक उदाहरणें द्यावयाचीं तर, श्रीयुत न. चिं. केळकर यांचें खांदे उडविणें, किंवा डॉ. परांजपे यांची आपल्या मिशांविषयींची बेसुमार काळजी किंवा डॉ. केतकर यांची पोषाखाची विचित्र तऱ्हा, या लकबींबद्दल कोणी विनोदबुद्धीनें लिहील, तर त्यामुळें थोडा निर्दोष आनंद अनुभवावयास मिळेल. पण तेंच एखाद्या नाटक मंडळींतील भुरट्या नटाच्या अशा एखाद्या लकबीसंबंधीं कोणी पुराण सांगूं पाहील तर त्या पुराणकाराचा आणि त्याच्या विषयाचा, दोहोंचाही तिटकारा वाटल्यावांचून रहाणार नाहीं. सारांश अनेक गुणांच्या समुच्चयांत अशी एखादी फट दाखविली तरच तिजपासून शुद्ध आणि निर्व्याज विनोद निर्माण होईल. नाहीं पेक्षां होणार नाहीं.

याच विषयीं आणखी एक गोष्ट अशी कीं, ही फट दाखविणें ती सुद्धां फार नाजूक हातानें दाखवावयास पाहिजे. नाहीं तर, या लकबीचेंच जास्त स्तोम माजविलें, म्हणजे इतर गुणांकडे दुर्लक्ष होऊन वर्ण्य विषयाशीं जिव्हाळा वाटणार नाहीं, ही एक भीति; आणि दुसरी भीति अशी कीं, ही लकब दाखवितांना ग्रंथकाराजवळ प्रत्युत्पन्नमतित्व नसेल तर कदाचित त्याच त्याच प्रकाराच्या पुनरुक्तीनें सर्व कांहीं

कंटाळवाणें होऊन परिणामकारकता नष्ट होईल. तेव्हां अशी एखादी लकब दाखविणें, ही गोष्ट विनोदकारक म्हणून ग्रंथकर्त्याचें चित्त आकर्षिणारी असली, तरी या तऱ्हेचा विनोद करणाराजवळ कुशलता फार पाहिजे; नाहीं तर त्याला यश प्राप्त होणार नाहीं. अशा दृष्टीनें विचार केला असतां, वर जी आठ पात्रांची यादी दिली त्यांचा स्वभावपरिपोष विनोददृष्टया करण्यांत गडकऱ्यांना यश आलें नाहीं असें म्हणणें भाग आहे.

**बाळाभाऊचें** पुढचें चरित्र गडकऱ्यांना कसें दाखवावयाचें होतें हें समजण्यास मार्ग नाहीं. पण आहे तेवढ्या परिपोषावरून असें स्पष्ट दिसतें कीं, हें एक बावळट पोर आहे. त्याच्या विषयीं जिव्हाळा वाटण्याचें तर दूरच राहो पण तुच्छता मात्र वाटते. आणि त्याचा तो एकच एक नूर सर्वत्र पाहिला म्हणजे कंटाळवाणें होऊन जातें.

प्रेमसंन्यासांतील **वसंतराव** बॅरिस्टर आहे. पण तो बॅरिस्टर आहे एवढाच त्याचा गुण आहे. अनेक पात्रांचीं धोरणें संभाळतां संभाळतां, गडकऱ्यांना वसंतरावाविषयीं इतर दृष्टया आदर उत्पन्न करण्याचें साधलें नाहीं. वसंतराव जर आपल्या धंद्यांत हुषार, उदार हृदयाचा, आणि एक त्याची लकब सोडून दिली तर इतर दृष्टींनीं व्यवहारकुशल असा दाखविला असता, तर त्याचा इंग्रजी सुधारणेविषयींचा

फाजील व अविचारी अभिमान हा आनंदमय हास्य उत्पन्न करूं शकला असता. पण आहे त्या वसंतरावाला, मूर्ख तरुण याशिवाय दुसरी संज्ञाच नाहीं. बरें, अशा या मूर्खाचा मूर्खपणा तरी जास्त कसबानें दाखवावयाचा होता; पण 'अगदीं हिंदू' या खेरीज त्या बिचाऱ्याला दुसरें कांहीं बोलतांच येऊं नये इतकी उपहासास्पद स्थिति त्याची गडकऱ्यांनीं करून ठेवली आहे. पण उपहास म्हणजे विनोद नव्हे. **वीणा** ही वसंतरावाची निवळ सावली आहे; तिला स्वतंत्र अस्तित्वच नाहीं. असें जरी असलें, वसंतराव आणि वीणा यांचा स्वभावपरिपोष विनोदपूर्ण नसला, तरी त्यांत समाधान एवढेंच आहे कीं, त्यांच्यामध्यें चावटपणा कमी आहे. आणि कथानकाच्या उत्क्रांतीकरितां त्यांची गरज आहे. रोमिओ आणि ज्यूलिएटमध्यें जसें तें निष्पाप तरुण युगुल, आपल्या दोन घराण्यांतील वैराच्या धकाधकींत टिकून राहण्यास असमर्थ आणि तेंही आपल्या अत्यंतिक स्वभावामुळें झालें, तीच स्थिति जयंतलीलांची प्रेमसंन्यासांत झाली. शेक्सपिअरच्या नाटकांतील घराण्यामधील विरोधाऐवजीं, येथें जुन्या आणि नव्या मतांचा अथांग विरोध आहे. आणि अशा विरोधांत कोमल व सरळ परंतु आततायी जयंतलीलांना रहाणें अशक्य व्हावें हें सृष्टिक्रमप्राप्त आहे. अशा स्थितींत नव्या मताच्या अतिरेकानें मूर्खपणाला पावलेल्या

एका टोकाचें उदाहरण म्हणून वसंतवीणांची जोडी ठीक आहे. आणि या दृष्टीनें तर त्यांची योजना उपहासासाठींच जास्त चांगली ठरते.

परंतु **कंकण, किंकिणी** आणि **दामिनी** या त्रिकूटासंबंधीं इतकें सुद्धां समाधान नाहीं. गुंतागुंतीच्या या कथानकांत नाटककारानें त्यांचा संबंध दाखविला आहे खरा; पण तो अगदीं कृत्रिम भासतो. कथानकाचे हे दुवे मुद्दाम घडविलेले आहेत, व घडण बुजविण्याची काळजी सुद्धां ग्रंथकारानें घेतलेली नाहीं, ही गोष्ट पुण्यप्रभावांत अगदीं स्पष्ट दिसते. शिवाय आपापल्या कार्याच्या मानानें हीं पात्रें काळ व स्थळ इतकें व्यापतात कीं, त्यामुळें रसभंग मात्र होतो. कंकणाचा प्रेमपाठ हा कसा नीरस आहे हें पूर्वी एका ठिकाणीं दाखविलेंच. या वेडगळपणाखेरीज, दुसरा एखादा गुण म्हणून त्याचे अंगीं कांहीं नाहीं. दामिनीची दागिन्यांची हांव स्त्रीस्वभावसहज आहे. तिचा अतिरेक हाच थोडें फार हंसें आणण्याला कारण आहे. हीं दोन्ही पात्रें नाटकांत सजीव अशीं वाटत नसून नाटककार जशीं हालवील तशीं हलणारीं निर्जीव बाहुलीं आहेत. किंकिणींत मात्र थोडें मूळचें पाणी आहे. त्यांतल्या त्यांत कालिंदीबाईसारखें व्हावें ही तिची इच्छा कांहीं अगदींच बाष्कळ नाहीं. तिचा स्वभावही कोमळ आणि जात्या

हुषार आहे. पण या वेडापायीं बिचारीनें आपलें हंसें करून घेतलें आहे. अंक ४ प्रवेश ३ मध्यें कालिंदी जेव्हां म्हणते, ( पृ. ९६ ),

दामिनि, आतां नाहीं म्हणूं नकोस; मरूं दे त्या पोथ्या! चल एकदम कशी! पण एकदम नको गडे! दुःखांत नेहमीं कालिंदीबाई अगदीं हळू पावलें टाकतात;

त्या वेळीं या निष्कपट मुलीची ही गोड फसवणूक पाहून नितांत आनंदमय हास्य उद्भूत झाल्यावांचून रहात नाहीं. पण इतकें असूनही कथानकाशीं किंकिणीचा संबंध काय हा प्रश्न शिल्लक रहातोच.

राजसंन्यासांतील **देहूचा** गडकऱ्यांना नाटकांत कसा आणि किती संबंध आणावयाचा होता हें सांगणें आज शक्य नाहीं. आणि म्हणून त्याच्या विषयीं विचार न करणें बरें. हा तरुण, महत्त्वाकांक्षी, व तालीमबाज गडी बुद्धीनें अगदीं वाटोळा आहे व त्याची जात बाकीच्या सातजणांची जी आहे तीच होय, एवढेंच म्हणून पुढें जाऊं.

भावबंधन हें एक विचित्र नाटक आहे. आणि **महेश्वर** हा त्या विचित्रपणांतलाच एक दुवा आहे. खुद्द गडकऱ्यांना तरी आपली ही दीर्घसूत्री योजना पाहून समाधान झालें असेल कीं नाहीं याची शंकाच आहे; इतका महेश्वराचा या नाटकांत ओढून ताणून आणलेला संबंध आहे. आणि त्या मानानें त्यानें नाटकांत व्यापलेली जागा बेसुमार आहे.

महेश्वर म्हणजे बाळाभाऊची सुधारून वाढविलेली आवृत्ति, मूर्खपणाचा आणि अजागळपणाचा पुतळा, मृदंगवत् चोहोंकडून थपडा खाणारा, असा एक प्राणी आहे. मनुष्याशीं सदृश असे त्याचे भाव फार थोडे आहेत. 'तों पर्यंत मी कुणाला कुंवारपणाला न शोभण्यासारखें कांहीं करूं देणार नाहीं' असें म्हणून स्वतःबरोबरच आपल्या विधात्यालाही — नाटककाराला — तो तिरस्कारपात्र करीत आहे. इंदुबिंदूंच्या जवळचें त्याचे प्रवेश म्हणजे निरर्गल राक्षसी वृत्तीच्या प्रतिभेचे खेळ आहेत. आणि त्यांत हें कळसूत्री पुरुषी बाहुलें बायकी आविर्भावानें वावरत आहे. या पेक्षां जास्त महेश्वरासंबंधीं लिहिण्याचें कारणच नाहीं.

अशा तऱ्हेनें या आठ पात्रांपैकीं, प्रत्यक्ष नाट्यवस्तूला थोडी फार आवश्यक म्हणजे वसंतवीणांची जोडी आहे. बाकीच्यांचा संबंध कसा तरी ओढून ताणून आणलेला आहे. त्यांच्या लकबा दाखवितांना संयमाऐवजीं अतिरेकाचें टोंकच नाटककारानें गांठलें आहे. तसेंच हें दिग्दर्शनही नाजूक हातानें न करता अत्यंत लांबट करून कंटाळवाणें मात्र केलें आहे. प्रत्यक्ष विनोदी स्वभावसंपन्न अशा पात्रांची गडकऱ्यांच्या नाटकांत ही स्थिति आहे. व म्हणूनच वर म्हटलें कीं, विनोदी पात्रें — एखादी लकब, फट किंवा वेड, यांनीं घेरलेलीं विनोदी पात्रें — निर्माण करण्याच्या खटपटींत

गडकऱ्यांना यश प्राप्त झालें नाहीं.

यांखेरीज इतर लहान पात्रांपैकीं वेड्यांच्या बाजारांतील **देशपांडे** हा, नाटकी पोऱ्यांतील एक शुद्ध आचरटपणाचा नमुना आहे. प्रेमसंन्यासांतील **मथुरेच्या** स्वभावांत विनोदाला मुळींच स्थान नसून, ती ज्या ज्या परिस्थितींत दाखविली जाते त्या त्या प्रसंगांत विनोदपरता आहे. पण तेथेंही अतिरेक आणि अमानुषपणा यांची भेसळ करून, गडकऱ्यांनीं विरस कसा केला हें दाखविलेंच आहे. पुण्यप्रभावांतील **नूपुर** आणि **सुदाम** यांच्या स्वभावांत विनोदकारकतेचा कांहीं एक अंश नाहीं. त्यांपैकीं एक हुच्च टवाळ, व दुसरा मूर्ख संशयी असे असून दोघांचेही स्त्रीपातिव्रत्य वगैरे विषयींचे विचार अत्यंत नीच आणि दुष्ट आहेत. तीक्ष्ण व कठोर अशी ही व्यंग्यार्थी टीका आहे असें गृहीत धरलें, तरच त्यांचा हा ग्राम्यपणा थोडा फार क्षम्यतेच्या सदरांत येईल. राजसंन्यासांतील **जिवाजीपंत** हा एक अनीतींत निढावलेला कारकुनी पेशाचा गृहस्थ आहे. विसंगत आणि विकृत कल्पनांचें जाळें विणण्याजोगी तरल बुद्धिमत्ता त्याचे आंगीं आहे. कांहीं ठिकाणीं या कल्पना चतुरतानिदर्शक आहेत. पण बहुतेक ठिकाणीं त्या ओढून ताणून आणलेल्या आणि ग्राम्य आहेत. त्याच्या उद्गारांत क्वचित विनोदवचनाची — शब्दनिष्ठ विनोदाची — थोडीबहुत झांक आहे. पण त्याच्या

स्वभावांत विनोदी म्हणण्यासारखें कांहीं नाहीं. एखाद्याच्या बोलण्यानें हास्यप्रतिपत्ति झाली म्हणजे त्याचा स्वभावपरिपोष विनोदपूर्ण आहे असें म्हणणें युक्त नाहीं.

रहातां राहिलीं तीन महत्त्वाचीं पात्रें. **तळिराम, गोकुळ** आणि **धुंडिराज.** त्यांत तळिरामाचा स्वभावपोष विनोदपूर्ण आहे असें म्हणणें म्हणजे धाडसाची कमाल आहे. पण महाराष्ट्र साहित्याच्या आजच्या बेबंदशाहींत हेंही धाडस करणारे वाङ्मयवीर आहेत. आणि त्यांनीं तळिरामाला एक उत्कृष्ट विनोदी पात्र ठरविलें आहे.

तळिराम हा वास्तविक शेक्सपिअरच्या आयागोचा सख्खा नसला तरी चुलत बंधु आहे. आणि त्याच्या दारुड्या बडबडीची भर न टाकतां त्याचे प्रवेश गडकऱ्यांनीं वठविले असते तर, तें संविधानकाच्या परिणतीला आणि रहस्याला अत्यंत पोषक होऊन त्याच्या स्वभावासंबंधीं वृथा वादही माजला नसता. तळिरामाला विनोदी म्हणणारांचा मुख्य आधार म्हणजे त्याचीं भाषणें; तथापि या त्याच्या अचकट विचकट भाषणांनीं हंशा पिकत असला तरी, तीं विनोदी नव्हेत हें योग्य प्रसंगीं दाखविलेंच आहे. तळिराम हा, वस्तुतः पहातां सुधाकराचा पापप्रेरक ( Evil Genius ) आहे. त्याचा स्वभाव अंतर्यामी अत्यंत दुष्ट आहे. संधि मिळाली तर कोणतेंही अनीतीचें कर्म करण्यास तो मागें पुढें पहाणार

नाहीं. सुधाकराला दारूचें व्यसन लावतांना दुष्टपणाखेरीज दुसरा कोणताही हेतु साधण्याचा त्याचा विचार नाहीं. जगांतील सर्व पवित्र गोष्टींची तो कुचक्या अंतःकरणानें टवाळी करणारा आहे. त्याची संगत हें सुधाकराच्या अधःपतनाचें निकटवर्ती (Immediate) कारण आहे. जगांत पापाच्या मार्गांत पाडण्याला अत्यंत लायक अशीं सुधाकरासारखीं, उदार परंतु हलु अंतःकरणाचीं माणसें किती तरी असतील. पण त्यांना तळिरामासारखा एखादा मुरलेला पापप्रेरक अथवा पापाचा सांथीदार मिळत नाहीं, आणि या त्यांच्या सुदैवानें तीं सन्मार्गावरच रहातात.

तळिरामाच्या स्वभावाचें रहस्य हें असें आहे. आणि असें असूनही केवळ त्याच्या विचकट गडबडीमुळें त्याचा स्वभाव विनोदपूर्ण ठरविणें म्हणजे विवेकशून्यतेचें लक्षण आहे.

गोकुळचा विसराळूपणा हाच त्याच्या स्वभावांतील विनोदसर्वस्व असें मानण्याचा सर्वत्र प्रघात आहे. पण ही केवळ दिशाभूल आहे. वास्तविक, गोकुळ विसराळू बनविला नसता तर, आज जी त्याच्या स्वभावांत अक्षम्य विसंगति उत्पन्न झाली आहे ती झाली नसती. समाजशास्त्रांतील गहन सिद्धांतावर, त्याच्या दृष्टीनें कां होईना, पण प्रवचन करणारा गोकुळ; फक्त एका खटल्यांत कोर्टकचेऱ्यांतील

मामुली भाषेची पैदास करून तिची नीट आठवण ठेवणारा गोकुळ; प्रसंगा प्रसंगानें टोल्यास टोला अशीं उत्तरें देणारा गोकुळ; हा इतका विसरभोळा म्हणून विश्वास ठेवावा कीं, त्याला तोळाभर केशर आणि शेरभर साखर, कीं शेरभर केशर आणि तोळाभर साखर, यांची आठवण आणि विवेक, दोन्ही राहूं नयेत, किंवा स्वतःच्या वयाचीं वर्षें चौदा, पंधरा कीं पंचवीस, याची भ्रांति पडावी; हें सांगणें आणि मानणें, खरोखर माझ्या सारख्याच्या कल्पनाशक्तीच्या आटोक्याबाहेरचें आहे. आणि गोकुळचा हा विसरभोळेपणा त्याला उगीच किंवा पीटांत हंशा पिकण्याकरितां चिकटविलेला आहे ही गोष्ट, त्याला द्रुमन पळाल्याची आठवण, पोबारा या शब्दावरून व्हावी यासाठीं, सोंगट्यांचा जो खेळ मांडला आहे त्यावरून, आणि अंक ३ प्रवेश ६ मध्यें,

> कालच मीं "हिंदुधर्म आणि सुधारणा" हें पुस्तक वाचलें; त्यांत स्पष्ट म्हटलें आहे कीं, मला आतां आठवत नाहीं; आणि तें म्हणणें इथें इतकें लागू पण होणार नाहीं. [पृ. ९९]

हें जें त्याचें भाषण आहे, त्यांतील कृत्रिमतेनें आणलेल्या दुसऱ्या भागावरून, सहज दिसून येण्यासारखी आहे.

या विसराळूपणाच्या विसंगतीमुळें, खटल्याच्या प्रवेशासारख्या नीरस प्रवेशाचें चऱ्हाट वळण्याचा मोह मात्र नाटककारास आवरला नाहीं. तसेंच आपल्या अमानुष विनोदाच्या

हौशीमुळें गोकुळच्या स्वभावांत दुसरीही एक विसंगति नाटककारानें आणली आहे. ती म्हणजे त्यानें आपल्या बायकोचें हिडीस वर्णन करणें ही.

इतकें असूनही गोकुळचें पात्र अत्यंत हर्षोत्पादक रहातें याचें कारण, त्याचा नितांत निष्कपटीपणा आणि निर्व्याजपणा; व यांच्या जोडीला त्याची आंधळी पण सात्त्विक अशी जुन्यावरची श्रद्धा. हींच खरीं त्याच्या स्वभावांतील विनोदाचीं कारणें आहेत. त्याच्या विसराळूपणाचा अतिरेक करून, त्याचा खरा स्वभाव दडपून टाकल्यासारखें जरी गडकऱ्यांनीं केलें असलें तरी शेवटीं गोकुळच्या शेरभर केशरापेक्षां आणि त्याच्या स्वस्त्रीवर्णनापेक्षां, त्याचा जुन्याचा जाज्वल्य पण विवेकशून्य अभिमान, काम करण्याची हौस आणि मनाचा मोकळेपणा याच गोष्टी जास्त आकर्षक रहातात. असा गोकुळ सुद्धां कांहीं कमी विनोदकारक नाहीं. त्याची अतिरिक्त विचारहीन श्रद्धा, ही खरोखर विशुद्ध आनंद उत्पन्न करण्यास पुरेशी आहे. गोकुळची श्रद्धा व सरळ भाव पत्करावयाला कोणीही तयार होईल; पण स्वतःच्या स्त्रीशीं होणाऱ्या त्याच्या वर्तनासारखें, किंवा विसरभोळेपणाचें वर्तन, कल्पनेनें कां होईना पण करण्यास कोणी सहृदय मनुष्य तयार होईल असें वाटत नाहीं. गोकुळचा हा खराखुरा स्वभाव जितका जास्त पटवून घेतां येईल तितका त्यापासून विनोदाचा अनुभव जास्त येईल.

धुंडिराज हा गोकुळचा, नव्या परिस्थितींत परंतु जास्त रम्य, असा अवतार आहे. गडकऱ्यांच्या प्रतिभेचा अत्यंत विमल असा हा यशध्वज आहे. गडकऱ्यांत काय तोलाची विनोदशक्ति होती हें तेजस्वीपणानें दाखविणारें हें चिन्ह आहे.

धुंडिराज हा प्रेमळपणाची मूर्ति आहे; निष्कपटपणाचा आदर्श आहे; पापाचा वासही त्याच्या अंत:करणाला नाहीं; व्यवहारकुशलतेनें जगांत चार दिवस त्यानें काढलेले आहेत; त्याच्या औदार्याला सीमा नाहीं; अंत:करण कसें नेहमीं उघडें आणि कारंजासारखें फवारे टाकणारें आहे. पण हाच धुंडिराज बोलघेवडा आहे; बोलघेवडेपणा हा, त्याच्या प्रकर्षाप्रत पावलेल्या सरळपणाचा आणि प्रेमळपणाचा उमाळा आहे. हा उमाळा इतक्या वेगाचा आहे कीं, तो थांबविण्याचें सामर्थ्य धुंडिराजाच्या आंगीं राहिलेलें नाहीं. त्याच्या ओघाबरोबर तो वाहून जातो आहे. यामुळें स्थळ व काळ यांच्या औचित्याची त्याला जाणीवही नाहीं. किंबहुना विषयाची एकरूपता ठेवण्याचेंही त्याला भान नाहीं. आपण बोलतों तें प्रेमानें बोलतों; सरळ आणि योग्य तेंच बोलतों, अशी त्याची भावना आहे. पण बोलत असतां आपण दुसऱ्याला किती त्रास देतों, दुसरा आपल्याशीं कांहीं बोलण्यास उत्सुक असला तरी आपण त्याला संधि कशी देत नाहीं, विषयाचें

सूत्र आपलें कसें सुटतें, इकडे त्याचें कांहींच लक्ष नाहीं. आणि तरी पण आपण कांहीं तरी विशेष शहाण्यासारखें बोलतों, अशी त्याची स्पष्ट कल्पना आहे. ऋजु अंतःकरणाच्या या उदार मनुष्याची ही फट, म्हणजे खरोखर त्याच्या स्वभावपरिपोषांतील विनोदाचा रम्य प्रकर्ष होय. आणि हा गडकऱ्यांनीं इतक्या नाजूक हातानें साधला आहे कीं, त्याचीं भाषणें नाटकांत इतर पात्रांना, तशीच प्रेक्षकांना, कधींही यत्किंचितसुद्धां राग येऊं देत नाहींत. घनश्यामासारखा दगडाच्या हृदयाचा मनुष्य सुद्धां, आपलें काम तांतडीनें उरकण्यासाठीं अत्यंत उत्सुक झाला असतांही, या निष्कपटी बडबडयाची लांबण, सगळी ऐकून घेतो. मधून मधून त्याला तडफडल्यासारखें होतें; पण एकही वावगा शब्द बोलण्याचें धैर्य त्याला होत नाहीं.

हेंच गडकऱ्यांच्या प्रतिभेचें खरें विशुद्ध स्वरूप व सामर्थ्य. आणि संविधानकाच्या मध्यभागीं संयम दाखवून गडकऱ्यांनीं या सामर्थ्याची अत्युच्च कसोटी दाखविली आहे. चोरीच्या आळाच्या कचाटयांत सांपडून, धनेश्वरासारख्या म्हाताऱ्याला आपली मुलगी देण्याचा प्रसंग, जेव्हां या प्रेमळ पित्यावर येतो, त्या वेळेपासून त्याच्या तोंडाची टकळी एकदम थांबते. हा पूर्वीचाच धुंडिराज काय, अशी शंका येण्याइतका तो बोलेनासा होतो; त्याचा खालीं मान घालून लपविलेला गंभीर

चेहरा आणि असामान्य मुग्धपणा, हीं आपणांस चकित करतात. आणि हा परिणाम अगदी स्वाभाविकच नाहीं काय? फुलपांखराप्रमाणें आनंदी आणि बेफिकीर अशा त्या उदार आत्म्यावर, आपल्या स्वतःच्या सुखासाठीं नव्हे, तर मुलाबाळांच्या सुखासाठीं, गुणवती अशी मालतीसारखी कन्या बळी देण्याचा प्रसंग यावा, यापेक्षां त्याच्या प्रेमळपणावर दुसरा मोठा आघात तो कोणता? या आघातानें त्याचें हृदय दुभंगून जावें, आणि त्याचें तें फुलपांखरी बागडणें जाऊन, त्याच्या सर्व हालचालींत दुःखाची मंदता यावी यांत नवल काय? आपल्या इतर नाटकांतील विनोद तसाच पुढें चालू ठेवण्याची पद्धत, धुंडिराजापुरती तरी दूर सारून, अत्यंत स्वाभाविक असें हें मनोव्यापारचित्र गडकऱ्यांनीं काढलें आणि उत्कृष्ट विनोदाची परिसीमा केली. धुंडिराज असा पालटला, म्हणूनच त्याच्या आधींच्या वायफळ बडबडाटाला रम्यता आहे. नाहीं पेक्षां या नंतरही तशीच त्याची गडबड चालू राहिली असती, तर त्याला पाषाणहृदयी हेंच नांव शोभलें असतें. आणि मग त्याचा स्वभाव विनोदपर असा न भासतां, तो तसा उठवूं पाहणाऱ्या नाटककाराचें मात्र हंसें झालें असतें. असें असूनही हरिभाऊ आपट्यांची स्तुति करतांना गडकऱ्यांना कमी लेखण्यास सरसावलेले वाग्भट देशपांडे, धुंडिराजाच्या या स्वभावपरिवर्तनाला कृत्रिम

अतएव विनोदभंग करणारें असा दोष देतात. तेव्हां आतां सरस्वतीच्या या योद्धयाच्या हरीभाऊंवरील प्रेमाबद्दल हंसावें, कीं पक्षपातानें अंध झालेल्या दृष्टीबद्दल खेद करावा, हेंच कळत नाहीं.

## प्रकरण दहावें

### निष्कर्ष

अशा तऱ्हेनें गडकऱ्यांच्या वाङ्मयसृष्टीच्या पसाऱ्याची, ही जरा कंटाळवाणीच वाटणारी विस्तृत चर्चा केल्यानंतर, निष्कर्ष म्हणून थोडक्यांत पुढील गोष्टी सांगतां येतील.

( १ ) गडकऱ्यांच्या आंगीं विशुद्ध विनोद निर्मिण्याचें अगाध सामर्थ्य आहे, व या सामर्थ्याच्या जोरावरच, सुधाकरसिंधूंचे विनोदात्मक प्रवेश, सफाळचा अभ्यास हा चुटका, गोकुळची स्वभावरचना ( सापवाद ), आणि सर्वांत उत्कृष्ट म्हणजे धुंडिराजाची स्वभावोत्क्रांति, ही नितांत रमणीय निर्मिति त्यानीं केली आहे.

( २ ) परंतु त्यांच्या प्रतिभेंतील हिणकस मिश्रणामुळें असो; कल्पनांना कलाटण्या देऊन कसरत करण्याच्या मोहामुळें असो; ते ज्या परिस्थितींत वाढले त्या परिस्थितीचा

परिणाम म्हणून असो; किंवा असंस्कृत प्रेक्षकवाचकांच्या हंसून मुरकुंडया वळतील, अशा प्रकारचा विनोद निर्माण करणें हेंच त्यांना इष्ट वाटलें म्हणून असो; पण आपल्या प्रतिभेच्या विशुद्ध सामर्थ्याला जवळजवळ जाणून बुजून बाजूला सारून, त्यांनीं हीन दर्जाचा विनोद निर्माण करण्यांत आपली शक्ति वेंचली आहे. कलम एक मधील विनोद वजा जातां, हा हीन दर्जाचा विनोदच त्यांच्या वाङ्मयांत भरलेला आहे. याचें दोषविशेष पुढीलप्रमाणें सांगतां येतील.

( अ ) हा विनोद भावनानिष्ठ मुळींच नाहीं; तर शब्दनिष्ठ आहे. इंग्रजींत ज्याला Wit म्हणतात त्याशीं सदृश असा हा विनोद आहे.

( आ ) या शब्दनिष्ठ विनोदांतही विनोदवचनापेक्षां, किंवा एका सबंध कल्पनेवरील कोटीपेक्षां, शाब्दिक व श्लेषमय कोटयांवरच बहुतेक सर्व भिस्त टाकण्यांत आली आहे. या कोटयांतही स्वाभाविक आणि कसबी कोटयांपेक्षां, नीरस, ग्राम्य व पोरकट, अशा कोटयांचाच भरणा जास्त आहे.

( इ ) त्यांतच जेथें विनोदवचन आहे, किंवा विनोदप्रसंग साधण्याचा प्रयत्न केला आहे, तेथें कल्पना समूळ हास्यास्पद होईल इतकी ती पिंजण्याची, विनोदप्रसंग, औचित्यभंग होईल व विरस घडेल इतके लांबविण्याची, आणि स्थळ काळ न ओळखतां घुसडून देण्याची, गडकऱ्यांना फार हौस आहे

यामुळें त्यांनीं आपल्या नाटकांच्या रचनेला ठिकठिकाणीं त्रिघाड आणलेला आहे.

( ई ) चवथा दोषविशेष म्हणजे अतिरेक. याचीही उदाहरणें निबंधांत जागजागीं दिलीं आहेत. संयम हा ग्रंथकाराला अत्यावश्यक गुण आहे याची गडकऱ्यांना जाणीवही नाहीं. कोणतीही गोष्ट अतिरेकाला नेल्याखेरीज त्यांना समाधानच नाहीं.

( उ ) गडकऱ्यांचा स्वभाव वस्तुतः टीकाप्रिय व गांभीर्ययुक्त; मग ते बाहेर कोणास कसेही दिसले असोत; यामुळें टीकापरता व उपरोधिकपणा या गोष्टी त्यांच्या विनोदांत खेंचून भरल्या आहेत. त्यांच्या विनोदी लेखांतील पुष्कळ ठिकाणचा चांगला विनोद या उपरोधिकपणामुळें दुष्टता पावला आहे.

( ऊ ) पण या सर्वांवर ताण करणारे व गडकऱ्यांच्या विनोदाला असामान्य हीनता आणणारे दोन दोष म्हणजे ज्ञानतः केलेली अश्लीलता, आणि अमानुष टवाळी व विरूपताउपहास. या सर्व दोषांचें आगर म्हणजे त्यांचें **मूकनायक** हें लहानसें चोपडें होय. यांतील गर्भाधानाच्या प्रसंगींचा प्रवेश लिहिणाराला मनुष्यहृदय तरी होतें कीं नाहीं याचा सुद्धां वाचणाराला प्रश्नच पडतो. इतका तो राक्षसी वृत्तीनें लिहिलेला आहे.

पण अश्लीलता आणि अमानुषता हे दोष पुराव्यानिशी पदरांत घातल्यावर, त्यावर ठराविक सांच्याचें असें उत्तर येतें कीं, असे प्रकार समाजांत प्रत्यक्ष दिसत नाहींत काय ? मग गडकऱ्यांनीं तरी विशेष वाईट काय केलें ? त्यांना समाजांत जी घाण दिसली, ती त्यांनीं समाज सुधारावा या दृष्टीनें, नाटकांतून किंवा इतर रीतीनें, समाजापुढें मांडली. या बद्दल उलट त्यांचे समाजानें आभारीच राहिलें पाहिजे.

पण या उत्तरांत भरीवपणा मुळींच नाहीं समाज सुधारावा या हेतूनें हे प्रकार गडकऱ्यांनीं पुढें आणले असतील, तर ते त्यानीं उपरोधिक बुद्धीनें लिहिले असें म्हणावें लागेल. पण उपरोधानें विनोदाला कमीपणा येतो; व या दृष्टीनें गडकऱ्यांचा विनोद हलक्या प्रतीचा आहे ही गोष्ट गडकरीभक्तांना बिनतक्रार मान्य करावी लागेल.

परंतु गडकऱ्यांच्या अश्लीलपणाचीं व अमानुषतेचीं जीं उदाहरणें दाखविलीं, त्यांत समाज सुधारण्याच्या हेतूचा वास कोठें ही येत नाहीं. तर निवळ फाजीलपणा करून हंशा पिकविण्याकरतां हा उद्योग आहे, हें त्या त्या ठिकाणच्या संदर्भावरून सिद्ध होत आहे. तसेंच विरूपताउपहास, आणि, पातिव्रत्य, पूर्वापर इतिहास, व पूज्य व्यक्ती, यांची बेहद्द टवाळी करून, गडकऱ्यांना असें कोणतें समाजहित साधावयाचें आहे ? आणि वादाकरितां क्षणभर

गृहीत धरून चाललें कीं, अगदीं प्रत्यहीं घडणाऱ्याच गोष्टी गडकऱ्यांनीं लिहिल्या, तरी तेवढयानें त्यांचा दोष कमी होतो काय ? जगांत काय याच्यापेक्षांही जास्त अनिर्वाच्य प्रसंग घडून येत असतील. समाजहित दृष्टीनें — कलाविलासाच्या दृष्टीनें नव्हे — त्यावर एखादा आगरकर लिहूं लागेल, त्यावेळीं तो त्या सर्वांचा स्पष्ट उच्चारही करील. पण म्हणून काव्यनाटककारांनीं, जगांत काय जें दिसेल तें, तसेंच हिडीस स्वरूपांत आपापल्या काव्यनाटकांत मांडावें कीं काय हा मोठा महत्त्वाचा प्रश्न आहे. सारस्वत म्हणजे सृष्टीचें यथार्थरूप नव्हे; तर ग्रंथकर्त्याच्या हृदयरूपी आदर्शांत पडलेलें तें प्रतिबिंब होय; ही गोष्ट विसरून चालणार नाहीं. हा आरसा, आपल्या गुणानें, आहे हें जग कांहीं तरी निराळ्या स्वरूपांत दाखवितो. आणि त्यामुळें, या निराळ्या जगाचें दर्शन, व ज्यांतून तें दिसतें त्या आदर्शाच्या गुणाची ओळख, असा दुहेरी आनंद वाचकांस सारस्वतामध्यें अनुभवावयास मिळतो. म्हणूनच सारस्वताचें महत्त्व आहे. पण एखादा आरसा जर, जग आहे तितकेंच घाणेरडें किंवा जास्तच विद्रूप दाखवूं लागला, आणि जगांतील चांगल्या गोष्टींचें प्रतिबिंब त्यांत पडेनासेंच झालें, तर तो आरसा कांहीं तरी बिघडलेला आहे असा निर्णय द्यावा लागेल. असाच निर्णय देण्याची पाळी गडकऱ्यांनीं स्वतःवर

**निष्कारण** आणली व यामुळेंच त्यांच्या विनोदाविषयीं या बाबतींत कठोर लिहिणें प्राप्त होतें.

शिवाय गडकरी नाटकें लिहीत होते. समाजसुधारणेच्या हेतूनें, एखादा आगरकर किंवा क्वचित एखादा केशवसुत जें लिहील, तें खोलीच्या चार भिंतींच्या आंत तरी वाचलें जाईल. व त्यांत वर्णिलेले प्रसंग, जे कोणी तितके कल्पक असतील त्यांच्याच दृष्टीसमोर उभे रहातील. पण नाटक म्हणजे आबालवृद्ध स्त्रीपुरुषांनीं प्रत्यक्ष पहावयाची गोष्ट आहे; व यामुळें नाटकांत कोणत्या प्रकारचे प्रसंग किंवा भाषणें आणावयाचीं याविषयीं तारतम्य ठेवण्याची जबाबदारी सर्वांपेक्षां नाटककारावर फार जास्त पडते.

इतकेंही करून या उत्तराचा कोणी आग्रह धरलाच; तर मग प्रिं. दादासाहेब भाटे यांचें, गडकऱ्यांचे विनोदाविषयीं जें भरमसाट विधान सुरुवातीलाच दिलें, त्याची व या उत्तराची संगति कशी लावावयाची? प्रि. भाटे यांचें म्हणणें कीं, शेक्सपिअर आपल्या काळच्या अश्लीलप्रियतेला बळी पडला. पण गडकरी तसे पडले नाहींत, म्हणून त्यांनीं शेक्सपिअरवर कडी केली. गडकऱ्यांनीं जर समाजांतील घाण आहे तशीच दाखविली, तर मग हें विधान समर्थनीय कसें? वास्तविक खरें बोलावयाचा धीर करवत नसला म्हणजे एकदां एक, एकदां एक, अशा उत्तरांच्या या गोलांट्या उड्या

मारान्या लागतात. यांतून सुटका करून घ्यावयाची असल तर सत्य तेंच, मग तें कितीही अप्रिय असलें तरी सांगितलें पाहिजे. आणि तें सत्य हें आहे कीं, स्वतःच्या प्रतिभेंतील हिणकसपणामुळें म्हणा, किंवा लोकांच्या अभिरुचीला बळी पडून टाळ्या मिळविण्याकरतां म्हणा, पण आपल्या विनोदांत गडकऱ्यांनीं अश्लीलता आणि अमानुषपणा यांची यथेच्छ भेसळ करून शेक्सपिअरच्या वर उलट्या अर्थानें कडी केली. प्रि. भाटे यांच्या इतर अतिशयोक्तिपूर्ण स्तुतीला निबंधांत परस्पर पुरेसें उत्तर मिळालें आहे.

इतके हीनत्वकारक दोष जर गडकऱ्यांच्या विनोदांत आहेत, तर मग त्या संबंधीं एवढी दीर्घ चर्चा करण्याचें कारण काय, असा कोणी प्रश्न विचारील; पण अभ्यासकाचें मन सारस्वतांतील अमुक एकाच भागानें अगर ग्रंथकारानें वेधावें असा कांहीं नियम नाहीं, असें वांकडें उत्तर त्यावर देतां येणार नाहीं असें नाहीं.

पण सरळ उत्तर म्हणजे असें आहे. गडकरी हे अत्यंत उच्च प्रतिभावान नाटककार व गद्य लेखक होते. त्यांची प्रतिभा कांहीं कांहीं वेळीं इतकी उंच भरारी मारते कीं, त्या बद्दल आमच्या सारख्यांनीं चकितच व्हावें. मनुष्यस्वभावाच्या खोल तारा, जाणून असो अथवा स्वाभाविक रीत्या असो, त्यानीं हलक्या हातानें छेडल्या आहेत. शिवाय

विनोदाकरितां त्यांची फार प्रसिद्धि आहे. तेव्हां अशा ग्रंथकाराच्या सृष्टीचें निरीक्षण, विनोदाच्या भागापुरतें करावें, असें एखाद्या अभ्यासकाच्या मनांत येणें हें अगदीं सहज आहे.

या शिवाय दुसराही एक हेतू असा कीं, गडकऱ्यांच्या विनोदाविषयीं असलेली चुकीची सामान्य कल्पना दुरुस्त करतां आली तर पहावी. खुद्द गडकऱ्यांनाही वेळेवर सूचना न झाल्यामुळें त्यांच्या विनोदांतील दोष वाढतच गेले. आणि आज त्यांच्या उच्च विनोदाच्या नांवाखालीं, या दोषांचेंच सर्वत्र अनुकरण होत आहे. गडकऱ्यांच्या इतकें अनुकरण महाराष्ट्रांत दुसऱ्या कोणाचें फारच क्वचित झालें. पण खेदाची गोष्ट एवढीच कीं, दोषांचें अनुकरण करणें सोपें असल्यामुळेंच कीं काय, गडकऱ्यांचे दोषच सर्वत्र गडकऱ्यांची परंपरा म्हणून पसरले. आज गडकरीपरंपरा म्हणून या घाणेरडेपणाचाच उदो उदो केला जात आहे. अशा वेळीं, गडकऱ्यांचे हे दोष असून, त्यांची परंपरा चालवावयाचीच तर त्यांच्या गुणांची, म्हणजे त्यांच्या प्रतिभेनें निर्मिलेल्या धुंडिराज, गोकुळ ( सापवाद ), सिंधु, सुधाकर, यांच्यामधील विनोदाची परंपरा चालवावी; आपला फाजीलपणा गडकऱ्यांच्या नांवाखालीं खपविण्याची सुपीक युक्ति योजूं नये; हें सांगण्याचा प्रयत्न करून पहावा, असा दुसरा हेतू ही चर्चा करतांना आहे.

गडकऱ्यांच्या विनोदाच्या यथार्थरूपदर्शनानें ही गोष्ट थोड्या अंशीं साधेल असें वाटतें. शेवटीं प्रार्थना एवढीच कीं, या विषयीं टीका जी व्हावयाची ती व्यक्ति सोडून साहित्यशास्त्रीय व भारदस्त अशी व्हावी. उगाच नसत्या हेतूचे आरोप लादून, साप म्हणून दोरी बडवीत बसण्याचा प्रयत्न होऊं नये. गडकऱ्यांच्या कीर्तीला काळिमा लावण्याच्या हेतूनें हा निबंध लिहिला नाहीं; तर खरे विशुद्ध व अनुकरणीय गडकरी कोणते, हें लोकांच्या निदर्शनास येऊन, सांप्रदायिकांच्या निरर्गल आणि अशास्त्रीय विधानांना खंड पडावा, एवढीच मनीषा ही चर्चा करतांना आहे.

३०३७
REFBK-0003037

# सूची


**एकच प्याला**–४१; ८९; ९३; ९४; १००–११३ तळिराम–१४२–१४३.

**पुण्यप्रभाव**–४१; ७८–९३; ९६; कंकण– १३३; १३८; किंकिणी–१३३; १३८; १३९; दामिनी–१३३; १३८; नूपुर–१४१; सुदाम–१४१.

**प्रेमसंन्यास**–१९; २०; ४१; ५३–७७; ७८; ८०; ८१; ८९; ९०; ९३; ९७; गोकुळ–१४२; १४३–१४५; मथुरा–१४१; वसंत आणि कीर्णा–१३२; १३६–१३७.

**भावबंधन**–४१; ७४; ७६; ११४–१३१; धुंडिराज–१४२; १४६–१४९; महेश्वर–१३३.

**राजसंन्यास**– ४१;–९३; ९४–९९; जिवाजीपंत–१४१–१४२; देहू–१३३; १३९.

**वाग्वैजयंती**–२२-२७; एक समस्या–२५; काय करावें?–२२; गुलाबी कोडें–२३; चिंतातुर जंतु–२६; विहिणींचा कलकलाट–२४; हुकमेहुकूम–२४.

**वेड्यांचा बाजार**–४१; ४१–५२; ५६; ७१; ७८; ९४; ९६; –देशपांडे–१४१; बाळाभाऊ–१३२; १३३; १३६.

**संपूर्ण बाळकराम**–२७–३८; कवींचा कारखाना-३१–३३; ३४; छोट्या जगूचा रिपोर्ट–३५; दीडपानी नाटक–३७; नाटक कसें पहावें-३६; नाटक कसें लिहावें-३५; प्रमादपंचदशी-३६–३७ मुंबईतील लेखन–३७–३८; मूकनायक–१५२. रिकामपणची कामगिरी-२७-३१; ३३-३५; सकाळचा अभ्यास– ३७; स्वयंपाकघरांतील गोष्टी–३१–३२; ३४;


मराठी ग्रंथ संग्रहालय